तरुण भारत
आसमंत



# धर्मांधांचा दहशतवाद

**जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात तब्बल २६ हिंदू पर्यटकांना आपला जीव गमावावा लागला. अशा प्रकारे सामान्य नागरिकांना लक्ष्य करण्याचे दहशतवाद्यांचे हे मनसुबे सर्वस्वी दुर्दैवीच. 'धर्मांध विरुद्ध सश्रद्ध' असा हा संघर्ष दीर्घ काळ चालणारा आहे. इस्लामी धर्मांध दहशतवाद ही तर संपूर्ण जगाचीच डोकेदुखी. त्यांनी तर अमेरिकेलाही सोडले नव्हते. या सगळ्यात आता पाकिस्तानी पुरावे समोर येत आहेत. त्यातील सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, या हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तान पुरस्कृत 'द रेझिस्टंट फ्रंट'ने (टीआरएफ) स्वीकारली. मुळात 'टीआरएफ' या दहशतवादी संघटनेची स्थापनाच काश्मीरमधून 'कलम ३७०' हटविल्यानंतर करण्यात आली आहे. पाकिस्तानसारखी राष्ट्रे असूच नयेत, असे आपल्याला कितीही वाटत असले, तरी जगरहाटीच्या ज्या पद्धती आहेत, त्यांचा फायदा हे लोक घेतात. 'इस्लामी दहशतवादमुक्त भारत' हे आपले स्वप्न नसून हक्क आहे व त्यासाठी आता भारताला कंबर कसावी लागेल.**

लक्ष्यवेध

प्रतिनिधी

भारताचे नंदनवन असलेल्या जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये मंगळवारची संध्याकाळ ही हिंदू पर्यटकांसाठी काळरात्र ठरली. पोलिसांच्या वेशात आलेल्या दहशतवाद्यांनी 'तुमचा धर्म कोणता? तुमचे आयडी कार्ड दाखवा' अशी त्या हिंदू पर्यटकांकडे विचारणा केली. त्यांना 'कलमा' म्हणायलाही सांगितले. एवढेच नाही, तर त्यांची पँट उतरवून ते हिंदूच असल्याची खातरजमा करून घेतली आणि त्यांच्या कुटुंबीयांसोबत या हिंदू पर्यटकांवर बेछूट गोळीबार केला. या निर्घृण हल्ल्यात २६ हिंदू पर्यटकांचा मृत्यू झाला, तर शेकडो जखमींवर अजूनही उपचार सुरू आहेत. हा एकूणच सगळा भाग पठारी असल्यामुळे कोणालाही काही समजण्यापूर्वीच दहशतवाद्यांनी आपला कुटिल डाव साधला आणि क्षणार्धात हिरवेगार पठार हे हिंदूंच्या रक्ताने माखले. हिंदू महिला आणि लहान मुलांच्या आक्रोशाने हिमालयही गहिवरला. भारतात व जगभरात असे हल्ले कोणत्या धर्माचे लोक करतात, हे जगजाहीर आहे. मात्र, स्वतःला 'पुरोगामित्वाचे रक्षणकर्ते' म्हणविणारे लोक आणि त्यांच्या कटात सहभागी होऊन धर्मांधांची मते मिळवणारे राजकारणी 'दहशतवादाला धर्म नसतो,' अशी पिपाणी वाजवायला सुरुवात करतात.

पहलगाम भागातील 'मिनी स्वित्झर्लंड' म्हणून ओखळल्या जाणार्या त्या बैसरन खोर्यातील पठाराची रेकीही करण्यात आली होती. याचाच अर्थ, पर्यटक बहुसंख्येने या ठिकाणी भेटी देतात, याची या दहशतवाद्यांना पूर्ण कल्पना होतीच. एप्रिल-मे महिन्यात काश्मीर पर्यटकांनी अक्षरशः फुलून जाते. त्यामुळे नेमका हाच 'टायमिंग' दहशतवाद्यांनी साधला, जेणेकरून उन्हाळी सुटीचा संपूर्ण सीझन पर्यटक काश्मीरमध्ये पाऊल ठेवण्याआधी शंभरदा विचार करतील. पर्यटनातील संधी रोडावल्यामुळे बेरोजगारी वाढेल आणि पुन्हा काश्मिरींच्या हाती दगड देता येईल, जाळपोळ होईल आणि फुटीरतवाद वाढीस लागेल, हाच यामागील कुटिल हेतू. एवढेच नाही, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी परदेश दौर्‍यावर आणि तेही विशेषकरून सौदी अरबच्या दौर्‍यावर असतानाच हा हल्ला व्हावा, यालाही निव्वळ योगायोग म्हणता येणार नाही. एकीकडे मोदी परदेशात, तर अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. वान्स हे भारत दौर्‍यावर असतानाच, दहशतवाद्यांनी अचूक डाव साधला. अशाच प्रकारे ट्रम्प २०२० साली भारत दौर्‍यावर असताना दिल्लीत दंगली भडकाविण्यात आल्या होत्या. आता 'वक्फ सुधारणा कायद्या'वरून मुस्लीम समाज रस्त्यावर उतरलेला असताना झालेला हा दहशतवादी हल्ला एकप्रकारे सरकारला इशारा देणाराच आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

स्वातंत्र्योत्तर काळापासूनच जम्मू-काश्मीर ही इस्लामिक दहशतवाद्यांमुळे भारतासाठी ठरलेली एक जटिल समस्या ठरली आहे. इंदिरा गांधींनाही काश्मीरप्रश्न सोडविता आला नाही. 'कलम ३७०'चे लोढणे आता कुठे केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरच्या गळ्यातून काढले होते. त्यानंतर लोकशाही मार्गाने निवडणुकाही पार पडल्या आणि जम्मू-काश्मीरमध्ये लोकनियुक्त सरकारही स्थापन झाले. हे सरकार फारुख अब्दुल्ला यांच्या चिरंजीवांचे असले, तरीही त्याला सर्वतोपरि मदत, सहकार्य व सर्व काही करण्याची तयारी देशाच्या पंतप्रधानांनी दाखवली. या हल्ल्यासाठी राज्य सरकार की केंद्र सरकार जबाबदार, हा मुद्दा नाही. मात्र, असे हल्ले का होतात? हे हल्ले कोण करते? हे जगजाहीर आहेच. पण, कौम म्हणून मुस्लिमांकडून अशा गोष्टींचा प्रकर्षाने धिक्कार होताना दिसत नाही. खरे तर पर्यटन हा काश्मीरच्या उदरनिर्वाहाचा एकमेव मार्ग. पर्यटन सुखरुप झाल्यामुळे जम्मू-काश्मीरमध्ये रोजगार रुजायलाही सुरुवात झाली होती. अशा प्रकारचे दहशतवादी हल्ले जम्मू-काश्मीरचे कंबरडे मोडणारे आहेत. धर्मांध इस्लामी विचारांचा प्रभाव, त्यातून आलेली शून्यता आणि या सगळ्याचा परिणाम म्हणून भारतविरोधी विष तरुणांच्या मनात पसरविण्याची स्ट्रॅटेजी; यांमुळे गेल्या ७५ वर्षांहून अधिक काळ काश्मीर धुमसता राहिला. गेली पाच-सात वर्षे काश्मीरमध्ये काहीसे बरे दिवस आहेत, असे वाटत असतानाच, ही संतापजनक व दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमागचा पाकिस्तानी सहभाग हळूहळू उघडकीला येत आहे. या कफल्लकांना स्वतःच्या देशा-तील उपासमारीने मरणार्‍या नागरिकांना खायला द्यायला अन्न नाही. मात्र, शेजारच्या देशांमध्ये धर्मांध विखार पसरविण्यासाठी भरपूर संसाधने उपलब्ध आहेत. खरे तर असे देश अस्तित्वातच असता कामा नये. मात्र, जागतिक राजकारणाच्या रहाटगाड्याचे काही नियम असतात आणि त्याचाच फायदा हे पाखंडी लोक मिळवतात. त्यामुळे अशी पापस्थाने उद्ध्वस्त करावी, असे आपल्याला कितीही वाटत असले, तरी ही समस्या मुळासकट संपविण्यासाठी निरंतर काम करीत राहावे लागते.

या हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तान पुरस्कृत 'द रेझिस्टंट फ्रंट'ने (टीआरएफ) स्वीकारली. मुळात 'टीआरएफ' या दहशतवादी संघटनेची स्थापनाच काश्मीरमधून 'कलम ३७०' हटविल्यानंतर करण्यात आली आहे. प्रारंभी केवळ ऑनलाईन युनिट म्हणून काम करणार्‍या 'टीआरएफ'ने नंतर 'लष्कर-ए-तोयबा'सह अन्य दहशतवादी संघटनांसोबत काम करायला सुरुवात केली.

(पान ४ वर)

# भारताने चालवले सिंधूअस्त्र

**पहलगाम हल्ल्यानंतर भारताने सिंधू जलकरार स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे पाकिस्तानमध्ये सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता कमी होईल, ज्यामुळे अन्न सुरक्षा धोक्यात येईल आणि आर्थिक अस्थिरता वाढणार आहे. भारताने सिंधू पाणीकरार स्थगित ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. हे पाऊल पाक आर्थिकदृष्ट्या अत्यंत गंभीर ठरेल.**

लक्ष्यवेध

पार्थ कपोले

पाक अर्थव्यवस्थेचा मोठा भाग शेतीवर अवलंबून आहे. पाकिस्तानचे कृषी क्षेत्र सिंचनासाठी सिंधू नदी आणि तिच्या पश्चिम उपनद्यांवर (झेलम आणि चिनाब) मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे, जे करारानुसार पाकिस्तानला देण्यात आले आहेत. करारास स्थगितीमुळे भारताला या नद्यांचा प्रवाह नियंत्रित करण्याची शक्ती मिळू शकते. यामुळे पाकमध्ये सिंचनासाठी उपलब्ध असलेले पाणी लक्षणीयरित्या कमी होऊ शकते. सिंचनास धक्का बसल्याने गहू, तांदूळ, ऊस आणि कापूस यांसारख्या प्रमुख पिकांच्या उत्पादनावर गंभीर परिणाम होईल. कृषी उत्पादनात मोठी घट झाल्यास अन्नटंचाई निर्माण होऊ शकते आणि आयातीवरील अवलंबित्व वाढू शकते. यामुळे पाकच्या परकीय चलनसाठ्यावर दबाव

(पान ६ वर)



## १ मे, कामगार दिन विशेष

# मेहनतीला सन्मान, अधिकार एकसमान

**देश जागतिक पातळीवर विकासाच्या नवनवीन पायर्‍या पार करत असताना कामगारांची उत्तम साथ वेगळा वेग प्रदान करेल. या पृष्ठभूमीवर अलिकडच्या कामगार संहितेची महत्त्वपूर्ण भूमिका लक्षात येते. कामगार कायद्यांमधील सुयोग्य बदलामुळे सर्व स्तरांमधील आणि क्षेत्रांमधील कामगारांना सुरक्षित वातावरण प्रदान करण्याचा प्रयत्न आहे. कामगार दिन साजरा करताना ही लक्षवेधी बाब विचारात घ्यावी लागेल.**

निमित्त

आशय अभ्यंकर

कामगार दिनाच्या पृष्ठभूमीवर कामगार संहितेबद्दल बोलणे आणि त्या अनुषंगाने बघायला मिळणार्‍या वा अपेक्षित असणार्‍या बदलांवर चर्चा करणे सयुक्तिक ठरेल. मुळात सुरुवातीपासून मोदी सरकारचे कामगारविषयक धोरण सुस्पष्ट आणि कामगार व मालक या दोन्ही वर्गांमधील दरी तसेच तणाव दूर करण्याचे राहिले आहे. २०१७-१८ पासूनच त्यांनी कामगार प्रश्नांविषयी ठाम धोरणे जाहीर केली. त्याअंतर्गत 'मेहनत को सन्मान, अधिकार एकसमान' या घोषवाक्यानुसार काम सुरू झाले. या मेहनतीचा सन्मान करण्याच्या धोरणांतर्गत संघटित आणि असंघटित या दोन्ही वर्गातील कामगारांबरोबरच रोजंदारी कामगार, रस्त्यावरील विक्रेते आदींच्या हक्क आणि अधिकारांवरही गांभीर्याने विचार केला गेला. प्रामुख्याने कोविडनंतरच्या काळात त्यांच्या लाभाचे नवनवीन प्रस्ताव मांडले गेले आणि त्यानुसार कायदे करून अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली. परिणामी सर्व कामगारांना समान अधिकार या तत्त्वाची पाठराखण होताना आता पाहायला मिळत आहे.

पूर्वी कामगारविषयक धोरणे ठरवताना सरकारकडून पुढे येणार्‍या योजना सरधोपट पद्धतीने आकारात यायच्या. त्यासाठी आधारभूत मानावी अशी कोणतीही ठोस आकडेवारी आपल्याकडे उपलब्ध नव्हती. उदाहरणार्थ वेगवेगळ्या गटांमध्ये किती कामगार कार्यरत आहेत, संघटित तसेच असंघटित क्षेत्रात किती श्रमशक्ती आहे, रोजंदारी तत्त्वावर देशातील किती कामगार काम करतात, रस्त्यावरील विक्रेत्यांची संख्या किती आहे; या संबंधीची कोणतीही माहिती विश्वासार्ह पद्धतीने पुढे आली नव्हती. त्यामुळेच नंतरच्या काळात सरकारने कामगार विषयक धोरण ठरवताना स्पष्ट विचारांती पावले उचलली. त्यासाठी सर्वप्रथम त्या त्या क्षेत्राची सखोल माहिती, आकडेवारी जमा करण्याचे धोरण ठरले. त्यातून पुढे आलेली माहिती समोर ठेवूनच कामगारविषयक कायदे होतील, हेच त्यांचे सुरुवातीपासूनचे धोरण होते. त्यानुसार सविस्तर अभ्यास करून २०२२-२३ मध्ये नवीन कामगार संहिता समोर आली. त्यामध्ये सरकारने



किमान वेतनाची संकल्पना प्रत्यक्षात आणली आणि सार्वत्रिक केली. त्यामुळेच कामगारांना निर्धारित वेळेत किमान वेतन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. आता कोणत्याही क्षेत्रात काम करणार्‍या कामगारांना या नियमांचा मोठा फायदा मिळत असल्याचे दिसत आहे. आपण केलेल्या कष्टाचे, कामाचे पैसे वेळेत मिळाल्यास अनेक तक्रारी, अडचणी दूर होतात. हे लक्षात घेता आता वेळेत मोबदला मिळत असल्याचा लाभ कामगार वर्गाला मिळत आहे. पूर्वी कामगार वर्गाला कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरणाची हमी नव्हती. काम करताना आपण सुरक्षित आहोत का, हा प्रश्न कायमच भेडसावत असायचा. मात्र, नव्या कामगार कायद्यांमध्ये कामगारांच्या जीविताच्या सुरक्षेला अत्यंत महत्त्व दिले गेले आहे. साहजिकच यामुळे कार्यस्थळाचे वातावरण सुधारले आणि काम करणे सुरक्षित तसेच सुसह्य झाले. एकदा या दोन्ही गोष्टी हातात आल्या की, कोणत्याही उद्योगव्यवसायाची वाढ आणि विकास सहजशक्य होतो. पुढे जाऊन सरकारने कामगारविषयक प्रश्नांवर सामाजिक सुरक्षेचा मुद्दाही चर्चेत घेतला.

पूर्वी प्रॉव्हिडंट फंडची संकल्पना होती. आता सरकारने सोशल सेक्युरिटी फंडची संकल्पना मांडली. ही संकल्पनाही कामगारांच्या आर्थिक हिताचे रक्षण करणारी आहे. उदाहरणार्थ कोणत्याही कारणास्तव एखादा कामगार काम करू शकणार नसेल, तो अथवा ती दुसर्‍या क्षेत्रामध्ये कामाला लागले वा अकस्मात मृत्यूसारख्या घटना घडल्या तर अशा कोणत्याही बदलाच्या काळात त्यांना सोशल सेक्युरिटी फंडाची मोठी मदत मिळते. वर उल्लेख केलेल्या कारणांमुळे येणारी अस्थिरता हाताळण्यास त्यांना आर्थिक हातभार मिळणे शक्य होते. त्यामुळे ही बाबही उल्लेखनीय म्हणायला हवी. नवीन कामगार संहितेतील आणखी एक उत्तम बाब म्हणजे याने कामगारविषयक कायद्यांमधली क्लिष्टता कमी केली. पूर्वी कामगारविषयक तब्बल २९ कायदे होते. आता ते केवळ चार लेबर कोडमध्ये समाविष्ट करून घेतले गेले आहेत. या सगळ्यामागे कामगारांना कार्यस्थळी सुरक्षित आणि सुसह्य वातावरण देणे हाच विचार आहे. साहजिकच या नव्या आणि बदलत्या संकल्पनेत विकसित भारत, आत्मनिर्भर भारत, ईज ऑफ लिव्हिंग, ईज ऑफ डुईंग बिझनेस या सर्व धोरणांचा समावेश आहे. खेरीज 'मेहनतीचा सन्मान आणि समान अधिकार' हे तत्त्व प्रत्यक्षात येण्यासाठी योग्य ती परिस्थिती निर्माण करण्यास पुढाकार घेतलेला आहे.

थोडक्यात सरकारने व्यक्त केलेल्या वरील ध्येयाच्या दिशेने वाटचाल करण्यात कामगारविषयक प्रश्नांची उकल महत्त्वपूर्ण भूमिका बजावताना दिसत आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे या बदलत्या विचारांची आता कुठे ओळख झाली आहे. त्याच्या अंमलबजावणीला नुकतीच सुरुवात झाली आहे. स्वाभाविकच त्याचे परिणाम दिसण्यासाठी आपल्याला थोडी वाट पाहावी लागेल. हा कायदा जुलै २०२२ चा असल्यामुळे आत्ता कुठे त्याला दोन वर्षांचा अवधी उलटला आहे. मात्र, नजिकच्या भविष्यात निश्चितच त्याचे लाभ अनुभवता येतील. कार्यस्थळातील सुरक्षा व्यवस्था, किमान वेतन, वेतन वेळेत मिळण्याची खात्री, सामाजिक सुरक्षा आदी पातळ्यांवर नियम कडक केल्यामुळे कामगारांच्या जीवनशैलीत आणि आर्थिक स्थितीत चांगले पडसाद बघायला मिळतील, याची खात्री वाटते. महत्त्वाचे म्हणजे नियम आणि कायद्यांमधील ही स्पष्टता कामगार आणि मालकांमधील संबंध चांगले ठेवण्यास मदत करेल.

(पान ४ वर)

# भस्म विलोपित रूप साजिरे...

शुक्रवार, १८ एप्रिल २०२५ या दिवशी 'गुड फ्राय डे' झाला. त्याच्या साधारण ४० दिवस अगोदर जो बुधवार येईल, त्याला 'अॅश' वेइनसडे' असे म्हटले जाते. तो दिवस यंदा ५ मार्च २०२५ रोजी पार पडला. येशु ख्रिस्त किंवा मूळ नाव ईसा नाझरथ हा स्वतः च्या वयाच्या १२ व्या वर्षी जेरुसलेमच्या प्रसिद्ध देवळात गेला. तिथल्या जत्रेत तो हरवला म्हणून त्याचे आई-बाप मेरी आणि जोसेफ हे त्याला शोधत-शोधत पुन्हा देवळात गेले तर त्यांना येशू तिथे विद्वान पंडितांबरोबर धर्मचर्चा करीत बसलेला दिसला. यानंतरची १८ वर्षे येशू कुठे होता, हे कुणालाही माहीत नाही. म्हणजे कोणत्याही ख्रिश्चन धर्मग्रंथात त्याबद्दल काहीही उल्लेख नाही. स्वतः ख्रिश्चनच बसणाऱ्या अनेक विद्वान संशोधकांच्या मते असलेले उल्लेख मुद्दाम दडपून टाकण्यात आलेले आहेत. कोणत्या कारणाने? कारण अगदी साधे, सोपे आणि सरळ आहे. येशू त्या काळात भारतात आला होता. योग्य गुरूच्या शोधार्थ तो काश्मीरपासून जगन्नाथपुरीपर्यंत फिरला. मग तो पुन्हा पॅलेस्टाईनमध्ये गेला.

सुमारे तीन वर्षे तो पॅलेस्टाईन भागात फिरत होता. त्याने अनेक चमत्कार केले. सामान्य लोकांना उपदेश केला. त्याच्या अनुयायांची संख्या वाढत चाललेली पाहून, त्याच्या मूळ उपासना पंथाचे म्हणजे ज्यू धर्माचे धर्ममार्तंड खवळले. त्यावेळी पॅलेस्टाईनवर राज्य करणाऱ्या रोमन सत्ताधाऱ्यांकडे त्यांनी येशूची तक्रार केली. रोमन सुभेदार पाँटियस पिलात किंवा पिलेट याने तक्रारदारांच्या आग्रहानुसार येशूला देहान्त शिक्षा दिली. फाशी देणे, सुळावर चढवणे, शिरच्छेद करणे याप्रमाणेच तत्कालीन पॅलेस्टाईनमध्ये क्रूसावर खिळवून मारणे, ही देहान्त शिक्षेची पद्धत प्रचलित होती. त्यानुसार रोमन सैनिकांनी येशूला क्रूसावर चढवून ठार केले. त्याच्या काही अनुयायांनी त्याचा मृतदेह क्रूसावरून खाली काढून दफन केला. हे सगळे वासंतिक विषुवदिनानंतरच्या शुक्रवारी घडले. म्हणून मुळात तो 'ब्लॅक फ्रायडे' होता. पण दोन दिवसांनंतर म्हणजे रविवारी सकाळी येशूच्या अनुयायांना आढळले की, येशू पुन्हा जिवंत झाला आहे. या चमत्काराला 'रेझरेक्शन' पुनरुत्थान असे म्हटले जाते.

ख्रिश्चन धर्मातला हा सर्वोच्च चमत्कार आहे. त्यानंतर गेल्या दोन हजार वर्षांत कोणताही स्वनाम धन्य ख्रिश्चन संत अथवा संतीण असा चमत्कार करून दाखवू शकलेले नाहीत. पुनरुत्थान झालेला येशूनंतरचे ४० दिवस पॅलेस्टाईन प्रदेशात चमत्कार करीत आणि उपदेश करीत भ्रमंती करीत होता. ४० व्या दिवशी तो जेरुसलेमजवळ माऊंट ऑलिव्ह या टेकडीवर आला. तिथे त्याने अनुयायांसमोर प्रवचन केले. त्याला म्हणतात 'सर्मन ऑन द माऊंट.' ते प्रवचन आटोपल्यावर येशू सदेह स्वर्गाला गेला. आज त्या जागेवर एक चर्च आहे. त्याचे नाव आहे 'द चर्च ऑफ होली सेपल्कर.' सेपल्कर म्हणजे समाधी, अर्थ स्पष्टच आहे, हे येशूच्या पवित्र समाधीवर बांधलेले प्रार्थना मंदिर आहे.

येशू वयाच्या १२ व्या वर्षांपासून ३० व्या वर्षांपर्यंत म्हणजे १८ वर्षांच्या कालखंडात भारतात येऊन आध्यत्मिक गुरूच्या शोधात फिरत होता, ही गोष्ट आधुनिक चर्च अधिकारी का लपवून ठेवतात? कारण ते उघड केले तर हिंदू धर्माचे श्रेष्ठत्व मान्य करावे लागते ना! हिंदू धर्म हा भुताखेतांचा, राक्षसांचा, सैतानाचा 'हीदन' किंवा 'पेगन' म्हणजे रानटी धर्म आहे, असे म्हणता येत नाही ना! म्हणून मग येशूच्या पॅलेस्टाईनमधल्या पुनरागमनापासून पुढचा भाग फक्त दाखवत राहायचा. आमचा देव बघा, कसा गोरगरिबांसाठी, दीनदुबळ्यांसाठी बळी गेला, असे गहिवर काढत भोळ्याभाबड्यांना शेंड्या लावायच्या.

संशोधकांच्या मते येशूचे आकाशातल्या ढगात अदृश्य होणे हाही एक चमत्कारच होता. तो स्वर्गाला गेला नसून अज्ञातवासात गेला आणि पॅलेस्टाईनमधून पुन्हा भारतात काश्मीर प्रदेशात आला. तिथे आणखी १६ वर्षे व्यतीत करून त्याने वयाच्या ४० व्या वर्षी योगसमाधी घेतली, ही ख्रिस्तसमाधी आजही काश्मीरमध्ये रोझाबाल या ठिकाणी आहे. आधुनिक चर्चला अर्थातच हे देखील मान्य नाही. ज्यांचा हिंदू योगशास्त्राचा अभ्यास आहे, वाचन आहे, त्यावर विश्वास आहे किंवा अनुभव आहे. त्यांच्या दृष्टीने, येशूने पॅलेस्टाईनमध्ये करून दाखवलेले चमत्कार म्हणजे हस्त स्पर्शाने रोग बरे करणे, पाण्यावर चालून जाणे, हृदयात आणि डोक्यात खिळे ठोकलेले असतानाही जिवंत राहणे, आकाशात उडून ढगात अदृश्य होणे वगैरे गोष्टी म्हणजे अगदी प्राथमिक पातळीवरचे चमत्कार आहेत.

योगाभ्यासाच्या प्रारंभीच्याच काही पातळ्यांवर साधकाला अशा गोष्टी घडवून आणणाऱ्या सिद्धी प्राप्त होतात. परंतु खरा योगसाधक असल्या सिद्धींमध्ये अडकून न पडता पुढे जात राहतो, असे हिंदू अभ्यासक मानतात. कारण चमत्कार करून दाखवणे हे त्यांचे उद्दिष्ट नसते. नंतर आत्मसाक्षात्कार झालेला एखादा योगी किंवा लोक ज्याला संत म्हणतात तो, सर्वसामान्य समाजाला खऱ्या धर्माकडे वळवण्यासाठी क्वचित चमत्कार घडवतो. कारण चमत्काराशिवाय नमस्कार नाही.



ख्रिश्चन धर्माच्या बाबतीतला खरा चमत्कार हा आहे की, त्याचा उद्गाता येशू हा अनुयायांच्या दृष्टिआड होऊनही हा संप्रदाय टिकला कसा नि वाढला कसा? येशूच्या कथित स्वर्गगमनानंतर त्याच्या अनुयायांना रोमन राज्यकर्त्यांना पॅलेस्टाईनमधून हद्दपार केले, ते दशदिशांना पळाले. मुख्यतः इजिप्तमध्ये गेले. तिथे त्यांना 'ख्राईस्ट'चे अनुयायी म्हणून 'ख्रिश्चन' हे नाव मिळाले. पण प्रत्येक ठिकाणी हे ख्रिश्चन लोक येशूच्या नावाने एक मठ स्थापन करून त्यांचा संप्रदाय वाढवत राहिले. दिवसेंदिवस हा संप्रदाय लोकप्रिय होत गेला.

मुख्य गुरू जागेवर नसताना, त्याच्या शिष्यांनी प्रवर्तित केलेली अशी कोणती विचारसंपदा होती की, तत्कालीन सामान्य जनतेला आकर्षक वाटली? की, जिच्यामुळे लोक मोठ्या संख्येने या संप्रदायाचे अनुयायी बनले? हा खरा चमत्कार किंवा अभ्यासाचा, जाणून घेण्याचा विषय आहे. नंतरच्या ३०० वर्षांमध्ये हा संप्रदाय इतका फोफावला की, डळमळणारे रोमन साम्राज्य स्थिर ठेवण्यासाठी तत्कालीन रोमन सम्राट कॉन्स्टन्टाईन याला या लोकप्रिय संप्रदायाचा स्वीकार करावा लागला. पोप सेंट सिल्व्हेस्टर याच्या हस्ते त्याने ख्रिश्चन धर्म स्वीकारला, असे म्हटले जाते. आता जो सम्राटाचा धर्म तोच प्रजेचा धर्म या न्यायाने हळूहळू संपूर्ण रोमन साम्राज्यातील नागरिक ख्रिश्चन बनले. जे बनले नाहीत त्यांना पुढच्या काळातल्या पोप लोकांनी जबरदस्तीने बाटवले. आता तत्कालीन रोमन साम्राज्य संपूर्ण युरोप खंडासह उत्तर आफ्रिका आणि आशिया खंडातही पर्शियापर्यंत पसरलेले होते.

एवढ्या विस्तीर्ण प्रदेशातल्या अनेक जनसमूहांना खुशीने अथवा सक्तीने ख्रिश्चानिटीच्या एकाच छत्राखाली आणताना पोप लोकांनी अनेक तडजोडी केल्या. या जनसमूहांच्या मूळ उपासना पद्धतीमधल्या अनेक गोष्टी या येशूच्या किंवा त्यांच्या प्रमुख शिष्यांच्या जीवनात घडलेल्या आहेत, असे दाखवून त्यांना ख्रिश्चानिटीत सामावून घेण्यात आले, त्यासाठी अनेक दंतकथा, कहाण्या नव्याने घडवण्यात आल्या, रचण्यात आल्या.

रोमन लोकांमध्ये 'मिथ्र' या देवतेचा उपासना संप्रदाय फारच प्रबळ होता. रोमनांना म्हणे पर्शियन लोकांकडून 'मिथ्र' देवतेची उपासना मिळाली. या उपासकांची अशी समजूत होती की, २५ डिसेंबर या दिवशी 'मिथ्र' जन्मला आणि वसंत ऋतूतल्या विषुवदिनाला त्याचे राज्यारोहण झाले. 'मिथ्र' सांप्रदायिकांना ख्रिश्चानिटीत सामावून घेताना पोप लोकांनी कशी गंमत केली पहा.

येशू ख्रिस्ताचा खराखुरा जन्म कुठेच नोंदवलेला नव्हता तर त्याचा जन्म २५ डिसेंबरला झाला, अशी कथा निर्माण केली. येशू विषुवदिनानंतरच्या शुक्रवारी वधस्तंभावर चढला आणि रविवारी पुनर्जीवित झाला, एवढे माहीत होते, ती घटना 'मिथ्र'च्या राज्यारोहण दिनाशी जोडून 'ब्लॅक फ्रायडे'ला 'गुड फ्रायडे' आणि मग येणाऱ्या रविवारला 'ईस्टर' म्हणण्यात आले. इसवी सनाच्या ६ व्या शतकात होऊन गेलेला एक पोप ग्रेगरी द ग्रेट याने या 'ईस्टर संडे'च्या ४० दिवस आधी येणाऱ्या बुधवारला अॅश वेड्नसडे' म्हणून साजरा करायला सुरुवात केली. यंदा हा दिवस ५ मार्च २०२५ ला झाला. ख्रिश्चन उपासना संप्रदायातले कॅथलिक, प्रोटेस्टंट, ऑर्थोडॉक्स आदी सर्व पंथोपपंथ हा दिवस मानतात.

चर्चमधले प्रमुख पाद्री आपल्या प्रार्थनेच्या पीठावर एका काथवटामध्ये माडाच्या झांवळ्या जाणून त्याची राख बनवतात. मग प्रत्येक भाविकाच्या कपाळावर बोटाने ती राख, एक उभी रेघ, एक आडवी रेघ अशा क्रूसाच्या आकृतीत लावली जाते. 'लक्षात ठेव, तू राख आहेस आणि राखेतच तुला परतायचे आहे,' अशा आशयाचे लॅटिन मंत्र पाद्री पुटपुटतो.

आता गंमत पहा हं! ॲरिस्टॉटल हा प्रख्यात ग्रीक तत्त्ववेत्ता इसवी सन पूर्व चौथ्या शतकात ग्रीसमध्ये होऊन गेला. त्याही काळात युरोपात ज्यू लोक होतेच. त्यापैकी काही लोकांनी ॲरिस्टॉटलला असे सांगितले की, आम्ही मूळचे भारतातले आहोत. आता भारतातले म्हणजे कुठचे, ते मात्र माहीत नाही. येशू हा मुळात ज्यू होता, हे आपल्याला माहीतच आहे. अनेक संशोधकांचे असे म्हणणे आहे की, येशूचे वधस्तंभावरचे शेवटचे वाक्य- 'परमेश्वरा त्यांना क्षमा कर-' मूळ आर्माइक हिब्रू भाषेतील वाक्य 'एली एली लामा साबाकधनी' हे प्राचीन तामिळ भाषेतले वाक्य आहे. म्हणजे ज्यू हे प्राचीन हिंदू तामिळ भाषिक लोक असावेत. आंध्र आणि तामिळनाडूमधून जसे हिंदू लोक आग्नेय आशियात गेले, तसेच ते इजिप्त आणि पॅलेस्टाईन, नंतर पुढे युरोपातही गेले. हे हिंदू तामिळ शैव पंथीय असावेत. त्यातही ते मुख्यतः कापालिक वगैरे गुप्त तांत्रिक

शैव पंथीय असावेत. एकंदर शैव पंथात भस्म किंवा विभूती या वस्तूला फार महत्त्व आहे. शिवपिंडीला भस्मलेपन करण्याबरोबरच साधकाने स्वतःच्या अंगाला भस्म लावणे, त्यातही शरीराच्या विशिष्ट चक्रांवर भस्मलेपन करणे, हा एक मोठा विधीच आहे. शैव गुप्त पंथांमध्ये तर विविध वृक्षांची पाने, फळे, खोडे यांच्याचप्रमाणे मानवी चिताभस्माला फार महत्त्व आहे. याबाबत 'शिवलीलामृत' या ग्रंथात बऱ्याच कथा आहेत. त्यातला अद्भुततेचा भाग बाजूला ठेवला तरी काहीतरी तथ्य आहेच. पोप ग्रेगरीने यातला भारत, हिंदू, तामिळ, शैव वगैरे सगळा भाग बाजूला ठेवला आणि वर्षातून एकदा वासंतिक विषुवदिन म्हणजे २१ किंवा २२ मार्च पूर्वीच्या बुधवारला भस्मलेपन दिवस ठरवून टाकला. (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

---

सुखात्म

**डॉ. अविनाश मोहरील**

# आनंद घंटा

आपल्याला आयुष्यात आनंद मिळवायचा असेल तर खूप कष्ट घ्यावे लागतात, असे बऱ्याच मंडळींना वाटत असते. त्यामुळे त्या समजापोटी आनंद निर्मितीच्या सोप्या सोप्या प्रक्रिया त्यांना ठाऊक नसतात. परंतु मुळात आनंद निर्मितीची प्रक्रिया ही कष्ट किंवा पैसा या बाबींशी निगडित नसून प्रवृत्तीशी निगडित आहे.

जीवनावर मनापासून प्रेम करून वेगवेगळे क्षण साजरे करण्यासाठी त्या प्रवृत्तीसोबत कल्पकता हवी असते. कल्पकता असली की, जीवनातील अपरिहार्य असलेली दुःखे अचानक आनंदामध्ये परावर्तित होऊ शकतात. त्या कल्पकतेमुळे सामान्य पद्धतीने जीवन जगणाऱ्या व्यक्तीच्याही जीवनात आनंदाची बरसात होऊ शकते. त्याचे नेहमीचे आणि तेच ते वाटणारे रुटीन आयुष्य त्याला सुंदर भासू लागते; या सोबतच अशी व्यक्ती तिच्या सहवासातील इतरांनाही जीवनाचा आनंद मिळवून देऊ शकते. अशा पद्धतीची कल्पकता, त्या कल्पकतेची गंमत आणि त्यामधून सर्व वयोगटाच्या मंडळींना मिळणारा आनंद याची सांगड घालणारी एक मजेदार गोष्ट मला नुकतीच बघायला मिळाली. ती गोष्ट होती एका दुकानासमोर त्या अत्यंत कल्पक दुकानदाराने बांधलेली घंटा. आपण सर्व मध्यमवर्गीय मंडळी किराणा कशाप्रकारे आणतो? प्रश्नाने चमकलात? विचार करून बघुया. काही घरी महिला आणि काही घरी पुरुष आणि काही मोजक्या घरी दोघे मिळून किराणा आणायला जातात. किराणा आणण्याच्या दोन-तीन पद्धती आहेत. सर्वात सोपी पद्धत म्हणजे घरून तयार केलेली यादी व पिशव्या घेऊन निघणे, इतर कोणतेही काम करायला जाताना यादी व पिशव्या किराणाच्या दुकानात जाऊन देणे व परत येताना त्या पिशव्या उचलून आणणे. ही पद्धत सहसा पुरुष मंडळी अवलंबताना दिसतात. याउलट महिला मंडळी दुकानात जाऊन प्रत्येक वस्तू समोर काढायला लावून मग किराणा आणतात. सोबतच घरपोच किराणा ही देखील एक पद्धत प्रचलित आहे. गेल्या काही वर्षांत यामध्ये आणखी एक पद्धत समाविष्ट झालीय. विशेषतः शहरी भागात किराण्याचे मॉल्स तयार झाले. त्यामुळे किराणा खरेदीचा एक वेगळा प्रकार निर्माण झाला.



भल्या मोठ्या दुकानात जायचे, ट्रॉली घ्यायची आणि मग मनसोक्त खरेदी करीत जायचे. तेथे खूप साऱ्या वस्तू व त्या वस्तूंचे विविध प्रकार उपलब्ध असतात. त्यामुळे किराण्याचा आकार व पर्यायाने बिलाचा आकार वाढतो. ही पद्धत कधीकाळी वापरण्यासाठी चांगली आहे. शिवाय यात खूप वेळ जातो, असाही एक सूर ऐकायला मिळतो. त्यापेक्षा पिशव्या नेऊन ठेवण्याने कामात काम होते व घरचेही इतर एखादे काम आटोपून टाकता येते, असे बऱ्याच मंडळींचे मत असते. एकंदरीत किराणा आणणे हे महिन्यातून एकदा करावयाचे काम आहे व ते इतर कामांच्या यादीप्रमाणे पार पाडले जाते. परंतु फार कमी लोक असतात ज्यांच्याकरिता किराणा आणणे किंवा घरातील महिन्याकाठी करावयाची कामे म्हणजे आनंद क्षण असतात. घरचा किराणा आणणे ही एक अत्यंत आनंदाची बाब असू शकते. त्यामधून आपल्याला खूप छान सुखाचे क्षण मिळू शकतात व महिन्याकाठी तो आनंद आपण मिळवायलाच हवा, अशा पद्धतीचा विचार शिकविणारी ती आनंद घंटा ही संकल्पना मला त्या पुण्याच्या एका मोठ्या किराणा दुकानासमोर बघायला मिळाली. किराणा मॉल या सदरात मोडणारेच ते दुकान होते, ज्यामध्ये मी वर उल्लेख केल्याप्रमाणे वेगवेगळ्या वस्तू मांडून ठेवलेल्या होत्या व त्याची मनसोक्त खरेदी आपल्याला करता येते. दुकानात प्रवेश करतानाच माझे लक्ष त्या आनंद घंटेकडे गेले होते.

अगदी दुकानासमोरच ती घंटा टांगली होती व त्याची दोरी खालपर्यंत म्हणजे कुणाचाही हात पोहोचू शकेल अशी बांधली होती. म्हणजे अगदी तीन वर्षाच्या लहानग्याला देखील ती घंटा वाजविता येईल, याची काळजी घेतलेली होती. घंटेवर मोठ्या अक्षरात 'हॅपी बेल' असे लिहिले होते. त्या दोरीला लावलेल्या बोर्डवर एक सुंदर संदेश लिहिला होता- 'किराणा खरेदी करणे ही आपल्यासाठी एक आनंद पर्वणी आहे. आज आमच्या दुकानात आपण जर हे आनंद क्षण मिळवू शकलात तर परत जाताना ही घंटा वाजवून आपल्या आनंदाचे प्रकटीकरण करा. त्यामुळे आमचा आनंद द्विगुणीत होईल!' ते वाक्य वाचून मी खरोखरीच काही क्षण तेथे थांबलो व मला त्या दुकानदाराच्या कल्पकतेचे कमालीचे कौतुक वाटले. किती छोटी परंतु किती सुरेख कल्पना आहे ही! दुकानात प्रवेश घेतेवेळीच तेथे कसे वावरायचे आहे, हे आपल्याला सूचित करणारी ती सूचना काय अफलातून होती. त्या दोन ओळींनी मनावर असा काही परिणाम होतो की, दुकानात शिरल्यावर आपण वेगवेगळ्या वस्तू तर विकत घेतोच; सोबत आपल्याला आनंद मिळवायचा आहे, ही गोष्ट मनात असल्याने तो प्रत्यक्ष मिळतोदेखील. त्या संदेशामुळे ते महिन्याकाठी पार पाडायचे काम राहात नाही तर ती खरोखरीच एक आनंदयात्रा बनते.

माझ्या समोरच एक आई तिच्या चार वर्षाच्या मुलीला सोबत घेऊन किराणा खरेदी करीत होती. त्या दोघी कदाचित तेथे नेहमीच येत असाव्या. ती आई मुलीला सारखी त्या पाटीवरील संदेशाची आठवण करून देत होती. जेथे जेथे ती पोर काही गोष्ट घेण्यासाठी हट्ट करीत होती व ती गोष्ट अनावश्यक असेल तर ती आई तिला आठवण करायची, 'बेटा आपल्याला हॅपी बेल वाजवायची आहे ना? त्यामुळे हट्ट न करता हॅपी राहून खरेदी करायची. तू जर हट्ट केलास तर मग ते काका तुला बेल वाजवू देणार नाही.' आश्चर्य म्हणजे आपल्याला ती 'हॅपी बेल' वाजवायची आहे, या आनंदामुळे ती पोर हट्ट सोडून द्यायची व निमूटपणे आईचे ऐकायची. हा सारा प्रकार मला फारच गोड वाटत होता. मी देखील नकळत त्या बेल वाजविण्याच्या इच्छेने एका वेगळ्या आनंदासह खरेदी केली. परत जाताना ती छोटी पोर अतिशय आनंदाने ती बेल वाजविताना मला दिसली. याहू करत तिच्या आईनेही बेल वाजविली. किराणा खरेदी करण्यासारखी एक रुटीन गोष्ट अत्यंत आनंददायी बनविणाऱ्या त्या कल्पक दुकानदाराचा हात हातात घेऊन मी त्याचे मनापासून कौतुक केले. साऱ्या वस्तू सुंदर डिझाईनच्या कापडी पिशव्यांमध्ये त्याने मला भरून दिल्या. दुकानातून बाहेर पडताना पायऱ्यांजवळच्या त्या बेलकडे मी एक मिनीट बघितलं. ती छोटीशी निर्जीव गोष्ट किती जणांना आनंद देत होती.

किराणा खरेदीचा मनसोक्त आनंद आठवून मी हलकेच याहू म्हणालो आणि बेल वाजविली. बाजूला उभ्या असलेल्या मुलीने मला मी बेल वाजविल्याबद्दल एक मस्त टॉफी दिली. ती टॉफी चघळत, एका कल्पक आनंदयात्रेमध्ये सहभागी झाल्याचा आनंद स्मरत मी निघालो. त्या टॉफीची चव आणि त्या आनंदाचा आठव अद्याप मनःपटलावर रेंगाळतोय. प्रशांत दामलेंच्या नाटकातील गाण्याच्या ओळी आठवतात...

(पान ६ वर)

---


प्रबंधांची बीजे

**श्रीरंग श्री. हिर्लेकर**

# डावखुऱ्यांची संख्या कमी का ?

१४० कोटी लोकसंख्येच्या भारतात अंदाजे १२ कोटी म्हणजे १० टक्क्यांहूनही कमी लोक डावखुरे आहेत. उजवेल लोकांच्या तुलनेत हे प्रमाण अतिशय कमी असण्याची काय कारणे असावीत? डावखुरे असणे ही नैसर्गिक प्रवृत्ती असूनही विनाकारण डावे अशुभ आणि उजवे शुभ हा गैरसमज दिसतो.

सर्व शुभ पूजाकर्मात उजव्या हाताचा व उजवीकडील तांत्रिक कर्मांचा उपयोग असतो तर काही अशुभ क्रियाकर्मांकरिता डावा हात व डावी दिशा सांगितली आहे. फार काय पण शब्दप्रयोगातही कमीजास्त या अर्थाने डावे-उजवे करणे हा वाक्प्रचार आहे. जन्मतः आपला कोणता हात अधिक बळकट हे गर्भातच ठरलेले असते. मात्र अशुभाचा शिक्का बसल्याने पालक बालकाला लहानपणीच त्याच्या डाव्या हाताऐवजी उजव्याचा प्रयोग करण्यास भाग पाडतात. सवयीने तो तसे करतोही, पण यात त्याची नैसर्गिक प्रवृत्ती बदलल्याने त्याच्या मेंदूवर काही अनिष्ट परिणाम होतो का, हे ठरवायला हवे. काही जण लिहिताना उजव्या तर अनेक कामे डाव्या हाताने करतात. फलंदाजी उजव्या तर गोलंदाजी डाव्या हाताने करणारे अपवाद आहेतही.



सव्यसाची : श्रीराम आणि अर्जुन या दोघांजवळ बाणांचे दोन अक्षय भाते होते. भाते जर अक्षयच होते तर ते दोन असण्याची गरजच काय? त्याचे कारण असे की, ते दोघेही सव्यसाची म्हणजे दोनही हातांचा सारख्याच कौशल्याने उपयोग करणारे धनुर्धर होते. अशी उदाहरणे अपवादात्मकच म्हणायला हवीत.

**डावखुऱ्यांच्या समस्या :** या लोकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. परीक्षा वेळेस बेंचवर डाव्या बाजूची जागा असेल तर लिहिणे सोयीचे होते. याचप्रमाणे पंगतीत डाव्या बाजूची जागा, पानातील सतत लागणारी भाजी डावीकडे आणि अधूनमधून खाण्याची चटणी-लोणची उजवीकडे वाढल्यास सोयीचे होते. त्यांना कारच्या गिअर रॉडची सध्याची डावी जागा अडचणीची ठरते. घरातील विजेच्या स्विचेसची आणि संगणकाच्या माऊसची दोन क्लिक बटने त्यांच्या सोयीने असल्यास कामे भरभर करता येतात. (संगणकाच्या सेटिंगमध्ये माऊस बटनांची पद्धत बदलण्याची सोय असते.) हार्मोनियमवरील स्वरपट्ट्या पण सध्याच्या उलट दिशेने ठेवल्या तर डावखुऱ्यांना अधिक सोयीचे ठरेल. त्यांच्या या आणि अशा अनेक समस्यांच्या निराकरणाकरिता लेफ्ट हॅन्डर्स असोसिएशन काम करत आहे.

'इंडियनलेफ्टहॅन्डर्सक्लब. कॉम' या नावाची त्यांची वेबसाईटपण आहे. विलक्षण बुद्धिमत्ता, प्रतिभा, टोकाची वागणूक, जागतिक कीर्तीचे आणि यशस्वी व्यक्तिमत्त्वे घडण्याचा संबंध डावखुरे असण्याशी असावा का हा संशोधनाचा मुद्दा आहे. डावखुरे असण्याचा शरीर आणि मानसिक व्यक्तिमत्त्व विकासाशी चांगला अथवा वाईट संबंध कसा असावा, यावरही संशोधन आवश्यक आहे. अल्बर्ट आईन्स्टाईन डावखुरे होते. ॲडॉल्फ हिटलर, महात्मा गांधी, अमिताभ बच्चन अशी ठळक उदाहरणे आठवतात.

**मुळात उजव्या लोकांची संख्या अधिक का?**

आपल्या मेंदूतील विविध केंद्रे आपल्याला विविध कामे करण्यात प्रावीण्य देतात हे खरे असले, तरी प्रामुख्याने मेंदूचा उजवा भाग डाव्या शरीराला आणि डावा भाग उजव्या शरीराला सांभाळतो. यापैकी जो भाग अधिक सक्षम त्याप्रमाणे आपले विरुद्ध अंग अधिक बलवान ठरते.

साहजिकच मेंदूचा डावा भाग अधिक बलवान असणाऱ्यांची आणि म्हणून उजवेल लोकांची संख्या अधिक असली पाहिजे. हे असे का असावे? यावर सखोल संशोधनाची आवश्यकता आहे. निष्कर्षास येण्यापूर्वी आपण काही उदाहरणे तपासणे अगत्याचे आहे.

१) **फळाचे देठ आणि माणसाची नाभी :** पपईसारख्या एखाद्या मोठ्या फळाचे देठ काढून बघितल्यास ती जागा आणि माणसाची नाभी यांच्यात विलक्षण साम्य आढळते. दोन्ही अंतर्वक्री असून त्यांची वर्तुळाकार दिशा समान असते. फार क्वचित यांची दिशा विरुद्ध आढळते. फळाचे देठ आणि आपली नाळ म्हणजे झाडापासून फळाचे आणि आईपासून बाळाचे पोषण करणारी नलिका. हिच जागा आणि हिची वर्तुळाकार दिशा आपला डावखुरे अथवा उजवेलपणा ठरवत असावी?

२) **आनुवंशिकता:** डावखुरे असणे याबाबतीत आनुवंशिकता आढळते हे लक्षात आले आहे. यावर अधिक विचार व्हावा.

३) **नित्य पूजेत असणारा शंख:** गोगलगाय सरपटत स्वत:च्या भोवतीचे ओलसर आवरण बाहेर टाकते, ते वाळते आणि ते म्हणजे शंख. उपलब्ध शंखांच्या संख्येत डावे शंख अधिक तर उजवे दुर्मिळ असतात. त्यांची अंतर्गत रचना एकमेकांविरुद्ध असते. अर्थात यात डावे कोणाला म्हणावे आणि उजवे कोणाला हे आपण त्यांच्या कोणत्या बाजून बघतो यावरून ठरते.

४) **भिंतीवर किंवा दोरीच्या साहाय्याने चढणारी वेल :** ती एकाच ठरावीक दिशेने पसरत जाते. आपण बळजबरीने तिची दिशा बदलायचा प्रयत्न केला तर वेल एकतर वाळून जाते किंवा पुन्हा दिशा बदलून तिच्या नियत मार्गानेच वाढत जाते.

५) अनेक हालचाली या पण अशाच ठरावीक दिशेने होत असतील तर त्या सुलभ होतात. उदा. नळाच्या पाण्यातून पडणारी धार ही नळ आणि पाईपचे कनेक्शन मुद्दाम विशिष्ट दिशेने केलेले नसेल तर नैसर्गिकरीत्या ठरावीक दिशेने आवर्तन घेत पडते तसेच स्वत:भोवती गिरकी घेत नर्तन करणारी नर्तकी, नदी प्रवाहातील भोवरा, हवेतील वादळे... इत्यादी.

६) आपण दोरी, स्प्रिंग किंवा स्क्रू तयार करताना काही विशेष यांत्रिक आवश्यकता नसेल तर त्यांची बांधणी घड्याळाच्या दिशेनेच केली जाते. तसे करणे ही आपली नैसर्गिक प्रेरणा असते. मुद्दाम कोणी काही उलट रचना करत नाही.

७) **कोरिओलिस परिणाम :** भौतिकशास्त्रात पृथ्वी भ्रमणाची दिशा, हवेचा, गुरुत्वाकर्षणाचा दाब व त्यांची दिशा या सर्वांच्या एकत्रित परिणामाला कोरिओलिस परिणाम म्हणतात. पुन्हा उत्तर गोलार्धात हा परिणाम वस्तूला उजवीकडे फिरण्यास प्रवृत्त करतो तर दक्षिण गोलार्धात डावीकडे.

जास्त अक्षांश प्रदेशातील स्थानावर याचा परिणाम जास्त आणि विषुववृत्ताकडे कमी असतो. पृथ्वीवरील सर्व हालचालींची दिशा या परिणामाला अनुसरूनच ठरते.

(पान ६ वर)

# चिराग कहाँ? रोशनी कहाँ?

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

१. भीष्म पितामह अत्यंत पराक्रमी, सदाचारी, दिलेल्या वचनांसाठी प्राण देणारे होते. घेतलेली प्रतिज्ञा पूर्ण करण्यासाठी त्यांनी पूर्ण आयुष्य खर्ची घातले. ते प्रचंड ज्ञानी होते. पण त्यांची राज्यनिष्ठा डोळ्याने आणि पुत्रप्रेमाने अंध असलेल्या, नात्याने, वयाने, क्षमतेने, सर्वार्थाने कमजोर असलेल्या धृतराष्ट्राच्या पायाशी वाहिली होती. म्हणजे 'चिराग कहाँ? रोशनी कहाँ?' त्यांच्या पराक्रमाचा उजेड कुठे व कोणत्या कार्यासाठी पडायला हवा होता आणि त्यांनी पाडला कुठ? अयोग्य राजाच्या प्रती सगळे वाहिल्यामुळे द्युतक्रीडेच्या वेळी त्यांच्याच उपस्थितीत दुष्ट दु:शासन द्रौपदीचे वस्त्रहरण करीत असताना थोर पराक्रमी असूनही भीष्म पितामह शांत राहिले. एका घावात दु:शासनाचा वध करणे त्यांना सहज शक्य होते. पण त्यांची राज्यनिष्ठा धृतराष्ट्राच्या प्रती असल्यामुळे त्यांनी तो अत्याचार घडू दिला. त्यामुळे महाभारताच्या धर्मयुद्धात भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाच्या हस्ते त्यांना शासन केले.



२. महाभारत युद्धासाठी पांडव आणि कौरवांच्या सेना समोरासमोर उभ्या ठाकल्या. अजिंक्य धनुर्धर अर्जुनाला त्याच्या क्षमतेवर पूर्ण आत्मविश्वास होता, परंतु शत्रू म्हणून समोर उभे असलेले जवळचे नातेवाईक बघून त्याला ग्लानी आली. त्याच्यात असलेली दुर्दम्य क्षमता त्यावेळी निरुपयोगी होती. अशावेळी भगवान श्रीकृष्णाने त्याचे समुपदेशन केले. अर्जुनाला भगवद्‌गीता सांगून त्याच्या बुद्धीवर साचलेली धूळ झटकली. नंतर श्रीकृष्णाच्या मार्गदर्शनानुसार अर्जुनाने आपल्या युधिष्ठिर, भीम, नकुल, सहदेव व पांडवसेनेसहित अतुल पराक्रम गाजवून दुष्ट अत्याचारी कौरवांना हरवून धर्माची पुन:स्थापना केली. आजही असे अत्याचारी, दुष्ट भारतात जागोजागी पसरले आहेत. त्यांना नेस्तनाबूत करून भारतात शांती प्रस्थापित करण्याची गरज आहे. सध्या आपल्याच देशात आपल्याला शोभायात्रा काढायलाही विचार करावा लागतो. आपल्या सणांना साजरे करायला व देवळांना सुरक्षेची गरज पडते. आजही आपली पूर्ण क्षमता आपल्याला वापरता येत नाही. कारण अनेक मूर्ख हिंदू स्वार्थासाठी शत्रूला बळ देत आहेत. तेव्हा गीता पूजेत ठेवून उपयोगी नाही तर ऑपरेशन मॅन्युअलसारखा गीतेचा व चाणक्य नीतीचा उपयोग करून शत्रूला देशाबाहेर घालवले पाहिजे. सध्या देशातील शत्रू आपलेच अन्न खाऊन आपल्याच अस्तित्वाला छेद देत आहेत. दंगे करून देशाची, लोकांच्या जीवाची, संपत्तीची हानी करीत आहेत. आपली संसाधने फुकट वापरून देशाच्या अर्थव्यवस्थेवर भार वाढवत आहेत. आपल्याला एकजूट होऊन क्षमता वाढवून देशाला सुरक्षित केले पाहिजे.

३. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केले त्या काळात, त्याआधी आणि त्यानंतरच्या काळात अनेक हिंदू, राजपूत शूर राजे, महाराजे व सरदार होते. त्यातील अनेक अतिशय न्यायप्रिय, तत्त्ववादी आणि स्वत:ला श्रेष्ठ समजणारे, त्यांच्या दैनंदिन जीवनात आदर्शवादी विचार करणारे होते. पण.... त्यांची राजनिष्ठा, त्यांनी मोंगली राज्याच्या प्रती किंवा स्वत:च्या वडिलांना कारागृहात टाकून त्यांना प्यायला पाणीसुद्धा न देणाऱ्या, वडिलांचे हाल करणाऱ्या, राज्यलोभासाठी स्वत:च्या सख्ख्या भावाचा खून करणाऱ्या व अतिशय क्रूर, धर्मांध अशा औरंगजेबासारख्या अत्याचारी राजाच्या प्रती वाहिलेली होती. मिर्झाराजे जयसिंग हे असेच एक थोर, पराक्रमी हिंदू सरदार होते. त्यांना औरंगजेबाने शिवाजी महाराजांवर आक्रमण करायला पाठवले. ही मोहीम ठरल्यावर मिर्झाराजांनी शिवाजी महाराजांना हरवण्यासाठी ४०० ब्राह्मण अनुष्ठानास बसवून, कोटी चंडीहोम, एकादश लिंगार्चन, देवीचा जप व अनुष्ठान करविले. अपरंपार खर्च केला. त्या मोहिमेत अत्याचारी मुस्लिम सरदार दिलेरखान त्यांच्या सोबत होता. शिवाजी महाराज आपल्या प्रजेवर पुत्रवत प्रेम करतात, हे सर्वांनाच माहिती होते. महाराजांनी पुरंधरगड सोडून शरणागती पत्करावी म्हणून दिलेरखानाने त्या काळात प्रजेची विटंबना केली, देवळे फोडलीत. त्याच्यापेक्षा वयाने, पराक्रमाने, अधिकाराने जात श्रेष्ठ असूनही हिंदू प्रजेची विटंबना, देवळांची नासधूस मिर्झाराजे जयसिंग यांनी मूकपणे पाहिली. मिर्झाराजे जयसिंगसारख्या थोर पराक्रमी राजपूत सरदाराने हिंदू असूनही शिवाजी महाराजांवर आक्रमण करून त्यांना तह करण्यास भाग पाडले. कारण त्यांची निष्ठा क्रूर, अत्याचारी औरंग्याच्या पायाशी होती. म्हणजे शक्ती थोर पण पूर्ण जीवन चुकीच्या माणसासाठी वाहिले. 'चिराग कहाँ? रोशनी कहाँ?' याच पुरंधराच्या तहामुळे अनेक युद्धे जिंकून, अनेक रथी-महारथी मराठा सैनिकांची आहुती देऊन जिंकलेले २३ किल्ले, चार लक्ष होनांचे प्रदेश व ४० लाखांची खंडणी शिवाजी महाराजांना मिर्झाराजे जयसिंग यांना द्यावी लागली. ते सगळे किल्ले व खंडणी ताब्यात येईपर्यंत ९ वर्षांच्या कोवळ्या संभाजीराजांना मिर्झाराजांनी ओलीस ठेवून घेतले होते. पुढे औरंग्याने शिवाजी महाराजांना व बालसंभाजीला आग्र्याला कारागृहात टाकले.

४. भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तानातून भारतात आलेले प्रसिद्ध वकील कपिल सिब्बल हे आयएएस परीक्षा पास झाले होते, परंतु त्यांनी वकील होण्याचा निर्णय घेतला. हिंदू असूनही आयुष्यभर भारताचे शत्रू असलेल्या आतंकवाद्यांना कायद्याच्या कचाट्यातून सोडवण्यात ते धन्यता मानतात. त्यांच्या फक्त एका भेटीची फी २० लाखांच्या आसपास आहे. रोजचे उत्पन्न एक कोटींच्या वर आहे. अशा कर्तबगार(?) वकिलांना, नेत्यांना भ्रष्ट राजकीय पक्ष वर्षानुवर्षे विधानसभेत, लोकसभेत किंवा राज्यसभेत खासदार म्हणून पोसतात. याच प्रमाणे संपूर्ण भारतात व विदेशात असे अनेक विद्वान-मूर्ख अतिस्वार्थी भारतीय वेग-वेगळ्या व्यवसायात आहेत; जे अन्न तर भारताचे खातात, पण ज्यांची निष्ठा भारतविरोधी शक्तींनाच वाहिलेली आहे. आपल्याच लोकांची शक्ती हनन करण्यात त्यांना अभिमान वाटतो.

५. 'मी तुझ्यापेक्षा जास्त लोकांचे खून केलेत म्हणून मी तुझ्यापेक्षा श्रेष्ठ' असा त्यांना अहंकार होता. केलेल्या दुहेरीतिहेरी खुनासाठी ज्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली होती. अशा नागपूर कारागृहातील ४५ बद्यांवर १९९५ साली मी मानसशास्त्राचे व योगशास्त्राचे संशोधनासाठी प्रयोग केलेत. त्यापैकी कुणाचे अक्षर अतिशय सुंदर होते तर कुणी अतिशय मेहनती कामगार होता. प्रत्येकामध्ये काही ना काही चांगले गुण होतेच. त्या सगळ्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये एक गुण मात्र विशेष होता; तो म्हणजे एकदा ठरवल्यावर पूर्ण जिद्दीने हातात घेतलेले कार्य पार पाडणे. त्यासाठी हवी ती किंमत द्यायला ते तयार होते. त्यांचा हा चांगला गुण त्यांनी चुकीच्या उद्देशासाठी वापरला व जी काही कठीण परिस्थिती त्यांच्या जीवनात त्यावेळी तयार झाली त्यामुळे कमीत कमी दोन व जास्तीत जास्त तीन लोकांचे त्यांनी जीव घेतलेत. शेवटी गुन्हा सिद्ध झाल्यावर त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. सुरुवातीला मला त्यांचा विश्वास संपादन करायला रोजचे तीन तास या हिशोबाने ५० दिवस म्हणजे १५० तास लागलेत. त्यादरम्यान त्यांच्यातील ती जिद्द जर त्यांनी पुन्हा चांगल्या कामासाठी वापरली तर त्यांना त्यांच्या कुटुंबीयांकडे लवकर परतता येईल. स्वातंत्र्य उपभोगता येईल हे विचार त्यांच्या मनावर ठसवले. पाच महिन्यांनी त्यातील ३३ बंदी योग शिक्षकाची परीक्षा पास झालेत. या विशेष उपक्रमाचे उद्‌घाटन नितीन गडकरी यांनी केले होते. त्यानंतर पाच महिन्यांनी या उपक्रमाचा समारोप तत्कालीन गृहराज्य मंत्री प्रभाकरराव मोरे यांच्या उपस्थितीत झाला. म्हणजे आधीच्या जीवनात ज्या शक्तीच्या दुरुपयोगाने त्यांचे जीवन दु:खी झाले त्याच जिद्दीच्या जोरावर चांगले कार्य करून त्यांची सुटका झाली व योगशिक्षक म्हणून विविध कारागृहात नेमणूक झाली.

६. सुदेश एक मध्यमवर्गीय मुलगा. शिक्षण झाल्यावर स्पर्धा परीक्षा पास करून बँकेत लिपीक म्हणून नोकरीला लागला. यथावकाश त्याचा एका सुशिक्षित मुलीशी विवाह झाला. दोन मुले झालीत. नंतर बदली होऊन एका छोट्या गावात राहायला गेला. वेळ भरपूर, आर्थिक चिंता नाही. संसार छान चाललेला. मुळात शोधबुद्धी व वैचारिक क्षमता उत्तम असल्यामुळे त्याला बँकेच्या रटाळ कामाचा कंटाळा येऊ लागला. अचानक माझा एक लेख त्याच्या वाचनात आला. तो फोन करून भेटायला आला व त्याची मन:स्थिती कथन केली... जीवनात काही भव्य करावेसे वाटते, पण काय करावे तेच कळत नाही. दोन वर्षांत या रटाळ नोकरीतून बाहेर पडून जिथे त्याच्या गुणांचे चीज होईल अशा क्षेत्रात त्याला आपले बस्तान बसवायचे आहे. मग मानसशास्त्रानुसार त्याच्या काही




चाचण्या घेतल्यावर असे लक्षात आले की, त्याची बुद्धिमत्ता उत्तम असून मेंदूचा उजवा गोलार्ध डाव्यापेक्षा जास्त कार्यक्षम आहे. त्यामुळे तो चांगला प्रशिक्षक म्हणजे सॉफ्टस्किल्स ट्रेनर होऊ शकतो. मग त्याने आमच्या ट्रेनर बनवण्याच्या अभ्यासक्रमात प्रवेश घेतला. अल्पावधीतच त्याला आपले हरवलेले सापडावे तसे वाटले. त्याच्याच शब्दात सांगायचे तर त्याला स्वत:चा शोध लागला. आता तो उत्तम ट्रेनर होण्यासाठी उत्साहाने कार्यरत असून त्याच्या मनाची तगमग शांत झाली आहे. त्याच्यात असलेली शोधबुद्धी आधी दुसऱ्याचे न्यून व आपले जीवन कसे निरर्थक हे शोधण्यात वाया जात होती. म्हणजे बुद्धी व वेळेचा अपव्यय होत होता; सोबत मनावर ताण वाढत चालला होता. त्याच्यामुळे त्याच्या पत्नीला अस्वस्थ वाटत होते. कारण पतीच्या तणावाचा परिणाम पत्नीवर होणे स्वभाविक आहे. आता ते कुटुंब तणावरहित होऊन उत्कर्षाकडे वाटचाल करतंय. आपण आपली पूर्ण क्षमता का वापरत नाही? आळस, स्वत:ला पूर्ण न ओळखणे, त्यामुळे ध्येय निर्धारण न करू शकणे, सपाटून कामाला लागावे असे योग्य ध्येयच नसल्यामुळे उत्साह नाही व क्रियाशीलताही नाही. यामुळे आपली पूर्ण क्षमता आपण वापरत नाही. क्रियाशीलता नसल्यामुळे आत्मविश्वास नाही. कारण आत्मविश्वास फक्त आणि फक्त कार्यानुभावातूनच मिळतो.

### शिकायचे काय ?

आधी आपला व्यक्तिमत्त्व विकास घडवून कार्यक्षमता वाढविणे आवश्यक. स्वावलंबी होणे. फक्त अमुकच प्रकारचे काम करून मी आपली उपजीविका करीन, असा विचार करून अनेक तरुण घरी बसून वेळ घालवतात. तसे न करता नेहमी नवीन शिकण्याची इच्छा कायम ठेवून, पडेल ते काम करणेच योग्य. कार्यक्षमता वाढवल्यावर तिचा सदुपयोग करून आपल्या देशाला सुरक्षित करणे हीच प्राथमिकता आहे. अन्यथा अचानक एके दिवशी अनेक मजली घरे, व्यापार, नोकऱ्या वगैरे सर्व सोडून जीव मुठीत घेऊन पळावे लागेल. सावधान! फक्त पूजा, पोथी वाचन, प्रवचन या सोबतच आपली क्षमता शास्त्र आणि शास्त्र दोन्ही शिकण्यासाठी वापरली पाहिजे. त्यानंतर 'चिराग जहाँ, रौशनी भी वहाँ' म्हणजे आपल्या कार्याचा प्रकाश आपल्याच देशात व देशासाठीच वापरणे महत्त्वाचे! (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## पुण्यवान धर्म । वैष्णवांचा ।।

कुणाशी नसावा । वैर दुजाभाव ।।
आपुला तो गाव । परलोकी ।।१।।

चार पाच दिन । मुक्काम येथला ।।
कलंक कशाला । माथी येतो ।।२।।

नांदण्या सासरी । धाडीले आम्हास ।।
आनंदे निवास । बांधू येथे ।।३।।

नाव त्याचे घेऊ । गावूनी अभंग ।।
संसार अथांग । तरावया ।।४।।

काया वाचा मने । घडावे सत्कर्म ।।
पुण्यवान धर्म । वैष्णवांचा ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## धरणीची हाक

उठसूट जंगलं तोडून मुद्दामच वनवा लावून प्राणवायू कसा
मिळणं रे भावा! कधी सुचेल शहाणपण?
जलसाठे दूषित करून वर्षा बचतीचा मार्ग सोडून कशी
भागवणार तहान रे भावा! कधी सुचेल शहाणपण?
जिथं-तिथं कचरा फेकून रसायनं शेतात ओतून काळ्या
मातीत कसं पिकन रे भावा! कधी सुचेल शहाणपण?
जीवाश्म इंधन जाळून हरितवायू हवेत सोडून तू आपलंच
रचतो सरण रे भावा! कधी सुचेल शहाणपण?
नदीपात्रात टाकलं भरण पुराचं पाणी वस्तीत शिरण संसार
उघड्यावर पडण रे भावा! कधी सुचेल शहाणपण?
उभा डोंगर पोखरून केले तू उजाड माळरान घेतले
ढिगाऱ्यात गाडून रे भावा! कधी सुचेल शहाणपण?
अधिवास भस्म पाहून पशुपक्षी झाले हैराण जीवसृष्टीचे कर
रक्षण रे भावा! कधी सुचेल शहाणपण?
लोकसंख्येचा वाढतो ताण बदललं फार हवामान ठेव
शाश्वत दृष्टिकोन रे भावा! कधी सुचेल शहाणपण?
निसर्गाचं लागतं देणं एवढं तरी समजून घेणं या धरणीला
कोण तारण रे भावा! कधी सुचेल शहाणपण?

प्रा. डॉ. विलास डोईफोडे

## उन्हाची कविता

ऊन हळदुले माखून ये हळदुल्या रंगात रंगून ये ऊन
केशरी संन्यस्त साध्वी त्याग जीवनी भिनवून ये ऊन
मखमली पळसाची लाली शृंगार नखशिखांत सजवून
ये ऊन बरसले जीव त्रासले उन्हास सावलीला बिलगून
येऊ दे तप्त उन्हाळा ऋतू वांझोटा दान हिरवळीचे
झोळीत ये ऐन दुपारी ऊन आले दारी हसून म्हणाले, ये
भरारी चल राजसा, सख्या ऊन वाटून घेऊ एकमेकांच्या
सावलीत उन्हाळीत होऊ मना

अंजली देशमुख

# माणूस आणि प्राणी प्राचीन नात्याची शोधकथा

कोणे एके काळी
स्वाती काळे (कोलारकर)

विचारशक्ती आणि भाषेची समृद्धी असल्यामुळे माणूस इतर प्राण्यांहून वेगळा असेलही; पण प्राचीन सांस्कृतिक इतिहासानुसार मनुष्य आणि पशुपक्ष्यांमधील संबंध पूर्वीपासून अतिशय दृढ होते. काही शास्त्रांमध्ये प्राणीच माणसाचे गुरू होते. संगीतात कोकिळेपासून माणसाला पंचम स्वराचे ज्ञान प्राप्त झाले. ऋषभ स्वर त्याला बैलापासून मिळाला. जीवसृष्टीत मनुष्य, प्राणी, वृक्ष आणि वनस्पतींच्या स्वास्थ्याचा नियम एकच असतो. कारण जीवनाचा एकमेकांमध्ये गुंफलेला धागा सर्वांमध्येच असतो. या जीवन धाग्याने बनलेली निसर्गसाखळी कोणीच तोडू शकत नाही आणि तोडल्या गेली तर भीषण परिणाम होतात. म्हणूनच आत्रेयाने हारित संहितेत म्हटले आहे. ''घोडे, हत्ती, माणसे किंवा झाडे, वेली, सर्प व नाग, पक्षी आणि उंदीर या साऱ्यांच्या ज्वरावरचा एकच उपाय मी सांगतो.'' कारण या सर्वांना गुंफणारे निसर्गसूत्र अर्थात एकच आहे.


माणूस स्वार्थी आहेच, पण स्वार्थी असला तरी प्राचीन काळापासून प्राण्यांबद्दल तो विचार करतो. त्यांच्यावर प्रेम करतो. माया लावतो. प्राण्यांसंबंधी माणसाने अनेक प्राचीन ग्रंथ लिहिले. हत्तींवर पालकाप्य याने एक दुर्मिळ ग्रंथ लिहिला आहे. पालकाप्य हा अंग देशाच्या रोमपाद राजाकडे पशुवैद्यक होता. तो अंग देशाच्या चंपानगरीत राहायचा. रोमपाद राजा दशरथ राजाचा समकालीन होता. पालकाप्याने लिहिलेले गजायुर्वेद, गजनिरूपण, मातंगलीला आणि गजचिकित्सा हे सर्व ग्रंथ चिकित्सक आजही नावाजतात. शालिहोत्र घोड्यांच्या चिकित्सेसाठी प्रसिद्ध होता. असं म्हणतात की, त्याने आपली विद्या साक्षात ब्रह्मदेवाकडून मिळवली. त्याच्या 'हयायुर्वेद'मधील काही भाग अग्निपुराणात आढळतात. रामायण-महाभारत काळातदेखील प्राणी निसर्गसूत्रातील महत्त्वाचे घटक समजले जायचे. म्हणूनच महर्षी व्यास किंवा वाल्मीकिंची लेखणी फक्त मनुष्याच्याच भाषेतून व्यक्त होत नाही.

वायूच्या चपलतेतून, आकाशाच्या भव्यतेतून, पृथ्वीवरच्या इवल्याशा तृणातून, सागराच्या मंथनातून, नदीच्या खळखळत्या प्रवाहातून आणि पशुपक्ष्यांच्या डौलदार चालीतून व्यक्त होत असते. रामायण आणि महाभारत फक्त मनुष्यत्वाची लढाई नाही. रक्तमलूल पृथ्वीने पांघरलेले ते धर्माचे झिरझिरीत आवरणही नाही. या महाकाव्यांमध्ये वैश्विक पातळीवर सुर-असुर, पशु-पक्षी, नदी-झाडे यातील अणू-रेणूमधील स्थूल-सूक्ष्म संघर्ष आणि समन्वय आहे. म्हणूनच ही महाकाव्ये अजरामर आहेत. रामायण-महाभारत आपल्या समृद्ध सांस्कृतिक प्राचीन जीवनाचा आरसा आहे. असे सांस्कृतिक जीवन जे त्या काळात पशू-पक्ष्यांनी गजबजलेले होते. महाभारतात राजा नळाची गोष्ट आहे. राजा नळ हा अश्वविद् होता. अश्वविद्येत तो अतिशय पारंगत होता.

द्रोणाचा आवडता शिष्य अर्जुन हाच होता, तरी द्रोणाने नकुल आणि सहदेवाला घोडे आणि गुरे यांना काबूत कसं राखायचं, ही महत्त्वाची विद्या शिकवली. पशुवैद्यकशास्त्रही त्यांना अवगत होतं. विराटपर्वात विराट राजाच्या दरबारी नकुलाने आपल्याला घोड्यांना शिकवता येतं आणि त्यांचे रोगही बरे करता येतात, असं विराट राजाला सांगितलं. सहदेवाने त्याला गुरांची लक्षणे आणि रोग बऱ्या करणाऱ्या पद्धती माहीत आहेत, असं सांगितलं. नकुलाने 'अश्व चिकित्सा' हा ग्रंथ लिहिला असे म्हणतात. प्राचीन काळी प्राणी माणसांशी हितगूज करायचे. अरण्यक पर्वातील एक गोष्ट आहे. द्वैत वनात असताना युधिष्ठिराला एका हरणाने स्वप्नदर्शन देऊन सांगितले की, वाजवीपेक्षा जास्तच शिकार झाल्यामुळे आता या अरण्यात आम्ही नामशेष होत आहोत. युधिष्ठिराने स्वप्नातील हरणाचा सल्ला ऐकून लगेच त्या अरण्यातून आपला निवास हलविला. अर्जुन तपश्चर्या करीत असताना कृष्णाने नवगुंजार या नऊ प्राण्यांच्या अवयवांपासून निर्माण झालेल्या प्राण्याच्या रूपातच त्याला दर्शन दिले होते. त्याचे पाय हत्तीचे होते.

महाभारताच्या गोरखपूर आवृत्तीमध्ये काही श्लोकांमध्ये प्राण्यांची माहिती दिली आहे. बायसन, हत्ती, माकड, रानडुक्कर ही श्वापदे अरण्यात राहतात. गाय, बकरी, मेंढी, घोडा, झेब्रा आणि गाढव हे सर्व पाळीव प्राणी आहेत. आदिपर्वात शार्दुल आणि वानराचा उल्लेख आहे. आदिपर्वात नागाच्या १८४ प्रजाती सांगितल्या आहेत. त्यांची चार कुळांमध्ये विभागणी केली आहे. तक्षक, ऐरावत, कौरव आणि धृतराष्ट्र ही ती चार कुळे आहेत. नागांचा आणि सर्पांचा टोटेम किंवा कुलचिन्ह म्हणून काही राजांनी निश्चितच सन्मान केला होता. रामायण काळात घोडे, हत्ती, गायींना सुवर्णालंकारांनी मढवलं जाई. हस्तिदंताला सुवर्ण पट्ट्या लावल्या जात. गाईंचे पाय आणि शिंगे सोन्याने सजवित असत. राजघराण्याचे रथांवर सोन्याच्या घंटा किणकिण करीत. रथामध्ये वाघाच्या कातड्याचे जाजम असायचे. राजरथाला पांढरेशुभ्र घोडे ओढायचे आणि नागरिकांचे गाडे उंट, हत्ती, गाढव, बैल हाकायचे.

महाभारतातील सभापर्वात घोड्यांच्या ३०० रंगछटांचे वर्णन केलेले आहे. उच्च व नीच प्रतीच्या



घोड्यांची लक्षणे सांगितली आहेत. बाल्हिक देशाचे घोडे मजबूत पायांचे होते. सिंधू देशाचे घोडे अतिशय चपळ होते. कंबोजमधील घोडेदेखील अतिशय प्रसिद्ध होते. अश्व तीर्थात चांगल्या प्रतीचे घोडे मिळायचे. रामायणात गांधार, तुखारा (चायनीज तुर्कस्तान), भृगुकच्छ आणि वनायु येथील घोड्यांचे उल्लेख आहेत. रामायणातील बालकांडात म्हटले आहे, वनायू आणि स्यामंतक घोड्यांनी अख्खी अयोध्या नगरी भरलेली होती. वनायू घोडे अनेक तास कोणत्याही कठीण परिस्थितीत वेगाने पळू शकत असत. श्रीकृष्णाजवळ पोपटी रंगाचा शैव्य, लाल रंगाचा सुग्रीव, सोनेरी रंग असलेला मेघपुष्प आणि श्वेतवर्णीय वलाहक असे उच्च प्रतीचे घोडे होते. कपाळावर चार आवर्तने असणारा घोडा शुभ लक्षणी मानला जाई. भगवान श्रीकृष्ण अश्वहृदय जाणायचे. जयद्रथवधाच्या आधी कृष्णाला कळून चुकले होते की, त्याचे घोडे थकलेले आहेत. त्याने रथ थांबवून घोड्यांना पाणी पाजले आणि नंतर पुन्हा युद्ध सुरू झाले. हत्ती म्हणजे राजाचे वैभव आणि धर्माच्या स्थिरतेचे प्रतीक. नरो वा कुंजरो वा प्रसंगात जेव्हा धर्मराज द्रोणाचार्यांना त्यांचा पुत्र अश्वत्थाम्याच्या मृत्यूची चाहूल देतो.

खरे तर अश्वत्थामा नावाचा हत्ती मरण पावलेला असतो तेव्हा द्वापार युगात काळाच्या आवश्यकतेनुसार बदललेल्या धर्माच्या व्याख्येची ग्वाही देण्यासाठी हत्तीच्या रूपकाचा अतिशय चतुराईने वापर केलेला दिसतो. अतिप्राचीन काळापासून हत्तींना राजघराण्यासाठी प्रशिक्षित केले जायचे. भारताच्या पूर्व भागात हत्तींचे प्रजनन केले जायचे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रानुसार कलिंग, अंग, करुष येथे उत्तम प्रतीचे हत्ती होते. काम्यक सरोवरामधील (सध्याचे ओडिशातील चित्रक सरोवर) हत्ती पांढऱ्याशुभ्र कमळाप्रमाणे आणि प्रचंड होते. केकय जनपदामधील कुत्री उत्तम प्रतीची समजली जायची. राजसूय यज्ञात युधिष्ठिराला प्रचंड संख्येने उंट, गायी, बकऱ्या, मेंढ्या, गाढवे भेट स्वरूपात मिळाली. अस्वल वानरांच्या अगोदर निर्माण झाले म्हणतात. रामायणातला जाम्बवंत हा प्रजापती ब्रह्माचा मुलगा कृष्णमेघासारखा दिसतो.

तो ब्रह्मदेवाच्या जांभईतून गदगदातून उद्‌भवला म्हणून त्याला गदगद पुत्र म्हणतात. जाम्बवंत हा अस्वल योनीतला योद्धा. हनुमंतासमवेत वानरे होती आणि जाम्बवंतसुद्धा पांढऱ्या तोंडाच्या अस्वलांना घेऊन रणांगणात रामासाठी लढायला गेला. तरी त्याला इतिहासात हनुमानाचे स्थान मिळाले नाही. का कोण जाणे, त्याला नेहमीच दुय्यम स्थान मिळाले. रावणाचा वध झाल्यानंतर हनुमान सीतेकडे जातो आणि तिच्यावर पहारा ठेवणाऱ्या राक्षिसीणींना जीवे मारण्याची अनुमती मागतो. तेव्हा सीतेने त्याला अस्वलाचा एक श्लोक सांगितला- ''हे हनुमंता, अस्वलाने वाघापुढे गायलेला प्राचीन श्लोक ऐक. पाप करणाऱ्याला पापानेच मोबदला देऊ नये.'' या मागची कथा अशी की, एका अरण्यात पारध्याच्या मागे वाघ लागला. पारधी घाबरून झाडावर चढला. एक अस्वल त्या झाडावर अगोदरच चढून बसले होते. वाघ म्हणाला, ''माणसाला खाली लोटून दे. हा पारधी आपल्या दोघांचा सारखाच वैरी आहे.'' परंतु अस्वल म्हणाले, ''माझ्या जागेत हा आश्रयाला आलेला आहे. मी याला ढकलणार नाही.'' नंतर वाघ माणसाला म्हणाला, ''अस्वलाला खाली ढकलून दे.'' आणि माणसाने अस्वलाला खाली ढकलले. सुदैवाने अस्वलाने फांदी पकडून स्वतःचा जीव बचावला. त्यानंतर वाघ त्याला म्हणाला, ''तू या कृतघ्न माणसाला खाली लोटून दे. '' शेवटी अस्वल म्हणाले, ''असे करणे हा सज्जनांचा धर्म नाही.'' सीतेने अस्वलाच्या या कथेचा संदर्भ देत राक्षिसीणींना क्षमा केली. माणसाप्रमाणेच प्रत्येक प्राण्याची नियती असावी. हळूहळू अस्वलाची शक्ती क्षीण होत गेली असेल. त्यामुळे त्याचे महत्त्वही कालौघात कमी झाले. महाभारतात तर द्रोण पर्वात राक्षसांच्या रथावर अस्वलाचे कातडे रथांना चहुबाजूंनी बसवलेले असते, असे उल्लेख आहेत.

बाणासुराच्या रथाचे वर्णन असे आहे की, शंभर किणकिणींचा (लहान घंटांचा ) आवाज येणारा, लाल पताका असणारा, अस्वलाच्या चामड्याने वेढलेल्या दहा नल्व प्रमाणाच्या (४०० विती) महारथावर बाणासूर आरूढ होता. अलंबूस, घटोत्कच असुर योनीतील महायोद्धे होते आणि या सर्वांच्या रथावर अस्वलाचे कातडे बसवलेले होते. अनेक प्राचीन पशू आज कुठेही दिसत नाहीत. पशुपक्ष्यांच्या संख्येतसुद्धा खूप घट झाली. खरगपूरच्या जंगलातल्या मोरांच्या केका हल्ली ऐकू येत नाही. मानभूमच्या मान नदीवर वाघ, अस्वले पाणी पीत नाहीत. सिप्रीच्या जंगलात हत्ती फिरताना दिसत नाहीत. अकबराने एकदा याच सिप्रीच्या जंगलात एका धिप्पाड हत्तीला पकडलं होतं. अरण्ये फळाफुलांनी नटलेली आणि प्राण्यांनी गजबजलेली पाहिजेत. भीष्माचार्य म्हणतात, १९ प्रकारचे स्थावर आणि जंगम तसेच पाच महाभूते मिळून सृष्टी निर्माण झाली.


गायत्री मंत्रातसुद्धा २४ मुळाक्षरे आहेत. या मुळाक्षरांना लोकगायत्री म्हणतात. या २४ जणांच्या यादीत जंगली पशू, गावच्या वेशीवर राहणारे आणि पाळीव प्राणीसुद्धा आहेत. युगामागून युगे गेली. प्राचीन काळापासून माणसांनी प्राण्यांबरोबर गुंफलेला गोड दुवा आता हातून निसटत चाललाय का! माणसाचा पुढचा प्रवास एकाकी राहणार का! शेवटी, हे सगळं काळच ठरवेल. 'सुख म्हणजे नक्की काय असतं?' कल्पकतेने जीवन जगायचे

# डोळ्यात आणि मनात ओल कायम ठेवणारा 'वसंत'

ऋतूरंग.....
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

सृष्टीचे हे भरजरी रूप पिंपळाची लालसर हिरवट पालवी, आंब्याच्या मोहरातून अधे- मधे डोकावणाऱ्या हिरव्या कैऱ्या, गुलमोहराचे लालवट पिवळसर फुलांचे गेंद यामुळे आणखीच साजिरे झालेले असते. कडुलिंबाच्या गर्द हिरव्या पानाआड लपून बसलेली कोकिळा वसंताची धून आलापत असते. काही मोजक्या झाडांचा साज सोडला तर गवतापासून प्रत्येक हिरव्या झाडांना सूर्याने आपल्या रागाने हिरमुसले करून ठेवलेले असते. शेतातील पिकांची रया तर फाल्गुनातील होळीच्या अगोदरच उतरलेली असते. त्यामुळे चैत्रात त्या उन्हाचा सामना करण्यासाठी ते उभेच नसतात. मात्र, या उन्हाच्या जिद्दीने एखादा शेतकरी उन्हाळी पिकाची तजबीज करतो आणि त्यात काही पिके सूर्याच्या रागासमोर आपले अस्तित्व टिकवण्याची केविलवाणी धडपड करतात आणि असे एखादे पिक शेतात उभे दिसले की तहानलेल्या, भुकेलेल्या पाखरांच्या जीवात जीव येतो.

एकदा अजिंठा येथे भर उन्हाळ्यात लेण्या पहात असताना, लेण्या पाहून गाडीच्या पार्किंगमध्ये परत आल्यावर गाडीच्या डिक्कीतल्या पाण्याची कॅन उघडली तेव्हा अनेक मुंग्यांनी त्या पाण्यामध्ये बुडून जीव दिल्याचे दिसले. तापलेल्या त्या खडकाळ आणि रमणीय असला तरी उन्हाने तापलेल्या त्या पाषाण खोऱ्यात पाण्याचा मागवा घेत मुंग्यांनी नेमकी गाडी कशी शोधली असावी? गाडीचे डिक्कीत त्या कुठून शिरल्या असाव्यात? हवाबंद असलेल्या त्या कॅनमध्ये त्यांनी कुठून शिरकाव केला असावा? आणि महत्वाचे म्हणजे मरण्यापूर्वी तरी त्यांची तहान भागली असावी का? असे प्रश्न मला निष्कारण पडत राहतात. वसंत ऋतू, चैत्र... यात तो फुललेला गुलमोहर, पिवळा जर्द बहावा, हे सर्व खूप खूप सुंदर आणि विलोभनीय अशा शब्दात लिहिता येणे सोपे असते. मात्र, हाच वसंत जेव्हा बकाल वस्त्यामधून आपल्याला फिरवून आणतो तेव्हा पाण्याच्या टंचाईमुळे घराघरातून सुरू असलेला उभा पाहून तो अस्वस्थ होत असेल असे मला वाटते. कारण चैत्र वैशाखाच्या उन्हामध्ये जिथे मला गुलमोहर फुलून आलेला दिसतो, बहाव्याला पिवळेजर्द फुलांचे घोस लोंबलेले दिसतात. तिथेच गाव खेड्यातल्या विहिरीवर टँकरच्या मागे पिसाटासारखे धावणारे गाव पहायला मिळते.



एखाद्या निष्पाप निरागस आणि गोंडस लेकरायला भरजरी स्वप्न पडावे आणि त्या लेकरांने झोपेतल्या झोपेत प्रसन्न हसावे. हे त्याच प्रसन्न हसणं झोपेत असल्यामुळे त्याचे त्यालाच कळू नये. मात्र, निद्रेच्या देवीने खोडसळपणा करत लेकराची झोप पळवून नेऊ नये म्हणून दक्ष असलेल्या अंगाई गाणाऱ्या माय माऊलीने ते प्रसन्न हास्य टिपावे आणि लेकराच्या स्वप्नात पर्यांचा खेळ सुरू झाला बाई, अशी काहीशी अंगाई गावी. इतकी निरामय प्रसन्नता चैत्रातल्या सृष्टीमध्ये नांदत असते.

एकेका विहिरीवर ५० ते ६० माताभगिनी, प्रसंगी घरातील कर्ते बापे दोर टाकून बसलेले असतात, सकाळी गावदेवीच्या मंदिरातल्या काकड आरती नंतर साधारण सातच्या आसपास विहिरीवर टँकरचा हॉर्न वाजतो आणि पाण्यासाठी छोट्या मोठ्या चकमकी व्हायला सुरुवात होते.

प्रत्येकाच्या वाटेवर साधारण चार-पाच हांडे पाणी ठरलेले असते. मात्र, त्यात दोन हांडे शिल्लक मिळाले की लढाईनंतर एखादे गाव इनामात मिळावे इतका आनंद संबंधिताला होतो. पाण्याचे हे दुर्भिक्ष वाड्या वस्त्यांवर मोठ्या प्रमाणात आढळून येते. डोंगरमाथ्यावर तीन चार किलोमीटर चालत जाऊन एकावर एक चार-पाच अशी हांड्यांची चळत घेऊन चालणारी एखादी माता भगिनी दिसली की स्त्री शक्तीला देवीच्या रूपात का पूजतात? याचे उत्तर मिळते. माणसाच्या पाण्याची ही दुरावस्था असली म्हणजे जनावरांच्या पाणी पिण्याची काय सोय असेल? याची कल्पना न केलेली बरी. मात्र तरीही आटत चाललेल्या नद्यांमध्ये आहे तेवढे पाणी घशाखाली उतरवून त्या जलसाठ्याच्या आसपासच्या गाव वस्तीतील प्राणी आणि आसपासच्या रानातील जंगली प्राणी आपली तहान भागवत असतात. ज्ञानगंगा अभयारण्यात देव्हारी या अतिदुर्गम खेड्यात २०१९ मध्ये जेंव्हा निवडणूक अधिकारी म्हणून काम करायला मी गेलो तेंव्हा वस्तीजवळच्या कट्ट्यावर पाणी अडवून ठेवलेले दिसले. त्या डोहात गावकडेन दहा बारा म्हशी आणि जंगलकडेने दहा बारा अस्वले एकाचवेळी पाणी पितांना पाहण्याची मौज आगळी होती. गावात रात्रीच्या वेळी खुलेआम घुसणारा बिबट्या एखाद्या मोठ्या रांजणीत तोंड खुपसून पाणी पितांना दिसला की मुकाट मागल्या पावलांनी परतावे, असं सांगणारे ते ग्रामस्थ अजूनही माझ्या संपर्कात आहेत. असा हा तहानलेला चैत्र समोर असला की वैशाख आणि ज्येष्ठ जीवघेणे ठरणार हे ओघाने आलेच. मात्र बंधारे कट्टे आणि धरणे यामुळे ३५ ते ४० वर्षापूर्वी जे पाण्याचे दुर्भिक्ष अनुभवायला यायचे त्यात किंचित सुधारणा झाली आहे.

आमच्या लहानपणी आम्ही ज्या वस्तीत राहायचो त्या भागात चार- पाच घरे मिळून एक नळ असायचा. ज्या मालकाने नळ घेतला त्यांचे पाणी भरून झाले की माहेवारी नळ भाडे देणारे लोक क्रमाने दोन दोन हांडे भरून पाणी आपल्या घरी नेऊन रिचवत असतं. अश्या चार पाच खेपा होत असत. हे नळ उन्हाळ्यात चौथ्या किंवा पाचव्या दिवशी येत. एखादे वेळी पाणी सोडण्याचे यंत्र बिघडले की घरातील सर्व लहान मोठी माणसं माळ्याच्या विहिरीवर पाणी भरून आणायला रांग लावत. मोठा हांडा १० पैसे, लहान कळशी ५ पैसे, आणि आमच्या सारख्या टिल्लू लेकरांच्या हातात तीनेक लिटर पाणी बसेल अशी गुंडी असायची. ज्याला जे उचलेल त्याने ते भरून आणावे हा नियम त्या वेळी घरात होता. स्वतःच्या आंघोळीपुरते पाणी आणले की दहा पाच पैश्याची संत्रा किंवा खोबरागोळी हे बक्षीस असे लेकरांना... एकंदरीत पैशाची किंमत कमी आणि पाण्याची गरज त्या काळातही मोठीच होती. आजपासून साधारण चाळीस वर्षांपूर्वी घरातील कपडे तर दररोज न चुकता नदीच्या किंवा पाणवठ्याच्या जागेवर घुतली जात, आमच्या भागातील बाया बाभूळवनातील छोट्या धरणावर किंवा शिवाजी उद्यानातील तळ्यावर कपडे घुवायला जात.

आम्ही लहान मुले खेळण्याच्या निमित्ताने ह्या कपडे धुण्यासाठी निघणार्या आई किंवा शेजारच्या काकू, आत्या, मावशी त्यांच्या मागे मागे जात असू, नदीच्या काठावर ठेवलेले चापट गुळगुळीत दगड हे जरूर आपल्याला आपल्या माहेरातून इनामात मिळाले आहेत अशा पद्धतीने बाया त्यावर हक्क सांगत. त्यासाठी अनेकदा भांडणही होत असत. तो काळ आठवला की आता अंगावर शहरा येतो आणि ती भांडणे आठवली की हसूही येते. मात्र आता बटन दाबल्यावर लगेच पाणी उपलब्ध करून देणार्या बोअर, अगदी किचन ओट्यापर्यंत आणि कपडे धुण्याच्या वॉशिंग मशीनपर्यंत पाईप लाईनची व्यवस्था असल्याने अंगावर पाणी टंचाईमुळे येणारा शहरा उभा राहत नसला तरी त्या पाणी टंचाईतील आपलेपणाही हरवून गेल्याच्या चुटपटीतून उगाच मन कोरडे आणि डोळे ओले होतात.

चैत्राच्या उत्तरार्धात जमिनीतले पाणी आटत जाणारे असले तरी तरी माझ्यासाठी चैत्र हा डोळ्यामध्ये ओल कायम ठेवणारा ठरलेला आहे. म्हणूनच मला म्हणूनच मला चैतन्यमयी वसंत जितका व्याकुळ करतो तितका इतर कोणताही ऋतू व्याकुळ करत नाही. वसंतातील काही तारखा अजूनही मन अस्वस्थ करून उगाच डोळ्यांना पाझर फोडतात. खरे म्हणजे साधारण पन्नास वर्षांपूर्वी वसंतातल्या आल्हाददायक सूर्याच्या साक्षीने जन्मास आल्यामुळे उन्हं तापलेय म्हणून सावली धरून बसणे मला कधी जमले नाही. मात्र, असाच एक उन्हाळा दुष्काळ परवडला पण हा वसंत नको असं म्हणण्यास भाग पडणारा ठरला. नेमकीची कोवळी जाण येण्याच्या वयात इयत्ता सहावीत मला किती मार्क पडले? हा प्रश्न विचारायच्या दोन तीन दिवस आधी जन्मदात्री आयुष्यभर पुरेल इतका उन्हाळा आम्हा चार भावंडांच्या पदरात टाकून गेली.




आजचे संभाजीनगर म्हणजे तत्कालीन औरंगाबादच्या दवाखान्यातून तिला घरी आणले तेंव्हाचा तो आक्रोश अजूनही बेचैन करतो. बाबांना आम्ही काका म्हणत असू, ते काका हताश होऊन ओट्यावर बसले आणि त्यांना बिलगून लोक रडत होते, त्यामुळे ते आणखी रडत होते. आपल्या बापाला रडायला भाग पाडणार्या लोकांचा मला राग येत होता. ह्या सर्व गोंधळात आमच्याकडे असलेली एक म्हैस खंडाळा येथील सरकारी नर्सरीत काम करणाऱ्या माणसाकडे तीन वर्षांपासून राखायला दिली होती. ती कोणत्या अनामिक चाहुलीने त्या नर्सरीचे कुंपण ओलांडून चार पाच किमी रस्ता तुडवत बरोबर घरी पोहचली ते कळेना? ती सुटली कशी? तिला रस्ता कळला कसा? ती घरी आली कशी? असे अनेक प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत. बरं आईला नेण्यासाठी खादेकरी पुढे आले तोच आमच्या प्लॉटवरील कुत्र्याचे पिल्लुसुद्धा असेच दोनेक किमीचा अनोळखी रस्ता पार करत दारात उभे राहिले. नवीन घराचे बांधकाम सुरू होऊन वर्ष झाले होते, गाववस्तीपासून दूर असलेल्या ह्या ले आउटकडे त्याकाळी कोणी फिरकत नसे. त्या परिसरात चार घरे होती. तेथेच सापडलेल्या ह्या पिलाला तर ह्यापूर्वी कधी कोणी घरीही आणले नव्हते. तरी ते घरी पोहचले ते आपल्या घरधनिनीच्या अंतिम दर्शनासाठी...

(पान ६ वर)

पान१ वरून

## धर्मांधांचा दहशतवाद?



सर्व दहशतवादी संघटनांमधील दहशतवाद्यांना एकत्र करणे, त्यांना 'जिहाद'साठी लष्करी प्रशिक्षण देण्याचे उद्योग 'टीआरएफ'च्या म्होरक्यांनी सुरू केले. विशेष म्हणजे, या संघटनेचा जन्मदाता हा पाकिस्तानच. 'एफएटीएफ'कडून कर्जाऊ पैसे भीक म्हणून मिळावे म्हणून पाकिस्तानवर 'लष्कर-ए-तोयबा'सारख्या दहशतवादी संघटनांवर कारवाईचा दबाव वाढला होता. तसेच या दहशतवादी संघटनांसाठीच्या आर्थिक फंडिंगवरही 'एफएटीएफ'ची करडी नजर होती. त्यामुळे 'लष्कर-ए-तोयबा'वरून लक्ष विचलित करण्यासाठी पाकिस्तानने 'टीआरएफ'च्या नावाने दहशतवाद्यांची नवी पिल्लावळ जन्माला घातली.

काश्मिरी तरुणांची समाजमाध्यमांतून माथी भडकावणे आणि ऑनलाईन माध्यमातून दहशतवादी कार्यशैलीच्या विषपेरणीचे उद्योग 'टीआरएफ'ने केले ते शेजारी पाकिस्तानच्या जोरावरच. 'टीआरएफ'च्या काश्मीर खोऱ्यातील अशा देशविघातक कुकृत्यांमुळेच २०२३ साली या संघटनेवर भारत सरकारने बंदीही लादली. पण, पाकिस्तानकडून होणारा अविरत वित्तपुरवठा, शस्त्रास्त्रांची तस्करी आणि 'लष्कर-ए-तोयबा'च्या नापाक पाठबळामुळेच 'टीआरएफ' पाकव्याप्त काश्मीरमधून दहशतवाद्यांना पोसत आहे.

सर्वच प्रकारचे जागतिक उपाय या दहशतवादापुढे अपुरे पडले आहेत. आता भारतालाच भारत म्हणून यात परिणामकारक उपाय शोधावा लागणार आहे. 'इस्लामी दहशतवादमुक्त भारत' हे आपले स्वप्न नसून हक्क आहे व त्यासाठी आपल्याला कंबर कसून उभे राहावे लागेल. भारताची समस्या ही इस्लामी दहशतवादाइतकीच ढोंगी पुरोगाम्यांचीही आहे. या मंडळींना हिंदू दहशतवादाचे थोतांड पसरवायला संधी मिळते.

मात्र, असे काही घडले की, 'दहशतवादाला धर्म नसतो' असे राग आळवले जातात. दुःख वाटते ते या पर्यटकांचे, ज्यांनी खरोखरच कष्टाने कमावलेला आपला पैसा कुठल्या धर्माच्या लोकांच्या हातात पडणार आहे, याचा विचार न करता, काश्मीरला पर्यटनाला जाण्याचा निर्णय घेतला. देश म्हणून विचार करणार्या या पर्यटकांना भावपूर्ण श्रद्धांजली...

## भारताने चालवले सिंधूअस्त्र

वाढू शकतात. पाण्याच्या कमतरतेमुळे या क्षेत्रातील गंभीर घसरण एकूण आर्थिक विकासदरावर नकारात्मक परिणाम करेल. करारानुसार हमी दिलेल्या पाण्याच्या उपलब्धतेवर आधारित पाकने सिंचन पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय गुंतवणूक केली आहे. स्थगितीमुळे ही पायाभूत सुविधा कमी प्रभावी होईल. यामुळे गुंतवणुकीचे नुकसान होईल. पाणीटंचाईमुळे निर्माण होणारे आर्थिक संकट, विशेषतः सामाजिक अशांतता आणि राजकीय अस्थिरता निर्माण करू शकते. पाकच्या वेगवेगळ्या प्रांतांमधील पाणीवाटप हा आधीच एक संवेदनशील मुद्दा आहे. एकूण उपलब्धतेत घट झाल्याने हे ताण वाढू शकतात. परिणामी पाकच्या सिंध, पंजाब आणि बलुचिस्तान प्रदेशातली अशांतता अधिक वाढू शकते.

१९६० मध्ये भारत आणि पाकिस्तानने नदीच्या पाण्याच्या वाटपासाठी सिंधू पाणीकरारावर स्वाक्षरी केली. या करारात जागतिक बँक मध्यस्थ होती. या करारावर भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे अध्यक्ष अयुब खान यांनी दि. १९ सप्टेंबर १९६० रोजी कराची येथे स्वाक्षरी केली. या करारात सिंधू नदीप्रणालीतील सहा नद्यांचे पाणी भारत आणि पाकिस्तानमध्ये वाटण्यात आले होते. करारानुसार, बियास, रावी आणि सतलज या तीन पूर्वेकडील नद्यांचे नियंत्रण भारताला देण्यात आले, तर सिंधू, चिनाब आणि झेलम या तीन पश्चिमेकडील नद्यांचे नियंत्रण पाकिस्तानला देण्यात आले. पाकिस्तानच्या नियंत्रणाखालील नद्या भारतातून जातात. करारानुसार, भारताला सिंचन, वाहतूक आणि वीजनिर्मितीसाठी त्यांचा वापर करण्याची परवानगी आहे. याचा अर्थ असा की ८० टक्के पाणी पाकिस्तानच्या, तर उर्वरित २० टक्के पाणी भारताच्या वापरासाठी आहे.

## मेहनतीला सन्मान, अधिकार एकसमान

धील संबंध चांगले ठेवण्यास मदत करेल. पूर्वी या दोन वर्गांमधले संबंध असमान होते, तणावाचे होते. मालकाचे कायमच वर्चस्व दिसून येत असे. कायद्यांमधील अस्पष्टतेचा फायदा या वर्गाला मिळायचा. मात्र, अलिकडच्या बदलत्या कामगार कायद्यांमुळे या दोहोंमधील नात्यालाही वेगळे परिणाम लाभले आहे, वेगळी दिशा मिळाली आहे, असे म्हणता येईल. कामगार कल्याणाच्या अनेक योजनांमुळे परिस्थितीत सुधारणा होताना दिसणार आहे. मुख्य म्हणजे कोणत्याही एका वर्गाचा विचार न करता कामगार आणि मालक या दोहोंचाही समान पातळीवर विचार केला गेल्यामुळे राबविण्यात येणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत असंतोष वा नाराजी असण्याची कारणे आता कमी होत आहेत. ही बाबही क्लिष्टता कमी होऊन परस्परांमधील संबंध सुधारण्यास कारणीभूत ठरेल. कामगार संहितेमध्ये, कायद्यांमध्ये होणाऱ्या अशा सकारात्मक बदलांचा परिणाम कामगारांच्या कामावरही दिसून येईल. त्यांच्याकडून अधिक चोख, चांगले आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून काम होईल. खेरीज या बदलांकडे केवळ कामगार संहिता म्हणून पाहून चालणार नाही. कारण याचाच एक एक पदर स्किल इंडिया, मेक इन इंडियामधील योजनांमध्ये दिसणार आहे. कौशल्य धारण केलेले आजचे अनेक कामगार पुढे उद्योजक होतील, स्वत:चे छोटे-मोठे व्यवसाय सुरू करतील. कामगार म्हणूनच कार्यरत राहणाऱ्यांना आपल्या सुखसुविधांमध्ये, आर्थिक प्रगतीमध्ये चांगले चित्र बघायला मिळेल. या सकारात्मक दृष्टिकोनातूनही आपण यंदाच्या कामगार दिनाकडे बघू शकतो.

कथा
आल्हाद देशमुख




वैशाख महिन्यातली टळटळीत दुपार. बाराचा सुमार. कपाळावरचा घाम टिपत ती एका प्रशस्त वडाच्या झाडाखाली सावलीच्या आश्रयाला आली. बाजूला बोट धरून तिचा तीन-साडेतीन वर्षाचा लहान भाऊ उभा होता. दोघांची नजर समोरच्या निर्मनुष्य रस्त्यावर खिळली होती. डोक्यावर सूर्य आग ओकत होता. घाम पुसल्यावर त्याच हाताने तिने स्वतःचा फाटका- तुटका फ्रॉक कमरेखाली ओढला. आपलं उघडं पडत चाललेलं अंग ती कसातरी झाकण्याचा प्रयत्न करत होती. बाजूला उभ्या असलेल्या भावाच्या अंगावर कंबरेपेक्षा जरा मोठ्या आकाराची फाटकी- तुटकी चड्डी होती, पण त्याला त्याचे काही भान नव्हते. एक नजर रस्त्याकडे टाकून दुसऱ्यांदा तो आपल्या बहिणीकडे पाहत होता. पोटात भुकेने खड्डा पडला होता. पण जेवणाचं नाव काढलं की, आपल्याला जोरात मार बसतो, हे एव्हाना त्याला कळलं होतं. त्यामुळे तो गप्प होता.

तिची नजर समोरच्या रस्त्यावर कुणीतरी दिसेल का, याचा वेध घेत होती. थोडंसं जरी अन्न किंवा चार पैशांची भीक मिळाली की, ती आनंदाने घरी परतणार होती. अभिमानाने आईला सांगणार होती की, मी आता मोठी झाली आहे. कुटुंबाकरिता आता मीही कष्ट करू शकते. खाटेवर आजारी पडून असलेली तिची आई मग तिच्या डोक्यावरून हात फिरवणार होती. तिच्या चेहऱ्यावरचं ते छोटंसं हसू पाहण्याकरिता ती कितीही वेळ त्या झाडाखाली थांबणार होती. तशी तिची आई तिला कधीच झोपडीबाहेर पडू देत नसे. १२-१३ वर्षांच्या आपल्या पोरीवर कुणाची वाईट नजर पडू नये म्हणून ती शेताच्या कामावर गेली तरी झोपडीचं दार टेकवून जात असे, पण आज तिने हट्टच धरला. आईने अंगात ताप भरवून अंथरूण धरलं; त्यालाही आता आठवडा झाला. तिची आई जवळच्याच शेतावर कामाला जायची. पण तिथली माणसं तिला खूप त्रास देत. त्यात आता कामावर जाऊ शकत नसल्याने तिला कामावरून काढण्यात आलं होतं. बापाचा तर कुठे पत्ता नव्हता. भाऊ झाल्यावर लगेच काही दिवसांनी तो कुठेतरी पळून गेला होता. त्याने चोरी केली होती म्हणून पळाला असं लोक सांगत. खरं-खोटं काय ते तिला माहीत नव्हतं. आता घरातलं उरलंसुरलं सगळं संपत आलं होतं. अशावेळी दुसरं काम मिळेपर्यंत तिची आई याच रस्त्यावर भीक मागायला येत असे.

दुसरं काम तरी कुठलं? त्याच शेतावर विनवण्या करून परत जायचं आणि तिथला त्रास सहन करत राहायचा. लोक तिला पलीकडल्या गावात राहायला जायला सांगत. पण बाप कधीतरी परत येईल असं तिला वाटे. म्हणून ती इथेच राहत असे. ज्या रस्त्यावर ती भीक मागायला जात असे तो झोपडीपासून काही मैलांवर होता. इथे गावाजवळचा एक छोटा बस थांबा होता. त्याच्या एका बाजूला गाव व दुसऱ्या बाजूला शेताजवळ त्यांच्या तीन-चार झोपड्या अशी वस्ती होती. १२.०१ ची एसटी आली की त्यातून कुणी पैसे, अन्न असं काही पदरात टाकत असे. कधी कधी काही बैलगाड्याही इथून लोकांना गावाकडे घेऊन जायला येत. त्यांनी काही दिलं की मग तेवढा दिवस निभे. म्हणून मग तिनेच इथे यायचा हट्ट धरला. हो नाही करता करता तिला बाहेर पडता आलं. तिला जाताना पाहून भावाने भोकांड पसरलं म्हणून कंटाळून त्यालाही सोबत घेऊन आली. ''ताये भूक लागली. माझं पोट दुखतंय.'' भावाच्या बोलण्याने ती भानावर आली. ''थांब जरा. बस आली की, मग देते तुला.'' तिने त्याला समजावत म्हटले. ती थोडी अस्वस्थ झाली. बस यायची वेळ टळून गेलीय, असं तिला वाटलं. आज बस आलीच नाही तर? घरी आई माझ्या वाटेकडे डोळे लावून बसली असेल. मी काहीच नाही नेलं तर अख्ख घर आज उपाशी राहील. नाना विचार तिच्या मनात येऊन गेले. बसचा संप तर नाही? कुणीच कसं येत नाहीय अजून. तिने जिथवर जाईल तिथवर आपली नजर फिरवली; सगळीकडे शुकशुकाट होता. मधूनच झाडाच्या आश्रयाला आलेल्या पक्ष्यांचा किलकिलाट कानावर पडे. तेवढाच काय तो आवाज. कुणाला काही विचारावं तर आज आसपास कुणीच दिसत नव्हतं. कधी एखादी सायकल किंवा बैलगाडी जाई. मग काही बोलता मागता येत असे. आज कुणीही फिरकत नव्हतं. तिने थोड्यावेळ वाट बघितली. उभं राहून पाय दुखायला लागले.

शेवटी कंटाळून ती झाडाखाली बसली. भावाला मांडीवर घेतले. भावाने थकून तिच्या छातीवर डोकं ठेवलं अन् डोळे मिटले. काही वेळाने तिनेही आपलं डोकं मागे झाडाच्या खोडाला टेकवलं. पोटातल्या भुकेने व डोक्यावरच्या उन्हाने तिला ग्लानी आल्यासारखे वाटले. कधी डोळा लागला हे तिचे तिलाही कळले नाही. नंतर जाग आली ती ढगांच्या गडगडाटाने. तिने दचकून डोळे उघडले. मांडीवर भाऊ तसाच गाढ झोपला होता. तिने घाबरून समोर बघितले. रस्ता मघासारखाच निर्मनुष्य होता. तिला स्वतःचा संताप आला. 'अरे देवा! किती वेळ झाला? मला झोप कशी लागली? बस येऊन गेली असेल का? घरी आई वाट पाहत असेल. अजून काहीच मिळालं नाही. आता कसं करायचं?' तिची नजर वर आकाशाकडे गेली. काळे ढग जमा होऊ लागले होते. केव्हाही पाऊस सुरू होईल अशी परिस्थिती होती. ती चिंताग्रस्त झाली. मघाशी इतकं ऊन होतं. आता काय झालं. मी किती वेळ झोपली होते. आता कसं होईल अशा विचारात असताना दुरून कुठून तरी बैलांच्या गळ्यातल्या घुंगरमाळांचा आवाज आल्यासारखा तिला वाटला. तिने स्वतःला सावरलं. सगळं लक्ष एकवटून तिने कानोसा घ्यायचा प्रयत्न केला. आवाज आपल्याच दिशेने येतोय, याची खात्री तिला झाली. ती लगबगीने मागे वळली आणि भावाला उठवू लागली. तो डोळे चोळत उठला. ''ऊठ लवकर बाबू. उभा राहा. कुणीतरी येतंय. ते आले की, त्यांच्या समोर हात पसर. आणि काय म्हणशील? काही खायला देता का?'' ती त्याला समजावत म्हणाली. तो अजूनही डोळे चोळत होता.

चिडून तिने त्याच्या पाठीत धपाटा घातला. ''अरे काय म्हणशील? बोल ना...'' तिने पुन्हा विचारले. ''काही खायला देता का?'' त्यानेही वैतागून म्हटले. ''अरे तुला भूक लागली ना? मग त्यांनी काही दिलं तर आपण खाऊ. आईलाबी देऊ. तिला ताप हाय ना?'' तिने पुन्हा समजावणीच्या सुरात म्हटले. ''हो. पण माझं पोट दुखतंय ताये.'' तो रडकुंडीला येऊन म्हणाला. ''हो बाबू. तुला खाल्लं की बरं वाटेल.'' तिने पुन्हा त्याला समजावले. तेवढ्यात पावसाचे थेंब अंगावर पडू लागले. तिला पुन्हा काळजी वाटली. अन्न मिळालं तरी घरी कसं नेऊ? कशाने झाकू? तिने आजूबाजूला नजर फिरवली. कुठेच काही दिसत नव्हते. तिला पावसाचा संताप आला. तासाभरापूर्वी उन्हामुळे वैतागलेली ती आता पावसाला नावं ठेवत होती. बैलगाडी आता नजरेच्या टप्प्यात आली होती. ती आपल्याच दिशेने येतेय हे पाहून तिला दिलासा मिळाला. तिने आकाशाकडे हात जोडून म्हटले ''देवा! काहीतरी मिळू दे.'' भावाचा हात हातात घेऊन ती रस्त्याच्या मध्ये जाऊन उभी राहिली. काहीही झालं तरी इथून काहीतरी मिळवायचंच. तिने मनाशी पक्कं ठरवलं. शेवटी ती बैलगाडीजवळ येऊन थांबली. त्यात धोतर-पगडी घालून बसलेली दोन मध्यम वयाची माणसं तिला दिसली. त्यांच्या शेजारी जरतारी पातळ नेसलेल्या त्यांच्या बायकाही होत्या. ती भावाला घेऊन बैलगाडीच्या मागे गेली. शक्य तितकी करुणा डोळ्यात जमा करून तिने हात पसरला.

(पान ६ वर)

संत

प्रकाश एदलाबादकर

# सदा सर्वदा देव सन्नीध आहे...

संतप्रवर शांतिब्रह्म ज्ञानेश्वर माउली, भक्तीचे मळे फुलविणारे संत नामदेव, शांतिब्रह्म संत एकनाथ, समाजशील संतश्रेष्ठ जगद्गुरू संत तुकाराम महाराज आणि राष्ट्रगुरू समर्थ रामदास या पाच संतश्रेष्ठांनी महाराष्ट्राच्या मातीचे सांस्कृतिक भरणपोषण केले. संत ज्ञानेश्वरांपासून समर्थांपर्यंतचा महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास बघितला तर ही बाब चटकन लक्षात येते. भक्तिमार्गाच्या माध्यमातून या श्रेष्ठींनी, महाराष्ट्रातील जनसामान्यांची मने तयार करण्यापासून मनगटे तयार करण्यापर्यंत कार्य केले.

आपल्या उपदेशांमधून आणि प्रत्यक्ष कृतींमधून लोकजागृती केली. या संतांच्या साहित्याचे अवलोकन करताना किंवा त्याचा अभ्यास करताना तत्कालीन सामाजिक परिस्थिती लक्षात घेणे गरजेचे असते. त्यांची वचने ही त्या काळच्या समाजमनाची प्रतिबिंबे असतात. राष्ट्रगुरू समर्थ रामदास यांनी तत्कालीन समाजाला उद्देशून प्रवृत्तिपर उपदेश केला. मरगळलेली सामाजिक मानसिकता दूर करण्याचा प्रयत्न केला. शक्तीची उपासना करण्याचा त्यांचा आग्रह होता. रणरागिणी तुळजाभवानी माता, कोदंडधारी प्रभू रामचंद्र आणि बलभीम हनुमंत हे त्यांनी समाजापुढे आणि उपासकांपुढे आदर्श ठेवले. जो सर्वार्थाने सामर्थ्यवान असेल त्याच्याकडे कुणीही वाकड्या नजरेने बघूच शकणार नाही, असा आत्म विश्वास त्यांनी जनमानसात निर्माण केला.



**समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे।। जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही। नुपेक्षी कदा रामदासाभिमानी।।** वरील श्लोक कानावर पडला की, कधीही न बघितलेल्या समर्थांची, तत्कालीन कवींनी वर्णन केलेली लालसर- गौर मूर्ती मनःचक्षूंसमोर साकारली जाते. सूर्योपासनेने कमावलेले बलदंड शरीर, भव्य कपाळ, मानेपर्यंत रुळणाऱ्या जटा, छातीवर विसावलेली दाढी, कपाळावरचे आवाळू, अंगावर भगवी छाटी, काखेत झोळी, हातात कुबडी आणि पायात खडावा! संतश्रेष्ठ तुकोबारायांनी समर्थांचे वर्णन केले आहे. **हुरमुजी रंगाचा उंच मोती दाणा । रामदासी बाणा या रंगाचा।। पीतवर्ण कांती तेज अघटित । आवाळू शोभत भ्रुकुटीमजी ।। कौपीनपरिधान मेखला खांद्यावरी। तुंबा कुबडी करी समर्थांच्या।। रामनाममुद्रा द्वादश हे टिळे। पुच्छ ते वळवळे कटीमाजी ।। कष्टाच्या खडावा स्वामींच्या पायात । स्मरणी हातात तुळशीची।। कृष्णेच्या तटाकी जाहले दर्शन। वंदिले चरण तुका म्हणे ।।** स्वाती नक्षत्रात पडणारा पाऊस वेगळाच असतो. सागराच्या किंवा नदीपात्राच्या तळाशी उघड्या शिंपल्यामध्ये या पावसाचे थेंब पडले की शिंपले मिटते. त्या थेंबाचा मोती होतो. अगदी पहाटे तांबडे फुटल्यावर जो रंग आकाशात पसरतो त्याची गडद झाक या पांढऱ्या रंगात मिसळलेली असते. त्या रंगाला हुरमुजी रंग म्हणतात. समर्थ या हुरमुजी मोतीदाण्यासारखे होते, असे तुकोबाराय लिहितात.

अवघ्या महाराष्ट्राला 'जय जय रघुवीर समर्थ' या मंत्राची दीक्षा देणाऱ्या आणि मुख्य म्हणजे आत्मबलासोबतच शरीरबलाचीही जोपासना करण्याची शिकवण देणाऱ्या समर्थांनी आपल्या धीरगंभीर वाणीने आणि चैतन्यप्रसवा लेखणीने इतिहासाला कलाटणी दिली. समर्थांना हे जग सोडून आज ३०० च्यावर वर्षे झाली. परंतु, समर्थांचे विचार आजही महाराष्ट्राच्या जनमानसावर एखाद्या शिलालेखासारखे कोरलेले आहेत. समर्थ हे कर्ममार्गाचा पुरस्कार करणारे संत होते. आज राजकारण हा शब्द खूप बदनाम झालेला आहे. त्याची कारणे अनेक आहेत. त्याचा इथे ऊहापोह करण्याचे कारण नाही. राजकारणी माणूस म्हटले की, सर्वसामान्य त्याच्यापासून जरा अंतर राखूनच वागतो. कारण आजचे राजकारण हे पूर्णतः सत्ताकारण झालेले आहे. आजच्या राजकीय क्षेत्रातील गळेकापू स्पर्धा आणि परस्परांवरील चिखलफेक ही संवेदनशील माणसाला व्यथित करणारी आहे. राजकारण समर्थांच्याही काळी होते, नाही असे नाही, परंतु त्याचा आशय वेगळा होता, अर्थ वेगळा होता. 'धर्मो रक्षति रक्षितः' असे एक वचन आहे. धर्माने आपले रक्षण करावे असे वाटत असेल, तर आपण धर्माचे रक्षण केले पाहिजे. ज्याच्या साह्याने आपले रक्षण व्हावे असे वाटते त्या त्या प्रत्येकच साधनाचे आपण रक्षण केलेच पाहिजे. मग ते विचारांचे शस्त्र असो वा प्रत्यक्ष युद्धप्रसंगी वापरावयाचे शस्त्र असो. स्वधर्माचे रक्षण योग्य प्रकारे होण्यास, स्वधर्माचा आणि स्वराष्ट्राचा अभिमान असणारा सामर्थ्यसंपन्न राजा पाहिजे. धर्माच्या रक्षणासाठी राजा आणि राज्य यांचे महत्त्व समर्थांनी जाणले होते. संस्कृतीच्या रक्षणासाठी असे राजकारणाचे कवच त्यांना आवश्यक वाटत होते. **देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा । मुलुख बडवावा की बुडवावा । धर्मस्थापनेसाठी ।।** हे समर्थांचे उद्गार आहेत.

शक्तीच्या उपासनेशिवाय आणि सावध राजकारणाशिवाय हे नाही, हे समर्थांना ठाऊक होते. आपला राजा आणि त्याच्या पाठीशी उभा असलेला शस्त्रसंपन्न धर्माभिमानी समाज, छत्रपती शिवरायांच्या रूपाने त्यांना याची देही याची डोळा बघायला मिळाला हा इतिहास आपण जाणतोच. **उद्धरेदात्मनात्मानं नात्मानम वसादयेत । आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ।।** गीतेमधील या श्लोकाचा मथितार्थ आहे तरी काय? स्वतःचा उद्धार आणि स्वतःची मुक्ती करून घेणे याचाच अर्थ हा विचारस्वातंत्र्याचा आणि आचारस्वातंत्र्याचा पुरस्कारच आहे. परंतु असे स्वत्व, अशी मुक्ती भोगायची असेल, तर परिसरातील सामाजिक, राजकीय, वैचारिक वातावरणही त्याला पोषक असणे आवश्यक असते. असे वातावरण काही सहजासहजी मिळत नसते. ते तयार करावे लागते, घडवावे लागते. त्यासाठी अपरंपार कष्ट करावे लागतात. सतत फिरते असावे लागते. विजनवासात राहून स्वजनांसाठी झिजावे लागते.

पारतंत्र्य आणि परकीय दास्य यांच्या विरोधात विद्वेषाचा अग्नी मनामध्ये अखंड, अप्रतिहत धगधगत ठेवावा लागतो. हा अग्नी धगधगत ठेवण्याचे कार्य समर्थांनी सर्वस्व पणाला लावून केले. समर्थांच्या काळी राज्यकर्ते परकीयच होते असे नाही, तर त्यांची राजकीय, सामाजिक, वैचारिक, सांस्कृतिक आणि धार्मिक मूल्येही या राष्ट्राच्या मातीतील कधीच नव्हती. त्यांची दृष्टी वेगळी होती, ध्येये वेगळी होती, त्यांचे जगण्याचे अर्थ वेगळे होते, स्वार्थही वेगळे होते. त्या काळातील जनतेच्या पिचलेल्या मनांची आणि खंगलेल्या शरीरांची तडफड आपल्या प्रवासात समर्थांनी पाहिली होती. पारतंत्र्याची आणि पराभूत मनोवृत्तीची समर्थांना विलक्षण चीड होती. समाजाचे शारीरिक आणि मानसिक दुबळेपण नष्ट व्हावे यासाठी समर्थांनी प्रभू रामचंद्रास साकडे घातले होते. **परतंत्र जीणे कंठू किती रे । उच्चाट माझे मनी वाटतो रे । ललाटरेखा तरी पालटेना । तुजवीण रामा मज कंठवेना ।। अहा रे विधी असे त्वां काय केले । पराधीनता पाप माझे उदेले । बहुता मधे तूकतां तूक तुटे । उदासीनता काळ कोठे न कंठे ।।** उपरोक्त ओळींमध्ये समर्थांची स्वातंत्र्याची लालसा आणि ओढ प्रकट होते. समर्थ हे त्याकाळी कोणत्याही संप्रदायात नव्हते. समर्थांना कोणताही मानवी गुरू नव्हता. प्राचीन साहित्याचा समर्थांचा व्यासंग फार मोठा होता. म्हणूनच त्याकाळी समर्थांनी प्रथमतः लोककारण केले.

समर्थांना राजकारणाचे वावडे नव्हते, परंतु प्रथमतः लोकांची मने तयार केली पाहिजेत आणि नंतर त्यांची मनगटे, हे त्यांनी पुरेपूर जाणले होते. म्हणूनच ते सांगतात... **पहिले ते हरिकथा निरूपण। दुसरे ते राजकारण । तिसरे ते सावधपण । सर्वां विषयी ।।** हे सावधपण हाच समर्थांच्या राजकारणाचा स्थायीभाव आहे. समाजधारणा व्यवस्थित व्हावी अशा विचाराने त्यांनी परमार्थासोबतच ऐहिकाचाही विचार केलेला आहे. या बाबतीत समर्थ हे बुद्धिवादी दृष्टीने विचार करणारे संत आहेत. 'राजकारण निरूपण' या दासबोधातील समासात समर्थांनी मांडलेले विचार आजच्या राजकारणी मंडळींनी अवश्य अभ्यासले पाहिजेत. समास भरपूर मोठा आहे. त्यातील सर्वच तपशील येथे देणे शक्य नाही. परंतु सांप्रत महाराष्ट्रात आणि देशात जे राजकीय वातावरण आहे, देशाचे तुकडे करण्याच्या वल्गना होत आहेत, राजकारणातील दुष्ट-दुर्जन आणि गलिच्छ प्रवृत्तींना पाठीशी घालण्याचे लाजिरवाणे प्रकार सुरू आहेत, त्या पृष्ठभूमीवर समर्थांचे विचार आजही किती लागू पडतात पहा. म्हणूनच समर्थ हे द्रष्टे संत होते. त्या काळाच्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचा वेध घेत यांनी लिहिलेले शब्द भविष्याचाही विचार करणारे होते, हेच यातून प्रतीत होत नाही काय? ते लिहितात... **मुख्य सूत्र हाती घ्यावे। करणे ते लोकांकरवी करवावे। कित्येक खलक उगवावे। राजकारणामध्ये।। बोलके पहिलवान कळकटे। तयासीच घ्यावे झटे। दुर्जने राजकारण दाटे। ऐसे न करावे।। खळ दुर्जनांसी भ्याले। राजकारण नाही राखिले। तेणे अवघे प्रगट झाले। बरे वाईट ।। ही धूर्तपणाची कामे । राजकारण करावे नेमे। ढिलेपणाच्या संभ्रमे। जाऊ नये।। राजकारण बहुत करावे । परंतु कळोच न द्यावे । परपीडेवारी नसावे। अंतःकरण ।।** बालपणाची वर्षे, नंतर १२ वर्षे पुरश्चरण, नंतर तीर्थाटन करून आणि त्यातून त्या काळचे देशकाल वर्तमान बघून समर्थ महाराष्ट्रात आले, त्यावेळेस ते ३५-३६ वर्षांचे होते, असे अनुमान काढायला काही प्रत्यवाय नसावा. मुद्दा हा की, लोकांची सुख-दुःखे त्यांनी जवळून बघितली होती. लोकव्यवहाराचे बारकाईने निरीक्षण केले होते. तत्कालीन परकीय राज्यकर्त्यांच्या अत्याचारांचे त्यांना दर्शन झाले होते.

सर्वसामान्य प्रापंचिक जनतेचे, उपेक्षितांचे आणि अपराधजाणिवेने भरलेले जीवन त्यांच्या नजरेला आलेले होते. त्यांचे मन,अस्मानी आणि सुलतानी दोन्ही संकटात भरडत असलेल्या जनतेच्या दुःखाने कळवळून उठले. परमार्थ तर हवाच, परंतु प्रपंचही हवा आणि तोही सुखीसंपन्न हवा यासाठी त्यांनी ऐहिकाचाही विचार केला. प्रपंच परमार्थ विवेक मांडला. त्या काळच्या आपत्तीमधून बाहेर पडण्यासाठी समर्थांनी दाखवलेला मार्ग स्वच्छपणे ऐहिकाचा होता. नशिबावर भरवसा न ठेवता मनगटावर आणि मनाच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवण्याचा तो मार्ग होता. **सदा सर्वदा देव सन्नीध आहे। कृपाळूपणे अल्प धारिष्ट्य पाहे किंवा देव मस्तकी धरावा।** अवघा हलकल्लोळ करावा यासारखी समर्थ वचने याची द्योतक आहेत. राजकारणाचे जसे विवेकी आणि सावध स्वरूप समर्थांनी प्रतिपादन केले तसेच, लढाऊ स्वरूपही सांगून महाराष्ट्राला क्षात्रधर्मही शिकविला. आपल्या देवदेवतांची तोडून टाकलेली देवस्थाने बघून त्यांचे मन नुसतेच कळवळून उठले नाही, तर संतापूनही उठले. महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानीच्या मंदिराचा क्रूरकर्मा अफजल खानाने केलेला विध्वंस त्यांच्या मनात सलत होता. समर्थांचा 'दासबोध' हा केवळ पारायण करून लालभगव्या कपड्यात गुंडाळून देवघरात ठेवण्याचा ग्रंथ नाही. तो ग्रंथ व्यवहार शिकविणारा, यशस्वीपणे जगण्याचा मंत्र शिकविणारा ग्रंथ आहे. आपली भविष्यातील पिढी ही व्यवहारचतुर, क्षात्रतेजाने लखलखणारी, विद्यासंपन्न आणि राष्ट्रभक्तीने ओतप्रोत अशी व्हावी असे वाटत असेल, तर समर्थांचे विचार, समर्थांची शिकवण आणि ग्रंथराज दासबोध यांना पर्याय नाही.

।। जय जय रघुवीर समर्थ।।

# कुष्ठरोग: कारणे व उपाय

आजीचा बटवा

नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१

कुष्ठात श्वेत कुष्ठ व रक्त कुष्ठ असे दोन भेद आहेत. येथे फक्त श्वेत कुष्ठाचा विचार केला आहे.



**श्वेत कुष्ठाची कारणे:-**
विष प्राशन, मलमूत्राचे वेगधारण, उष्ण पदार्थ फार खाणे, जागरण अतिमद्यपान, अतिविषय सेवन ही शारीरिक कारणे आहेत. स्त्रीने विटाळशी असताना समागम केला आणि त्यावेळी गर्भ राहिला तर संतती कुष्ठ होते.
पूर्वसंचितानुरूप कुष्ठरोग होतो, अशीही कल्पना आहे.

**लक्षणे:-**
सर्व अंगभर ठिकठिकाणी पांढरे डाग येतात किंवा सर्व शरीर पांढरे होते, केस गळतात. त्वचा तुकतुकीत दिसते. मळातून जंतू पडतात.

**श्वेत कुष्ठावर उपाय:-**
प्रथम रेचक (एरंडेल) देऊन कोठा साफ करावा. दुसरे दिवशी मूत्रढाळ द्यावा. म्हणजे कोष्ठ शुध्दी होते. मग तिसऱ्या दिवसापासून औषध योजना करावी.
१) रोज मूठभर भाजलेले काजू रात्री झोपताना चांगले चावून खावे वर पाणी पिऊ नये. २) सारिवासव २ तोळे, २ तोळे भोजनोत्तर पाण्यातून दोन्ही वेळ द्यावे. ३) सराट्याचा काढा सकाळ- संध्याकाळ मध घालून द्यावा. ४) वाकेरीचे भाते दुधात उगाळून सकाळ- संध्याकाळ द्यावा. ५) कडू कवठाचे तेल अंगास चोळावे. ६) गंधक शुध्द करून चूर्ण करून एक गुंज चूर्ण सकाळ- संध्याकाळ दुधातून घ्यावे. ७) पांढऱ्या गोकर्णीचे मूळ पाण्यात उगाळून लेप करावा.

**पथ्य:-**
तूप, साखर, चपाती, जुन्या साळीचा भात, गुलकंद, तांबड्या तुरीचे वरण, पडवळ, शेवगा यांच्या भाज्या, सुरण, आंबा, खजूर, खारीक, मनुका, द्राक्षे, दूध, तूप, ताजे लोणी, तीळ, हळद, देवकापशी, थंडपाणी, मोरावळा, सकाळी थंड पाण्याने अंघोळ, ब्रम्हचर्य.

**अपथ्य:-**
मीठ, तिखट, तेलकट, आंबट, वावडे पदार्थ, पुरणपोळी, वांगे, आंबट, वावडे पदार्थ, पुरणपोळी, वांगे, रताळी, बटाटा. गोवारी. पपई, फणस इत्यादी.

**रक्तदाब:-**
घाईगर्दीचे जीवन, धावपळ, अविश्रांत श्रम किंवा शोक, भय, दुःख इत्यादी कारणांनी रक्ताचा दाब वाढतो किंवा कमी होतो. माणसाचे वय, वजन व उंची याला अनुसरूनच रक्ताचा दाब थंड पाण्यात उगाळून एक चमचाभर असावा लागतो. तो त्यापेक्षा वाढला किंवा कमी झाला म्हणजे रक्तदाबाचा विकार झाला असे म्हणतात.

**लक्षणे:-** हृदयाचे ठोके कमी अधिक होतात. कामात वारंवार चुका होतात. अतिसार होतो किंवा मलावष्टंभ होतो. वजन घटते, स्वभाव चिडखोर बनतो.

**उपाय:-**
१) पुनर्नव्याचा काढा खडीसाखरेची पूड घालून सकाळी ५ तोळे १४ दिवस द्यावा. पथ्य तूप, भात, मीठ वर्ज्य. २) अश्वगंधारिष्ठ १ तोळा, पुनर्नवासव १ तोळा पाणी २ तोळे असे मिश्रण भोजनानंतर दोन्ही वेळा दिवस १४ द्यावे. पथ्य तूप, भात, मीठ वर्ज्य.

**रक्तदाबास पथ्य:-**
रूक्ष व हलका आहार, चिंता न करणे, धार्मिक ग्रंथ वाचन, व्रतोपवास करणे, सत्संगती

**रक्तदाबास अपथ्य:-** मीठ अति खाणे, दिवसा निजणे, जागरण, मद्यपान, कुसंगती. रक्तदाबात निद्रानाश झाला असता झोप येण्यासाठी सर्पगंधाची मुळी थंड पाण्यात उगाळून एक चमचाभर गंध रात्री झोपतेवेळी घ्यावे.

**हृदयरोग:-** हृदयरोगाची कारणे दोन प्रकारची आहेत. एक शारीरिक व दुसरे मानसिक. शारीरिक कारणात घाईगर्दीचे जीवन, अनियमित आणि जडान्न सेवन, उपवास, अजीर्ण, जागरण, अतिमार्गक्रमण, मंदोवृध्द, आजारपणामुळे रक्त कमी होणे इत्यादी. मानसिक कारणात चिंता, भय, दुःख, शोक, आनंद, ईर्षा, लोभ, मोह, वैर, तृष्णा इत्यादी कारणाने मानसिक क्षोम होऊन हृदयाचे स्वास्थ्य बिघडून त्याच्या कार्यात व्यत्यय येतो व त्याचेच पर्यावसान हृदयरोगात होते.

**लक्षणे:-**
रक्तदाब वाढतो किंवा कमी होतो. हृदय कुरकुरते, श्रम सहन होत नाहीत, दम लागतो, जीव घाबरा होतो, निरूत्साही इत्यादी लक्षणे दिसून येतात, निद्रानाशही होतो.

**उपाय:-**
१) अर्जुन सादडा (तांबडा धावडा) या झाडाची साल सावलीत सुकवून त्याचे चूर्ण करावे. ते चूर्ण वस्त्रगाळ करून त्याचा दुधात काढा करून खडीसाखर घालून द्यावा.
२) सुंठ साखर यांचा काढा करून तो गरम गरम घ्यावा.
३) सोललेला लसूण दोन तोळे तुपात तळून खावा वर धारोष्ण दूध प्यावे.
४) पुष्कर मुळाचे चूर्ण मधातून द्यावे.
५) कुटकी व ज्येष्ठमध याचे समभाग चूर्ण वस्त्रगाळ करून ऊन पाण्याबरोबर घ्यावे.
६) बाळहिरडे, वेखंड, रास्ना, पिंपळी, सुंठ, नागरमोथे, पुष्कर मूळ यांचे चूर्ण दरवेळी पाव तोळा सकाळ- संध्याकाळ मधातून द्यावे.
७) गहू, अर्जुन सादडा यांचे चूर्ण शेळीच्या दुधात गाईचे तूप घालून शिजवावे व मध साखर घालून द्यावे.
८) म्हाळुंगाच्या रसात पिपळीचे चूर्ण व लोणी घालून द्यावे.

**पथ्य:-**
जुना तांदूळ, पडवळ, केळे, जून कोहळा, आंबा, डाळिंब, बाहणा, जुना मूळ, लसूण, धणे, पांढरा मध व विडा.

**अपथ्य:-**
तृष्णा, वांती, मूत्र, वायू, खोकला, ढेकर, श्रम, श्वास, रूदन यांच्या वेगाचे धारण, मेंढीचे दूध, तुरट, खारट खाऊ नये.


थोडं मनातलं

विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

## मानवतावादी धर्माचा साक्षात्कार

(भाग ४४)





रवींद्रनाथ हे भारतीय संस्कृती आणि परंपरांचे अभिमानी असले आणि भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी म्हणून परदेशात त्यांनी प्रतिनिधित्व केले असले तरी देखील नेहमीच पारंपारिक गोष्टी जशाच्या तशा स्वीकारण्यापेक्षा त्यावर विचार करून, त्यात काहीतरी बदल घडवून आणण्याचा त्यांचा प्रयत्न नेहमीच राहिला. त्यांची धर्मविषयक कल्पना सुद्धा अशाच प्रकारे विकसित पावली. भगवद्गीतेमध्ये परमेश्वरापर्यंत पोहोचण्याचे तीन मार्ग सांगितले आहेत.

ज्ञानमार्ग, भक्तीमार्ग आणि कर्ममार्ग. परंतु रवींद्रनाथांचे म्हणणे असे की अशा वेगवेगळ्या प्रकारे परमेश्वर प्राप्तीचा प्रयत्न करण्यापेक्षा ज्ञान, भक्ती आणि कर्म यांचा मेळ घालून परमेश्वरापर्यंत आपल्याला पोहोचता येईल.

**ईशोपनिषदात असे म्हटले आहे की,**
**ईशावास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत्।**
**तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्यस्विद्धनम्।।**

(याचा अर्थ हे सर्व चराचर जग ईश्वराने व्याप्त आहे. त्याचा जाणीवपूर्वक उपभोग घ्यावा. मी त्याचा मालक आहे, हे सर्व माझे आहे या भावनेने त्यांचा उपभोग घेऊ नये.) या दृश्य जगातील प्रत्येक गोष्ट परमेश्वराने व्यापलेली असली तरी सुद्धा रवींद्रनाथांच्या मते मानव हा परमेश्वराचे सर्वात जवळचे रूप आहे. मानवात परमेश्वर विद्यमान आहे. मानवाच्या माध्यमातून त्या अदृश्य आणि सर्व शक्तीमान परमेश्वरापर्यंत पोहोचता येणे शक्य आहे. ईश्वराची कृपादृष्टी मानवावर मानवाद्वाराच होऊ शकेल असे ते म्हणतात.

आपले म्हणणे स्पष्ट करण्यासाठी ते स्त्रीचे उदाहरण देतात. एकच स्त्री वेगवेगळी नाती आणि भूमिका निभावते. ती कोणाची मुलगी असते, कोणाची बहीण असते, कोणाची तरी मैत्रीण असते, कोणाची तरी पत्नी असते. परंतु तिच्या मुलासाठी तिचे केवळ एकच असे दृढ नाते असते. ते म्हणजे आई आणि मुलाचे. केवळ आईच्या नात्यामुळेच तिचा मुलाशी निकटचा आणि सबळ संबंध असतो. त्यावेळी जगातली इतर नाती तिच्या दृष्टीने अनोळखी आणि निरुपयोगी अशी असतात. त्याचप्रमाणे परमेश्वर जरी वेगवेगळ्या रुपात व्यक्त होत असला तरी तो मानवासाठी मानव म्हणून अधिक जवळचा आहे.

परमेश्वर मानवासमोर मानवतेच्या सच्चा आणि दृढ स्नेहाच्या स्वरूपात प्रकट झाला आहे. त्याच्या या नात्यामुळेच आपण त्याला ओळखू शकतो, त्याच्यावर प्रेम करतो आणि त्याची सेवाही करतो. ईश्वराचा शोध घेण्याच्या घेण्याच्या त्यांच्या या प्रयत्नामुळे त्यांना मानवातील ईश्वराचा साक्षात्कार झाला. त्याची निष्काम सेवा करण्याचा विचार त्यांच्या मनात दृढ झाला.

आपण केवळ ज्ञान, प्रेम आणि सेवा यांच्या माध्यमातूनच त्या अदृश्य शक्तीपर्यंत (ईश्वरापर्यंत) पोहोचू शकतो हा त्यांचा चिंतनातून निर्माण झालेला विचार होता. रवींद्रनाथांच्या धर्मविषयक संकल्पनेचा मानव हाच केंद्रबिंदू होता. ऑक्सफर्ड विद्यापीठामध्ये १९३० मध्ये जी हिबर्ट व्याख्यानमाला झाली, त्या व्याख्यानमालेमध्ये देखील त्यांनी आपले हेच विचार प्रकट केले. मानवता धर्माचा उद्घोष त्यांच्या व्याख्यानात होता. त्यांचे हे विचार 'रिलीजन ऑफ मॅन' या ग्रंथात प्रकाशित करण्यात आले आहेत. या आध्यात्मिक साक्षात्कारानंतर त्यांनी स्वतःच्या हृदयातील ईश्वराचा शोध घेण्याचे थांबवून सामान्य माणसांमध्ये ईश्वराला पाहणे पसंत केले. त्यांच्या दृष्टीने असंख्य अशी सामान्य माणसे क्षुद्र नव्हती तर ईश्वराचा साक्षात अवतार होती. जनता हीच जनार्दन. हिच गोष्ट त्यांच्या कवितेची प्रेरणा ही ठरली. त्यांच्या एका कवितेतील काही ओळी अशा आहेत...

असंख्यांना एका सूत्रात बांधून
**ज्या विश्वात तू आहेस**
**माझी अन तुझी ही**
**तिथेच युती आहे**
**न वनात न विजनात**
**न माझ्या मनात**
**जिथे तुझी माया जडे**
**तिथेच माझेही प्रेम जडे.** (गीतांजली)

मंदिर मशिदीत देवाला शोधण्यापेक्षा माणसातच त्याचा शोध घ्यायला हवा असे ते म्हणतात. मानवाला भेटा, त्याच्या कष्टात, घाम गाळण्यात सहभागी व्हा. धार्मिक माणसाने कष्ट आणि परिश्रम यांच्या माध्यमातूनच ईश्वराला भेटले पाहिजे. सामान्य माणूसच प्रेम आणि सेवा यांचा केंद्रबिंदू ठरला पाहिजे. कारण त्या मार्गेच ईश्वराची कृपा संपादन करता येते. त्यामुळेच ईश्वराचे निकटतम रूप आपल्यासमोर साकार होते. अशा तर्हेने रवींद्रनाथांचा मानवतावाद व्यक्त झालेला आपल्याला दिसतो. त्यांच्या दृष्टीने ईश्वर हा प्रामुख्याने अशिक्षित, दरिद्री समाजामध्ये वसलेला आहे.

मजूर रस्ते करण्यात मग्न आहेत तर शेतकरी धान्य पिकवण्यात. हे सगळे लोक निढळाचा घाम गाळतात. ईश्वर सर्वांमध्ये आहेच पण केवळ सुस्थितीत असलेल्या लोकांकडेच ईश्वराचे रूप म्हणून बघू नये तर असे दरिद्री कष्टकरी लोक हे ईश्वराचे रूप आहेत. आपल्या एका कवितेत ते म्हणतात...

**जिथे तो जाई तिथे तो पाही**
**भूमी नांगरून चाललेली शेतीभाती**
**दगड फोडून रस्ते करती**
**बारोमास देह कष्टविती**
**तो आहेच उन्हात पावसात सुद्धा**
**धुळीने माखलेला फाटका कुडता पाहून**
**शुभ्र वसने द्या टाकून नि बसा**
**त्याप्रमाणे ह्या संगे धुळीत.**

(गीतांजली- इंग्रजी आवृत्ती ) कोणतेही काम केवळ व्यक्ती हितास्तव करू नये. ते समाजाच्या व्यापक कल्याणासाठी असावे. ईश्वराचा सेवक हा सर्व संचारी कार्यकर्ता बनला पाहिजे. कामे कितीही छोटी असो, ती सर्वव्यापी समजूनच करावी. अशा कामाने विश्वकर्म्याचा साक्षात्कार होतो. विश्वकर्मा म्हणजे जो सर्वांसाठी काम करतो, जो संपूर्ण विश्वासाठीच जणू काम करतो असा! (रिलीजन ऑफ मॅन )

ईश्वराची सेवा करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे मानवाची सेवा करणे. यामध्ये गोरगरीब, अशिक्षित आणि दरिद्री लोकांची सेवा प्रामुख्याने येते. रवींद्रनाथांचा हा मानवतावाद धर्मावर आधारलेला आहे. पाश्चिमात्य विचारवंत सुद्धा मानवतावादाची कल्पना मान्य करतात परंतु त्यांच्या विचारात धर्माला स्थान नाही तर रवींद्रनाथांचा मानवतावाद हा धर्मावर आधारित आहे. मानवता हाच त्यांच्या दृष्टीने सर्वात मोठा धर्म आहे.

ईश्वरावरील डोळस श्रद्धा आणि धर्मभावनेतून त्यांचा मानवतावाद निर्माण झाला आहे. हाच मानवतावादाचा उदात्त दृष्टिकोन बाळगून रवींद्रनाथांनी आयुष्यभर मानवतेची सेवा केली. त्यांचे साहित्य, त्यांच्या शिक्षणविषयक कल्पना, त्यांचे सामाजिक आणि शैक्षणिक कार्य या साऱ्या गोष्टींचा केंद्रबिंदू मानवच राहिला.

# ग्रहसंकेत

**(रविवार, २७ एप्रिल ते शनिवार, ३ मे २०२५)**

**नारायण जगन्नाथ कारंजकर,** ज्योतिष भास्कर

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २७ एप्रिल-** दर्श अमावास्या, सत्तु अमावास्या, अन्वाधान, भरणी रवि, भैरवनाथ यात्रा शिंगणे ता. आंबेगाव, काळ भैरवनाथ यात्रा हिंगणीगाडा (ता. दौंड), वज्रेश्वरी यात्रा वसई, नारायण स्वामी पुण्यतिथी नृसिंहवाडी, श्रीरामवर दायिनी यात्रा महाबळेश्वर, निनाईदेवी यात्रा, नागनाथदेव यात्रा मोहोळ ✻ **सोमवार, २८ एप्रिल-** इष्टि, वैशाख मासारंभ, रामचंद्र यादव महाराज पुण्यतिथी (कोल्हापूर), भवानीदेवी यात्रा यादवनगर, श्री भैरवनाथ-जोगेश्वरी यात्रा तरडगाव (ता. फलटण) ✻ **मंगळवार, २९ एप्रिल-** श्री परशुराम जयंती, चंद्रदर्शन (२०:५९ पर्यंत), शिवजयंती (परंपरेने), देव भार्गवराम उत्सव क्षेत्र परशुराम, चिपळुण ✻ **बुधवार, ३० एप्रिल-** महात्मा बसवेश्वर जयंती, अक्षय्यतृतीया, कल्पादी, जलकुंभ, पसादान, तिसरी तीज, युगादि, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती, सिद्धनाथ यात्रा पाल (ता. कराड) वर्षी तपसमापन (जैन) ✻ **गुरुवार, १ मे -** महाराष्ट्र दिन कामगार दिन, विनायक चतुर्थी, मराठी राजभाषा दिन, श्री ज्योतिबा रथोत्सव चितकी (खटाव), श्री भैरवनाथ यात्रा गोवे (सातारा) ✻ **शुक्रवार, २ मे -** आद्य शंकराचार्य जयंती, श्रीरामानुजाचार्य जयंती, देव वेतोबा उत्सव आखली (वेंगुर्ले), महालक्ष्मी देवस्थान उत्सव पालवे (गोवा), बसवकल्याण यात्रा बिदर, धारेश्वर यात्रा गार (दौंड), ज्योतिर्लिंग रथोत्सव पाचवड, मरूळाराध्य जयंती, तुकाईदेवी यात्रा पळसमंडळ (ता. माळशिरस) ✻ **शनिवार, ३ मे -** गंगोत्पत्ती, गंगापूजन, श्री नृसिंह नवरात्रारंभ, श्री पद्मावती यात्रा म्हसोबाचे कार्वे, वामनपंडित पुण्यतिथी

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** ३० एप्रिल ✻ डोहाळ जेवण- ३० एप्रिल (१६ नंतर ), २ मे (१३ नंतर) ✻ बारसे- ३० एप्रिल, ३ मे ✻ जावळ- १ मे (११ नंतर) ✻ गृहप्रवेश- ३० एप्रिल, १ मे (११ नंतर), ३ मे

### मेष :- जागरूक रहावे

आपण कोणासाठी कितीही केलं तरी ते कुठे तरी कमी पडतच. राशी स्वामी मंगळ सध्या सुखस्थानी आहे. त्यामुळे फार दगदग करू नका. विनाकारण खर्चाचे प्रसंग येण्याची शक्यता आहे. जागरुक रहावे. आत्मविश्वास वाढविणाऱ्या घटना घडतील. विचाराने रहावे. डोळ्यांच्या तक्रारींची दखल घ्यावी. महत्त्वाच्या कामासाठी अधिक वेळ द्यावा लागेल. शुभ ता. ३०, १, ३

### वृषभ:- आनंदी रहावे

माणसाचा सर्वात चांगला सहकारी त्याची प्रकृती आहे. राशीत गुरु हर्षल समवेत आहे. उष्णता वाढविणाऱ्या घटना घडतील. काळजी घ्यावी. दूरचा प्रवत्रास व्यर्जच करावा. उत्साहवर्धक घटना घडतील. संतती संबंधात अनुकूलता राहील. सरकारी कामाला विलंब लागेल. भावंडांशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. कला- गुणांचा विकास होत जाईल. आनंदी रहावे. शुभ ता. ८, १

### मिथुन:- वादाचे प्रसंग टाळावेत

माणसाने फक्त स्वतःच्या नजरेत प्रामाणिक असावे. इतरांची चिंता नको. धनात मंगळ त्यामुळे आर्थिक जोखीम स्वीकारू नका. खर्चाचे प्रसंग वाढणार आहेत. कार्यक्षेत्रात चिकाटीने प्रगती होईल. प्रशासन सेवेत अनुकूलता राहील. वरिष्ठांची मर्जी लाभेल. अपेक्षित संधी लाभल्याने समाधान लाभेल. नव्या विचारांना चालना मिळू शकेल. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. १, ३

### कर्क:- धावपळ वाढवू नका

सगळ्यांना सगळं सांगत बसू नका कारण आजचा जिवलग उद्याचा विरोधक असू शकतो. जल तत्त्वाच्या राशीत अग्नी तत्त्वाचा मंगळ असल्याने मनाचे व शरीराचेही स्वास्थ टिकून ठेवण्याचा प्रयत्न करावा. विनाकारण धावपळ वाढवू नका. अपेक्षित संधी लाभतील. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. फार चिंता करू नका. शुभ ता. १, ३

### सिंह:- मार्गही निघत जाईल

चुकत नाही असा कोणीच नाही. स्वतःची चूक कधीही झाकून ठेवू नका. अष्टमात शुभा- शुभ ग्रह आहेत. दशमात गुरु त्यामुळे बाराव्या मंगळाची धास्ती बाळगू नका. समस्या आल्या तरी मार्गही निघत जाईल. नवीन योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात. नव्या कामांना गती देता येईल. अपेक्षित कामासाठी फार पाठपुरावा करावा लागेल. जास्त खर्च करणे टाळा. शुभ ता. १४, १९

### कन्या:- विचाराने रहावे

दुसर्यांच्या अडचणीत नेहमी धावून जाणारा, स्वतःच्या अडचणीत मात्र एकटाच पडत असतो. राशी समोरच सप्तमात शुभा- शुभ ग्रह आहेत. त्यामुळे आपले स्वास्थ्य बिघडू देऊ नका. यांत्रिक क्षेत्रात प्रगती होत जाईल. धार्मिक कार्यात पुढाकार घ्याल. कौटुंबिक जीवनात वादाचे प्रसंग टाळावेत. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. विचाराने रहावे. शुभ ता. ३०, १

### तुला:- आत्मविश्वासाने रहावे

एक लक्षात ठेवा, कर्माची फळे एक दिवस भोगावीच लागतात. धनेश सप्तमेश, मंगळ दशमात आहे. आर्थिक प्रगतीसाठी विविध मार्गांचा अवलंब करावा लागेल. नोकरी व्यवसायात संघर्षाचे प्रसंग टाळावेत. अचानक प्राप्ती ही वाढेल. आहार विहाराकडे दुर्लक्ष करू नका. नव्या संधी विचाराने स्वीकाराव्यात. आत्मविश्वासाने रहावे. प्रगती घडेल. शुभ ता. १, २

### वृश्चिक:- अपेक्षित संधी लाभतील

काही लोक पायरीवरच्या शेवाळासारखे असतात, आधाराचं नाटक करून कधीही पलटी मारतात. अनुकूल परिस्थिती आहे. त्यामुळे आवडत्या क्षेत्रात लक्ष घालावे. मनासारखी फळे मिळतील. कौटुंबिक जीवनात सुख स्वास्थ लाभेल. नव्या कामाला गती मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. अपेक्षित संधी लाभतील. शुभ ता.१, ३

### धनु:- नव्या ओळखी पारखून घ्या

स्वतःला पटेल तेच करायचं कारण लोक अगोदर चेष्टा करतात व नंतर चर्चाही करतात. चतुर्थात शनी तर अष्टमात मंगळ त्यामुळे समस्या उद्भवतात. येईल त्या प्रसंगाला तोंड देण्याची तयारी ठेवावी. तयारीमुळे विविध समस्या सहजपणे दूर होतील. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. नव्या ओळखी पारखून घ्याव्यात. विचाराने रहावे. शुभ ता. १,३

### मकर:- आर्थिक स्थितीत सुधारणा

लोकांच जास्त चांगलं करायला जाऊ नका, नंतर आपल्यालाच वाईट ठरवलं जाते. सुखस्थानी रवी आहे. त्यामुळे फार दगदग करू नका. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. आर्थिक स्थिती सुधारणा होईल. कलागुणांचा विकास होत जाईल. अपेक्षित संधी लाभतील. घेतलेल्या शिक्षणातून चांगली प्रगती होत जाईल. फार चिंता करू नका. शुभ ता. १४

### कुंभ:- प्रगतीचे मार्गक्रमण

गरज नाही, घर मोठेच असावं जसं पण असावं सुखी आणि समाधानी असावे. कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक घटना घडतील. यांत्रिक क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. नव्या कामांना गती मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित संधी लाभतील. सरकारी कामे होतील. नव्या ओळखी लाभप्रद ठरतील. प्रगतीचे मार्गक्रमण होईल. शुभ ता. १४

### मीन:- अनुकूलता वाढेल

कधी चांगल्या व्यक्तींची परीक्षा घेऊ नका कारण आपल्या आनंदासाठी ते सर्वकाही सहन करीत असतात. अडचणी थोड्या कमी झाल्याने समाधान वाटेल. कृषि, संरक्षण, वैद्यकीय क्षेत्रात मनासारखी प्रगती होत जाईल. नव्या विचारांना चालना देऊ शकाल. अपेक्षित संधी लाभतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अनुकूलता वाढेल. शुभ ता. १, ३

!! शुभ भवतु !!

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

# किल्ले देवगिरी

संभाजीनगर ते वेरूळ रस्त्यावर डावीकडे देवगिरी हा बुलंद किल्ला आपले लक्ष वेधून घेतो. मराठवाड्यातील संभाजीनगर शहरापासून १५ कि. मी. अंतरावर असलेला देवगिरीचा किल्ला अतिशय उत्कृष्ट स्थापत्य कलेचा नमुना आहे. मी अनेकदा देवगिरी बघितला, तरी प्रत्येक वेळी संभाजीनगरला गेलो आणि वेळ मिळाला की तितक्याच उत्साहाने पाय देवगिरीकडे वळतात. वेरूळच्या सुप्रसिद्ध लेण्या, घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग व देवगिरी किल्ला एकाच मार्गावर असल्याने पर्यटकांना सोयीचे होते. हा किल्ला सातमाळा, अजिंठा डोंगररांगेत असून हा भाग पूर्वीपासून भारतीय संस्कृती संवर्धनासाठी प्रसिद्ध आहे. या डोंगररांगेत देवगिरी, घोडप, चांदवड, अंकाई, टंकाई इत्यादी गिरीदुर्ग असून या किल्ल्यांवर आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी मोगल व मराठे यांच्यात अनेक संघर्ष झाले.

देवगिरी किल्ल्याची उभारणी राष्ट्रकूट काळात, साधारण इसवी सनाच्या आठव्या शतकात झाली. संरक्षणासाठी किल्ले बांधण्याची कला प्राचीन काळापासून भारतात अस्तित्वात होती. पाचव्या शतकापासून भारतीयांना दुर्ग बांधणीचे चांगले ज्ञान होते. राजगीर येथील उत्खननावरून याची कल्पना येते. वैशाली, उज्जयिनी, विदर्भातील उमरावती (अमरावती), एलिचपूर (अचलपूर) तसेच भारतातील अनेक शहरांना मजबूत तटबंदी होत्या. साधारण ४०-५० फूट उंचीचा तट, भव्य प्रवेशद्वार, बुरूज, तटाभोवती खंदक असे त्यावेळी भुईकोट किल्ल्याचे सर्वसाधारण स्वरूप होते. पुढे चालुक्य सत्ता आली; ती झुगारून या किल्ल्याचा ताबा भिल्लम यादव यांनी घेतला व देवगिरीच्या साहाय्याने आपली स्वतंत्र राजवट सुरू केली. देवगिरी किल्ला अनेक वर्षे यादवांच्या ताब्यात होता. आपल्या वैभवावर पूर्वीपासूनच परकीयांची नजर होती, येथील प्रचंड वैभवाने मोहित होऊन अल्लादिन खिलजीने देवगिरीवर हल्ला केला. त्यावेळी अंतर्गत कलहामुळे यादवराज रामचंद्रदेव हतबल झाले होते, पण त्यांचा मुलगा शंकरदेव याने अखेरपर्यंत झुंज दिली. पुढे त्याचीही शक्ती कमी पडली. शेवटी त्याला शरणागती पत्करावी लागली. अतोनात लुटमार, अग्निकांड यामुळे देवगिरीचे सौंदर्य पार कोमेजून गेले. अल्लादिन खिलजीनंतर मोहम्मद बिन तुघलक आपल्या सर्व सैन्यासह दिल्ली सोडून देवगिरीला आला. त्याने देवगिरीला आपली राजधानी केली आणि या किल्ल्याचे नाव दौलताबाद ठेवले. दौलतीचे शहर म्हणून दौलताबाद नाव केले. येथील वैभवावर आपला हक्क सांगून त्याने मराठी रयतेवर अनन्वित अत्याचार करण्यास सुरुवात केली. सतत युद्ध, मुस्लिम राज्यकर्त्यांच्या आपसातील सत्तासंघर्ष यामुळे मराठी रयतेचे आपल्याच भूमीत प्रचंड हाल होते. १४९९ मध्ये किल्ला निजाम शाहीच्या ताब्यात गेला. पुढे १७६० ला किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आला. पण तहात पुन्हा निजामशाहीत गेला. अनेक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक घटनांचा व संघर्षांचा साक्षीदार असलेला देवगिरी किल्ला फिरताना भरपूर चालण्याची व चढण्याची तयारी मात्र आवश्यक आहे. संपूर्ण महाराष्ट्रात देवगिरीसारखा अप्रतिम स्थापत्याने परिपूर्ण दुसरा किल्ला नाही. आजही येथील बांधकाम बऱ्यापैकी सुस्थितीत आहे. चारीबाजूंनी खोदलेले खंदक, चोरवाटा, भुयारे, फसवे रस्ते, अभेद्य तटबंदी, बुलंद दरवाजे, तोफा, बुरूज यांनी सजलेला हा देखणा दुर्गराज नीट पाहण्यास संपूर्ण दिवस हवा. या प्रचंड किल्ल्याला सात वेशी असून साधारण दोन किलोमीटर लांबीचा अभेद्य तट आहे.

देवगिरीच्या बालेकिल्ल्यात प्रवेश करण्याचा रस्ता आजही आपल्याला कठीण वाटतो. बालेकिल्ला दुर्गाच्या सर्वात उंच भागी असून ठळकपणे दुरूनही दिसतो. यादवांच्या काळात एकमार्गी गिरीदुर्गाचा पुरस्कार केला जात असे, म्हणून देवगिरी किल्ल्याच्या प्रवेशासाठी एकच भुयारी मार्ग अस्तित्वात होता. पुढे शिवकाळात मात्र ही त्रुटी भरून काढण्यात आली. किल्ल्याला एकापेक्षा जास्त दरवाजे, चोरवाटा ठेवण्यात आल्या. देवगिरीचा नकाशा पाहिला तर लक्षात येतं की, येथील भिंती, प्रवेशद्वार यांची रचना अतिशय योजनाबद्धरीतीने केली आहे. शत्रूच्या हल्ल्यापासून पूर्ण सुरक्षा मिळेल व किल्ला अभेद्य राहील यासाठी आवश्यक त्या सगळ्या उपाययोजना केल्याचे लक्षात येते. अभ्यासपूर्ण निरीक्षण केल्यास स्थापत्य कलेचे बारकावे लक्षात येतात. किल्ल्यात जाताना डावीकडे भारतमाता मंदिर आहे. भारतमातेचे दर्शन घेऊन पुढे गेलात की चांदमिनार आहे. त्यावर चढायला वर्तुळाकृती शिडी आहे. संपूर्ण शहर सुरक्षेच्या दृष्टीने नजरेच्या टप्प्यात असावे यासाठी या मिनारची निर्मिती केली असणार. येथून पुढे गेलात की हेमाडपंथी मंदिराचे भग्नावशेष आढळतात. पुढे अवाढव्य काळाकोट दरवाजातून आपला गडप्रवेश होतो. यापुढे महालसदृश बांधकाम आहे. महाराणी येसूबाई व युवराज शाहू येथेच बंदिवासात होते. देवगिरीच्या किल्ल्याचे वैशिष्ट्य असे की, संपूर्ण किल्ला व अंतर्गत संरचना चारही बाजूने खोल खंदक व कालव्यांनी वेढलेली आहे. किल्ल्याची उंची गाठण्यासाठी डोंगर पोखरून तयार करण्यात आलेले बोगदे ओलांडावे लागतात. किल्ल्याच्या सभोवतालची भिंत सुमारे तीन मैल पसरलेली आहे. महाकोटातून प्रवेश केला की एक दरवाजा आहे, त्याला खिळे व टोकदार पाती लावली आहे. असे म्हणतात की, हत्तीचा हल्ला रोखून धरण्यासाठी ही योजना केली आहे. यामागे पहारेकऱ्यांच्या देवड्या आहेत. त्यात हिंदू देवतांच्या मूर्तींची शिल्पे कोरली आहेत. किल्ल्यात 'हत्ती हौद' नावाचा सुमारे ११५ फूट चौकोनी व २५ फूट खोल अवाढव्य हौद आहे. पायऱ्या चढून वर गेलात की मेंढा तोफ एका बुरुजावर विराजमान आहे. महालाच्या सभोवती डोंगर पोखरून उभारलेल्या ५० फूट खोल दरीजवळ दोन पूल दिसतात. एक हल्लीच्या काळातील लोखंडी पूल व एक जुना दगडी बांधकाम असलेला पूल आहे. युद्धप्रसंगी ही दरी पाण्याने भरून शत्रुसैन्य थोपवण्यात येत असे. दरीपलीकडे सगळ्यात सुरक्षित असे दालन आहे. डोंगर पोखरून वाट काढायची प्राचीन पद्धत सुरक्षा व शत्रूची दिशाभूल दोन्ही दृष्टीने महत्त्वाची होती. प्रवेशद्वारातून आत गेलो की, अंधुक उजेडात अंधारी रस्ते चालावे लागतात. जसेजसे समोर जातो अंधार दाट होत जातो. या वाटेत गुप्त कोठड्या आहेत. कारण शत्रू आत शिरला तर गुप्त कोठड्यातील सैनिक अंधाराचा फायदा घेऊन शत्रूची वाट अडविण्यास यशस्वी व्हावे. या भुयारी मार्गात धूर सोडून शत्रूची अडवणूक करत, असे अभ्यासक सांगतात. या वाटेतून बाहेर आलात की विघ्नहर्त्याचे दर्शन घ्यावे. गणपती मंदिराच्या थोडं पुढे एका गुहेत विशाल सभागृह आहे. बारादरीत भव्य महाल आहे. येथील बांधकाम कोरीव व दगडी चुण्याचे आहे. समोर विद्युत दरवाजा व शिखर बुरूज दिसतो. शिखर बुरुजाखाली डोंगर पोखरून एक गुहा बांधली आहे. ही गुहा संत एकनाथांचे गुरू जनार्दन स्वामी यांच्या संन्यस्त जीवनाशी संबंधित आहे. १६ व्या शतकाच्या मध्यात राजकारणातील डावपेचांनी त्रस्त झालेल्या सामान्य माणसाच्या मार्गदर्शनासाठी येथेच स्वामींनी ज्ञानदीप प्रज्वलित केला. देवगिरीचे किल्लेदार असूनदेखील त्यांनी धार्मिक जीवनाची कास धरली. संसारिक जीवन व आध्यात्मिक जीवन या गुंतागुंतीत सापडलेल्यांना मार्गदर्शन केले. या गुहेच्या एका बाजूला अखंड प्रवाहित जलधारा आहे, तर दुसरीकडे स्वामींच्या पाऊलखुणा आहेत. समोर डोंगर पोखरून एक अर्धचंद्राकार दरी बांधली आहे. बुरुजाच्या सभोवताली गोळीबार करण्यासाठी छिद्र असलेली भिंत उभारली आहे. या उंचीवरून शहरातील बाहेरचा देखावा व डोंगररांगा मनोहर दिसतात. देवगिरीचा किल्ला पर्यटनस्थळ म्हणून बराच विकसित झाला आहे. देवगिरी किल्ला संभाजीनगरपासून जवळ व सगळ्यांना सोयीचा असल्यामुळे भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या जास्त आहे. किल्ल्यात कुठेही कचरा न करणे, किल्ल्याच्या भिंतींवर न लिहिणे, किल्ला फिरताना कुठेही या ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेणे या गोष्टी कटाक्षाने सगळ्यांनी मिळून पाळायला हव्या. किल्ल्याचा विस्तीर्ण परिसर बारकाईने पाहण्यास संपूर्ण दिवस लागतो. किल्ल्यातून बाहेर पडताना शरीर थकले असले तरी मनाची उभारी जाणवते. कारण ही ऐतिहासिक स्थळे स्वत:मध्ये प्रचंड ऊर्जा घेऊन ताठ उभी असतात. येथील पुण्यभूमी अनेक वीरांच्या पदस्पर्शाने पावन झालेली असते. म्हणूनच पुन्हा एकदा आवर्जून सांगावेसे वाटते की, आपण या बुलंद किल्ल्यांना भेट देताना एक गोष्ट कायम ध्यानात ठेवावी की, हे गडकिल्ले फक्त सहलीची ठिकाणे नाहीत तर आपल्या पूर्वजांची धारातीर्थे आहेत. यांचे पावित्र्य जपणे फक्त शासनाचे काम नसून प्रत्येक जाणत्या



पान ३ वरून

## आनंद घंटा

ठरवून जीवनावर मनापासून प्रेम करण्याची प्रवृत्ती असेल तर आनंद हा सहजच मिळतो. त्यासाठी कल्पकता जोपासावी लागते. महत्त्वाचे म्हणजे त्या कल्पकतेतून इतरांनाही आनंद देता यावा, हे खरे जीवनसूत्र आहे. चिडचिड करीत, सर्वच बाबतीत नकारात्मक भूमिका ठेवत, माझीच भूमिका सर्वश्रेष्ठ आहे व ती मी बदलणार नाही अशा थाटात वावरणारे लोक जीवन जगत नाहीत, ढकलत राहतात. जमेल त्या पद्धतीने सहवासातील लोकांची मने दुखावून अशा लोकांच्या हाती काही लागत नाही. मिळतो तो केवळ एकटेपणा. त्या किराणा दुकानदाराच्या ठायी असलेली कल्पकता मिळविता आली आणि रोजच्या ठरावीक साच्यातील जीवनातील वेगवेगळ्या बाबींना आनंद क्षणांमध्ये बदलविणे आपल्याला जमले तर! तर, आपल्यालाही कळेल, 'सुख म्हणजे नक्की काय असतं!'

पान ३ वरून

## डावखुऱ्यांची संख्या कमी का?

८) आश्चर्य वाटेल, पण आपण दिवसापेक्षा मध्यरात्री किंचित जास्त वेगाने भ्रमण करत असतो. कारण मात्र अतिशय साधेसोपे आहे. पृथ्वी सूर्याभोवती आणि स्वत:भोवती फिरताना घड्याळाच्या विरुद्ध दिशेने फिरते. मात्र, मध्यरात्रीनंतर तिची दिशा सूर्याच्याच दिशेने संमुख होऊ लागल्याने सूर्याभोवतीच्या गतीत दिवसाच्या तुलनेत अल्पशी भर पडते. एकूण २४ तासांचा विचार केल्यास एकूण अधिक उणे समय मर्यादा तेवढीच राहते हा भाग निराळा. वर उल्लेख केलेल्या कोरिओलिस परिणाम आणि मध्यरात्रीच्या व मध्यान्हाच्या क्षणी जर गर्भसंभव किंवा गर्भ आकारास येत असेल तर त्यांच्या मेंदूची रचना त्या दृष्टीने ठरल्यामुळे नैसर्गिक डावखुरे अपत्य, उजवेल शंख, विरुद्ध दिशेने वाढणारा वेल तयार होतात का यावर विचार करायला हवा आणि जन्माला आल्यानंतरही पालकांनी जबरदस्तीने त्याची नैसर्गिक हालचाल बदलायचा प्रयत्न केला तर त्याच्या शारीरिक आणि मानसिक प्रगतीवर अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम कसे होतात, हेही बघायला हवे. ९) मानवांप्रमाणेच इतर प्राणी उदा. माकडे डावखुरे असू शकतात का? त्यांचे प्रमाण काय असते आणि तसे नसेल तर त्याची कारणे काय यावरही संशोधन व्हावे. १०) सौर मालिकेत शुक्र ग्रह स्वत:भोवती फिरताना पृथ्वीच्या नेमक्या उलट दिशेने भ्रमण करतो. भविष्यात मानव शुक्रावर पोचला, तेथे वस्ती करू लागला तर काय होईल? वरील सर्व तर्क बरोबर असतील तर तेथील मानवांच्या लोकसंख्येत डावखुऱ्यांचे प्रमाण उजवेल लोकांच्या पेक्षा जास्त असेल.

पान ४ वरून

## डोळ्यात आणि मनात ओल कायम...

कुणी एक म्हातारी मला जवळ घेऊन रडत होती तेंव्हा मी तिच्याकडून सुटका करून घेत अंगणातल्या बोराच्या झाडाखाली बसलो. ते झाड आईनेच लावलेल, खंडीभर बोर लगडायची त्याला... मात्र, आई गेल्यावर तीन वर्षे त्या बोरीला एकही बोर आलं नाही.

चौथ्या वर्षी एक पिटुकल हिरव बोर काट्यातून हसल. ते बापापुढे ठेवल्यावर ते सहज म्हणाले, अरे, तुमच्या आईच्या हातचं झाड ते, त्याच पहिलं बोर ठेवा तिच्या फोटोपुढं...आम्ही ते केलं आणि पाहता पाहता त्या वर्षीपासून बोर पुन्हा बोरांच्या ओझ्याने वाकू लागली. हे मी जवळून अनुभवले आहे. त्यानंतर ते घर विकून आहे नवीन घरात राहायला आलो तेथे घराच्या कोपर्यावर एक बदाम वाढला, बाबांनी आणलेलं ते झाड स्वतःच्या सावलीत बदामाचा आणि पानांचा खच पाडू लागले. आमच्या लेकरांच्या बोटाला चिटकून त्यांच्या रक्ताची चव घेणाऱ्या मुगळ्यांची रांग त्या झाडावर सतत वाहताना दिसत असेल. २०११ मध्ये बाबांनाही हाय शुगरचा अटॅक आला. त्यांना औरंगाबादच्या दवाखान्यात नेण्याचा निर्णय घेतला. चैत्र संपून वैशाख सुरू झालेला होता. वारा अगदी स्तब्ध होता. जानवावी एवढीही झुळूक वाहत नव्हती. ॲम्ब्युलन्स बाबांना घेऊन दवाखान्यातून परस्पर जायची होती. मी फक्त घरी दवाखान्यात थांबायचे म्हणून कपडे घेण्यासाठी आलो होतो. बघता बघता कडकड आवाज होत मे महिन्यात भर दुपारी बदामाचा शेंडा म्हणून ओळखली जाणारी फांदी तुटली. ना हवा, ना वारा, ना माकड, ना पक्षी कशाचाही कोणताही मागमुस नव्हता. मात्र, त्या बदामाच्या झाडाने दिलेला इशारा आम्हाला दवाखान्यातून अकराव्या दिवशी बाबांचा चैतन्य हरवलेला देह आणताना समजला. माणूस निसर्गावर प्रेम करतो की नाही ते सांगणं कठीण मात्र निसर्ग माणसावर प्रेम करतो तो हे असे. वसंत, बहरून आलेला चैत्र हे उन्हाळ्याचे रूप आहे. मात्र, अनेकदा चैतन्याने भरलेली ऋतू माणसाच्या जीवनातील चैतन्यच घेऊन जातात ते हे असे.

पान ४ वरून

## भूक

''काकाजी, काही खायला द्या.'' ती काकुळतीने म्हणाली. ''ए बाये. कुठली तू? इथं काय करतेस?'' त्या माणसाने प्रश्न केला. ''पलीकडल्या शेतात झोपडी हाय आमची. आईला बरं नाही. काही पैका किंवा अन्न असेल तर द्या जी. लयी उपकार होतील.'' तिने तातडीने उत्तर दिले. ''काही मिळणार नाही. चल हो तिकडे. आमचा रस्ता अडवतेस?'' त्यातला दुसरा माणूस दटावून म्हणाला. ती काही बोलणार इतक्यात भावाने तोंड उघडले. ''काही खायला द्या जी.'' तिने त्याच्याकडे बघितले व पुन्हा आपली मान बैलगाडीकडे वळवली. ''थांब गं बाये. थोडी भाजी भाकरी घेऊन जा.'' पांढऱ्या स्वच्छ कापडामध्ये गुंडाळलेला एक डबा तिने बाहेर काढला. त्यातल्या दोन-तीन भाकऱ्या हातावर पसरवून त्यावर थोडी भाजी ठेवली व नंतर भाकऱ्या एकावर एक ठेवून हात पुढे केला. तिने लगबगीने त्या स्वतःच्या हातात सांभाळून घेतल्या. ''काय गं? काही थाळी किंवा कापडं नाही का तुझ्यापाशी?'' त्या बाईने प्रश्न केला. ''नाही जी. हातात घेऊन जाईल.'' ती म्हणाली. ''थांब. पाऊस लागलाय. या कापडात घेऊन जा...'' ''लयी उपकार झाले जी. देव तुमचं भलं करो.'' ती आनंदाने म्हणाली. बैलगाडी पुढल्या रस्त्याला लागली. तिने भाकऱ्या अलगद कापडामध्ये गुंडाळल्या. एव्हाना पावसाने जोर धरला होता. ''ताये, मला दे ना खायला.'' भावाने पुन्हा म्हटले. ''थांब बाबू. आधी घरी जाऊ. आई वाट पाहत असन. पावसाच्या तडाख्याने दोघेही क्षणात भिजले. रस्त्यावर सगळीकडे चिखल होऊ लागला. पाहता पाहता झोपडी नजरेच्या टप्प्यात आली. ''ताये. मी थकलो. माझं पोट लयी दुखतंय. थंडीबी वाजतेय...'' त्याने रडत म्हटले. ओला झाल्यामुळे तो थरथरत होता. ''थांब बाबू. आपलं घर आलंच हाय. जरा समोर बघ.'' म्हणत तिने समोर पाहिले. समोर काही अंतरावर झोपडी दिसताच त्याने तिचा हात सोडला व झोपडीकडे धावत सुटला. ''आरं थांब. पडशील.'' म्हणत तिनेही आपला वेग वाढवला. तेवढ्यात तिच्या पायाला कसली तरी जबरदस्त ठेच लागली व तिच्याही नकळत ती समोरच्या रस्त्यावर कोलमडून पडली. तिच्या कपाळाला जबर मार बसला. पायातही वेदनेची कळ गेली. तिला रडू फुटले. तरी स्वतःला सांभाळत ती कशीतरी उठली. मागे पाहते तर कापडातल्या भाकरी आणि भाजी चिखलात पडून त्यावर पावसाचे पाणी पडत होते. तिने घराकडे वळून बघितले. झोपडीच्या दारात तिचा लहान भाऊ सुन्न होऊन तिला पाहत असलेला तिला दिसला.

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# मन- शरीर समन्वय



सकारात्मकतेचे तत्वज्ञान २६४

तणाव असो, वैफल्य असो, आघातांनी निर्माण केलेले न सुटलेले प्रश्न असो त्यामुळे मज्जासंस्थेत निर्माण अव्यवस्था होतेच आणि ती अनेक मार्गांनी बाहेर पडते, उदा. खांद्याच्या सांध्यावर परिणाम, श्वसनात अनियमितता, पराकोटीचे शैथिल्य किंवा आरामदायी अवस्थेचा अभाव!

कामात मनोकायिक सजगता आणायची असेल किंवा मज्जासंस्था भावनांना आणि वर्तनाला कसे घडविते यांची खोल जाण हवी असेल तर मन आणि काया (सध्या बुद्धी बाजूला ठेवू या) यांच्यातील सामंजस्य, संवर्धन आणि समन्वय यांच्या अभ्यासाची नितांत गरज आहे. अंतर्मुख होण्यासाठी शरीर आणि मनाच्या नात्याच्या यांचा विचार, संवेदना, शरीर स्वास्थ्य आणि एकुणातच मानवी निरामयतेवर होणारा बरा वाईट परिणाम या दृष्टीने विचार गरजेचा झालाय. मंनानुभूती, ध्यान, साधना, योग कसे मनाशी शरीराला जोडतात, त्यातून तणाव निर्मूलन कसे संभवते, भावनांचा समतोल कसा साधता येतो हे बघणे मनोरंजक आणि आवश्यक असते. या नात्याचे संगोपन शेवटी मानसिक सुस्पष्टतेकडे आणि शरीरस्वास्थ्याकडे नेऊन सोडते.

मन श्रेष्ठ की देह महत्वाचा हा वाद पुरातन आहे. प्राचीन तत्वज्ञ, धर्मसंकल्पना ते आधुनिक विज्ञान याबाबत सर्वदूर विचारांची विविधता आढळून येते. मनाचा शरीरावर किंवा उलट शरीराचा मनावर परिणाम होतो कां, ते एकमेकांशी संलग्न असतात कां यावर बरेच विचारमंथन आजवर झालेलं आहे. समकालीन शास्त्र आणि आरोग्यसेवा या दोन्ही गोष्टींवर उपचार वेगवेगळ्या पद्धतीने करीत असले तरीही संशोधनातून या दोघांमधील द्विपक्षी नाते अधोरेखित झालेले आहे. मग हे स्वीकारून स्वास्थ्याकडे अधिक सर्वंकष नजरेने बघणे अनिवार्य ठरते.

मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून मन-काया अभिन्न मानले जातात पण प्रत्यक्षात त्यांच्यातील विसंवाद अधिक लक्ष वेधून घेताना आढळतो. वेस्टफल ने २०१६ साली मन-शरीर सुसंवादाकडे चार विधाने कशी तर्कनिष्ठ समस्या निर्माण करतात हे प्रथम सिद्ध केले. अशारीर मन आणि भौतिकदृष्ट्या अस्तित्वात असलेलं शरीर यांचे एकमेकांशी जुळणे कठीण असते.

**मनविज्ञानात या संदर्भात काही विचारधारा आढळतात-**

**१) अद्वैतवाद -** यानुसार फक्त एकच सत्य, एकच अस्तित्व संभवते- एकतर शरीर किंवा एकतर मन

**२) भौतिकवाद -** प्रत्येक गोष्ट भौतिक स्वरूपातच अस्तित्वात असते अगदी मनासहित. याला पारंपरिक शास्त्र दुजोरा देताना म्हणते की मानसिक प्रकिया शेवटी मेंदूतील घडामोडी असतात.

**३) आदर्शवाद -** याला आधिभौतिक विचार पायाभूत असतो. त्यानुसार सत्य हे दैहिक नसते. सर्व काही मन किंवा मनावर अवलंबून होणारे क्रियाकलाप असतात. या दृष्टिकोनातून जग बघायचे असेल तर- तोरा मन दर्पण कहलाये

**४) द्वैतवाद -** सत्य हे भौतिक आणि अशारीर यांचा जोड असतो. शरीर भौतिक असते तर मन नसते त्यामुळे दोघांना वर्तणूक भिन्न हवी. दोघांची हाताळणी एकसमान असू शकत नाही. हा विचार रेनी देसकार्ट्सने सोळाव्या शतकात सर्वप्रथम मांडला आणि तो अर्वाचीन विज्ञानाचा पाया ठरला.

द्वैतवाद मानतो की शरीर आणि मन स्वतंत्र असतात, स्वायत्त असतात आणि त्यांच्यात संवाद नसतो, असलीच तर किरकोळ देवाण घेवाण संभवते. मन हे मेंदूच्या आणि मज्जासंस्थेच्या जाळीतून समजून घेता येते पण शेवटी भौतिक मेंदू उरतोच.

सर्वांमधील एकत्व हेच अंतिम सत्य असते आणि ते मन- काया यांच्यामधील समस्यांच्या पलीकडील असते. पौर्वात्य विचारसरणी याचा पुरस्कार करते आणि मन- शरीर यांच्या नात्याला वेगळा आयाम देते. इथली मान्यता अशी आहे की अस्तित्व हेच भ्रामक असल्याने मनाला आणि शरीराला सह अस्तित्वासाठी एकमेकांची गरजच काय? लॉय च्या १९९७ सालच्या विचाराने या चर्चेला एक वेगळा दृष्टिकोन बहाल केला.

तत्वज्ञान आणि शास्त्र यांच्यातील कप्पे त्यांना एकमेकांपासून अलग करीत असले तरीही मनाचे तत्वज्ञान हे शरीरशास्त्राशी संलग्न असते कारण त्यातूनच शास्त्रज्ञांना प्रयोग करता येतात, संशोधन करता येते आणि मनोकायिक रचनेवर प्रकाश पडतो.

मानसिक वाटा वळणे खाचखळग्यांनी भरलेले असल्या तरीही तात्विक दृष्टिकोन समन्वयवाद स्वीकारतो. मन म्हणजे दृश्य स्वरूपातील शारीरिक कृतींमधून व्यक्त होण्याचे माध्यम असे वर्तनवादी मंडळींचे मानणे आहे. आकलनातील शरीराची भूमिका मात्र द्वैताकडे झुकते. शेवटी लीटन आणि मरे यांनी २०१४ साली या वादावर पडदा टाकत सिद्ध केले की सर्वंकष दृष्टिकोन या दोघांच्या नात्याला संमती, दुजोरा देतो.

**भावनांचे सिद्धांत-**

भावनांना स्वतंत्र अस्तित्व असते असं मानून हे सिद्धांत समजून घ्यावे लागतात.

**१) आकलन मूल्यांकन सिद्धांत-** म्हणजे, आपल्या भावना आणि वर्तनांवर आपल्या विचारांचा आणि मूल्यांकनाचा कसा प्रभाव पडतो, हे स्पष्ट करणारा हा एक विचार आहे. माग्दा अर्नोल्ड यांनी १९४० मध्ये हा विचार मांडला आणि त्याला रिचर्ड लाझारुस यांनी १९५० मध्ये अनुमोदन दिले. भावना एखाद्या घटनेच्या मानवी आकलनातून जन्म घेतात. भलेही त्यांचे परिणाम आल्हाददायी असोत वा कटू असोत.

तेव्हापासून सकारात्मक आणि नकारात्मक भावना असे वर्गीकरण जन्माला आले. १९९० पर्यंत सकारात्मकतेच्या अध्ययनावरच नकारात्मकता ही संकल्पना आधारलेलीहोती. नकारात्मकतेचा प्रभाव आणि प्रासंगिकता समजून घेण्यासाठी विरुद्ध भावना समजून घ्याव्या लागत.

**ब्रॉयडन आणि बिल्ट सिद्धांत-**

२००० मध्ये सकारात्मक आणि नकारात्मक विचार कसे एकमेकांना पूरक असतात आणि त्यातून मानवी अस्तित्व कसे आकाराला येते याविषयक हा सिद्धांत आहे. नकारात्मक भावना आपल्या विचार- कृतीला मर्यादित करतात आणि धोक्याला प्रभावी प्रतिसाद देतात तर सकारात्मकता आपल्या विश्वाला विस्तारित करते आणि सामाजिक वर्तनाला झळाळी देते.या सिद्धांतानुसार सकारात्मक विचार नकारात्मकतेला झाकून टाकतात.

अलीकडचे मज्जासंस्थेवरील संशोधन या सिद्धांताला आधार देते आणि मनानुभूती अधिक ध्यानधारणा सकारात्मक भावनांना खतपाणी घालतात आणि समस्यांच्या वेळी नकारात्मकतेला आच्छादून टाकतात.

**३) मानवी आकलन विषयक सिद्धांत-**

विचार, मन आणि भावनिक अनुभवांना आकलन विषयक उपचारपद्धती दुजोरा देत असली तरीही इथे मनावर अधिक लक्ष केंद्रित केले जाताना आढळते.

**४) विकसित मन विषयक सिद्धांत-**

ज्यांचे मन विकसित झालेले असते अशा व्यक्ती आव्हानांना न घाबरता, त्यांच्याकडे संधी या नजरेने बघतात, हरक्षणी नवं शिकण्याकडे त्यांचा कल असतो आणि त्यांना थबकून राहणे पसंत नसते. आपले प्रयत्न हा प्रभुत्वाकडे नेणारा मार्ग अशी त्यांची धारणा असते. मेंदूत घडणाऱ्या मानसिक प्रक्रिया- सजगता, एकाग्रता, आणि अंतर्गत प्रेरणेतून जीवनहेतू साध्य करणे हे त्यांना भावते. ही संरचना मेंदूच्या कार्यपद्धतीला लवचिकता बहाल करते आणि आपल्या शिकण्याच्या अनुभवांवर आधारित मानवी मेंदू बदलतो, विकसित होतो.

**५) मूर्त/अंतर्भूत सिद्धांत -**

हा सिद्धांतांचा गट असं मानतो की शरीरावस्था आणि त्यासंदर्भातील प्रक्रिया आपल्या मानसिक क्षेत्राला प्रभावित करतात आणि यापूर्वी मनाच्या अमूर्त असं मानणाऱ्या संकल्पनेला तडा गेला. हा सिद्धांत असं मानतं की आपलं शरीर विश्वाशी संपर्क साधण्याचे साधन आहे आणि मनाचे संकेत शब्दांमधून प्रकट होतात. ग्लेनबर्ग यांचे हे २०१० सालचे संशोधन आहे.

**भावनांचे अवगुंठन -**

जुन्या सिद्धांतांचा विचार करता प्रिन्झ यांनी २००४ साली असं विधान केलं की भलेही भावना शारीर असोत, त्या अर्थपूर्ण असतात. अन्य शब्दांमध्ये भावना म्हणजे जाणीवपूर्वक किंवा बेसावध असताना शरीराने केलेले आकलन असते. पण त्या शब्दांमध्ये अवगुंठित असतात.

**आकलनाचे अमूर्त स्वरूप-**

शरीर हा अवयव साधारणतः आपल्या जाणिवा आणि प्रक्रियांचे स्वरूप ठरवितो, इतकंच नव्हे ते व्यक्त होण्याचे माध्यम असतो. एकप्रकारे मन हे ज्ञानेंद्रियांमधून बाहेरचे जग अनुभवते तेव्हा मन आणि शरीर दोघेही उपयुक्त असतात आणि प्रासंगिकही.

शरीर हे मनाचे नोकर असते असं मानण्यापेक्षा शरीरही मानवी आकलन प्रक्रियेत गुंतलेले असते. हा सिद्धांत मनाला आणि शरीराला एकाच व्यासपीठावर आणून त्यांचे वस्तुनिष्ठ आकलन करण्यावर भर देतो.

**उदाहरण -**

**आघातात मनाचे शरीराशी असलेले बंध -**

प्लुवेगल सिद्धांत मज्जासंस्थेच्या कार्यातून कसे नियमन साधते आणि धोका निर्माण झाल्यावर मेंदू, प्रतिकारशक्ती कसा प्रतिसाद देतात यांचा खुलासा करतो. याला स्व संरक्षणाची साखळी मानतात आणि त्यात चार प्रतिसाद गृहीत धरलेले असतात.

**१) उत्तेजना -** धोका जाणवला की मेंदू एकतर प्रतिकारात गुंततो किंवा त्या परिस्थितीपासून दूर जाण्याचे पर्याय शोधायला लागतो ( लढा अथवा पळ काढा)

**२) संघर्ष -** मज्जासंस्था चयापचय क्रियेला चालना देत शरीराला हल्ला करण्यासाठी उद्युक्त करते.

**३) थिजून जाणे-** काय करावे याचे आकलन न झाल्याने , विशेषतः अपरिहार्य प्रसंगाला सामोरे जाताना माणसे गोठल्यासारखी होतात, चयापचय थांबते आणि शरीर गारठून जाते.

**४) निष्क्रिय शांतता -** धोका टळल्यावरही शरीर स्थिरावते, धक्क्यातून बाहेर पडायचा मार्ग शोधते आणि आघात भरून पूर्व पदावर येण्याचा प्रयत्न करते.

या प्रतिक्रियांचा अभ्यास आपल्याला आघातांची तीव्रता, वारंवारिता आणि खोली जाणून घेण्यास मदत करतो. पोरगेस यांनी संशोधनातून असे मांडले की आघातांचे अनुभव शरीरावर आणि मनावर दीर्घकाळाचे ठसे उमटवून जातात. मन आणि शरीर एकसंधपणे या ठशांना पुसत करण्यास मदत करतात.

---

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे

**जैविक ऱ्हास होत नसल्याने प्लॅस्टिक ५०० वर्षे नष्ट होत नाही. पॉलिथीन मिश्रित कचरा जाळणे त्याहूनही अधिक हानिकारक आहे. कारण ते हवेतील हायड्रो कार्बन्स आणि कार्बन मोनो ऑक्साईड विरघळवते आणि श्वासाद्वारे शरीरात प्रवेश करते. आज निर्माण होणारा प्लॅस्टिक कचरा शेकडो- हजारो वर्षे आपल्या जीवाशी आणि पर्यावरणाशी खेळत राहील. वेळीच उपाययोजना केली नाही, तर त्याची भरपाई करणे अशक्य होईल.**

# थर्माकोल प्लेट, प्लॅस्टिकचा वापर जीवघेणा

सध्या लग्नसराईचा मोसम जोरात सुरू असून लग्न समारंभात जेवणारे पाहुणे मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिकच्या प्लेट्स आणि ग्लासेसचा वापर करीत आहेत. दुर्दैवाने त्यांना हे माहीत नाही की, ते शरीरासाठी हानिकारक आहेत. या संदर्भात आरोग्यतज्ज्ञ सांगतात. स्वस्त, हलक्या प्लॅस्टिकच्या प्लेट्स आणि ग्लासमधून खाणे-पिणे आपल्याला नेहमीच आवडते; परंतु थर्माकोल आणि प्लॅस्टिकपासून बनवलेल्या प्लेट्स आणि ग्लासमुळे अनेकदा खाद्यपदार्थांमध्ये रसायने सोडली जातात. त्यामुळे आपण आजारी पडतो आणि हॉस्पिटलमध्ये उपचार घ्यावे लागतात.

या प्लॅस्टिकमध्ये बिस्फेनॉल ए (बीपीए) नावाचे रसायन असते. ते प्लॅस्टिकच्या वस्तूंमध्ये सर्वाधिक वापरले जाते. त्यामुळे आपल्या शरीरातील हार्मोन्सवर परिणाम होतो. प्रत्येक प्रकारचे प्लॅस्टिक ठरावीक कालावधीनंतर त्यातील रसायने सोडते. त्यात गरम वस्तू ठेवल्यानंतर प्लॅस्टिकमधील रसायने मिसळतात. ती खाण्यापिण्यात मिसळून गंभीर आजारांना कारणीभूत ठरतात. आरोग्यतज्ज्ञांच्या मते स्वतःचे तसेच पर्यावरण आणि मातीचे विषापासून संरक्षण करण्यासाठी आपण नेहमी प्लॅस्टिकपासून बनवलेल्या वस्तूंवर बहिष्कार टाकला पाहिजे.

लग्न किंवा इतर समारंभात थर्माकोलपासून बनवलेल्या प्लेट आणि ग्लासेसना पर्याय म्हणून मातीच्या कुल्हड आणि ढाकच्या पानांपासून बनवलेल्या प्लेट्सचा वापर केला पाहिजे. छोट्या पॉलिथीन पिशव्यांमधून घेतलेला गरम चहादेखील आपल्या शरीरासाठी खूप हानिकारक असतो. त्याचे दुष्परिणाम लगेचच नाही, तर काही दिवसांनी दिसतात. ते सतत वापरल्यास कर्करोगाच्या रूपात समोर येऊ शकतात.

प्लॅस्टिक आपल्या दैनंदिन जीवनासाठी अतिशय घातक आहे. त्यामुळेच दैनंदिन कामात त्याचा कमीत कमी वापर करावा आणि त्यात अन्नपदार्थ आणू नयेत. अन्यथा, भविष्यात अनेक भयंकर परिणामांना सामोरे जावे लागू शकते. आपल्या देशात दोन हजारांहून अधिक वनस्पतींची पाने आणि त्यांचे फायदे याबद्दल पारंपरिक वैद्यकीय ज्ञान उपलब्ध आहे; परंतु आपण आपल्या आयुष्यात केवळ पाच प्रकारच्या वनस्पतींचा वापर करू शकतो. एका नवीन संशोधनातून समोर आले आहे की, आपल्या देशात केळीच्या पानांपासून बनवलेल्या ताटात जेवण देणे वृद्धांना शुभ आणि आरोग्यदायी वाटू शकते. पलाशच्या पानांमध्ये जेवल्याने अनेक आरोग्यदायी फायदे होतात. आयुर्वेदानुसार रक्तातील अशुद्धतेमुळे होणारे आजार टाळण्यासाठी आजही

बहुतांश गावांमध्ये स्टिलच्या भांड्यांऐवजी पलाशच्या पानात खाणे फायदेशीर मानले जाते. इतकेच नाही, तर पचनसंस्थेशी संबंधित आजारांसाठीही याचा वापर मोठ्या प्रमाणावर होताना दिसतो. आयुर्वेदानुसार, लाल फुलांच्या पलाशापासून तयार केलेल्या पानामध्ये अन्न खाणे मूळव्याधीचा त्रास असलेल्या रुग्णांसाठी खूप फायदेशीर आहे, तर सांधेदुखीसाठी करंजाच्या पानांपासून तयार केलेली प्लेट खूप उपयुक्त आहे.



नवीन पानांपेक्षा जुनी पाने जास्त फायदेशीर मानली जातात. अर्धांगवायूचा त्रास असलेल्या रुग्णांनी अमलतासच्या पानांमध्ये अन्न खाल्ल्यास आरोग्य नेहमीच चांगले राहते. त्याचा आपल्याला विसर पडला आहे.

प्लॅस्टिक हळूहळू आपल्या शरीरामध्ये शिरून आपल्याला आजारी बनवत आहे. रसायनशास्त्राचा हा शोध मानवतेसाठी मंद विष बनला आहे. त्यामुळे प्लॅस्टिक टाळून आपल्या पिढ्या वाचवायच्या की त्यांना त्यांच्या नशिबावर सोडायचे, याचा आपण गांभीर्याने विचार केला पाहिजे.

थर्माकोलच्या प्लेट्स आणि प्लॅस्टिक ग्लासच्या वापरामुळे प्रदूषणासोबतच आरोग्यालाही धोका निर्माण झाला आहे.दिवसेंदिवस वाढत जाणारे प्रदूषण रोखण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सरकारने सुमारे दशकभरापूर्वी पॉलिथीनच्या वापरावर बंदी घातली होती; मात्र आजही पॉलिथीनचा बिनदिक्कत वापर केला जात आहे. वाढत्या प्रदूषणाचे एक मुख्य कारण म्हणजे पॉलिथीनचा वाढता वापर. त्यामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहेच; शिवाय लोकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे. लग्नसमारंभ आणि इतर सणांमध्ये थर्माकोलच्या ताटांचा आणि प्लॅस्टिकच्या ग्लासांचा वाढता वापर यामुळे प्रदूषणाचा धोकाही वाढत आहे, हे जाणून घेतले पाहिजे. पूर्वी या प्लेट्स आणि ग्लासेसचा वापर फक्त शहरी भागात केला जात होता. आता मात्र ग्रामीण भागातही त्यांचा अधिक वापर होत आहे.

विशेषतः त्याची विल्हेवाट लावण्याकडे लक्ष न दिल्याने परिस्थिती बिकट बनत चालली आहे. बाजारपेठेत प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर बिनदिक्कत सुरू आहे. प्लॅस्टिक आणि थर्माकोल पर्यावरणासाठी हानिकारक आहेत. हे लक्षात घेऊन सरकारने प्लॅस्टिक आणि पॉलिथीनच्या वापरावर बंदी घातली आहे.

असे असतानाही शहरी व ग्रामीण बाजारपेठेत पॉलिथीनचा बिनदिक्कत वापर केला जात आहे. आज पॉलिथीनवरील बंदी प्रभावी करण्यासाठी प्रशासन कठोर कारवाई करत नाही. लोकप्रतिनिधी आणि राजकारणी यामध्ये योग्य रस घेत नाहीत. वस्तुतः जागरूकता निर्माण करण्यासाठी केवळ प्रशासनावर विसंबून राहणे योग्य नाही. पॉलिथीनवर केवळ बंदी घालून उपयोग नाही, तर त्यासाठी सर्वसामान्य नागरिकांनाही जागरूक राहावे लागेल.



लोकांना दुष्परिणामांची माहिती नसते. थर्माकोल आणि प्लॅस्टिकच्या वस्तूंच्या दुष्परिणामांची माहिती नसलेले लोक त्यांच्या वापराबाबत गंभीर नाहीत. तसेच, प्रशासकीय स्तरावरूनही त्याच्या वापराबाबत काटेकोरपणा पाळला जात नाही. तज्ज्ञांच्या मते, त्याच्या वापरामुळे सर्वसामान्य नागरिक विविध आजारांना बळी पडत आहेत. त्याचबरोबर अन्नाच्या शोधात आपल्या कचऱ्यावर फिरणाऱ्या गुरांना विविध आजारांनी ग्रासले असून वंध्यत्वासारख्या समस्यांनाही सामोरे जावे लागत आहे. भरीला प्लॅस्टिक कचऱ्याचे प्रमाणही वाढले आहे.

प्लॅस्टिकचा प्रश्न संपूर्ण जगासाठी महत्त्वाचा आहे. देशात स्वच्छता अभियान सुरू असूनही खेडी आणि शहरेही प्लॅस्टिक कचऱ्यापासून अस्पर्शित नाहीत. प्लॅस्टिक कचरा पर्यावरणासाठी गंभीर धोका बनत आहे. सर्वात चिंतेची बाब म्हणजे याबाबत ना प्रशासन गंभीर आहे ना स्थानिक जनता. या कचऱ्याच्या ओझ्याखाली पृथ्वी इतकी दबली आहे की, आता तिला श्वास घेणेही कठीण झाले आहे.

परिस्थिती अशीच राहिल्यास भविष्यात अनेक विपरीत परिणाम दिसण्याची शक्यता आहे. लग्नसोहळ्यांसह विविध सणांच्या निमित्ताने केळी किंवा सुक्या पानापासून बनवलेल्या ताटात खाण्याची परंपरा आता संपुष्टात येत आहे, तर सर्वसामान्यांना आधुनिकता सोडून पारंपरिक पान आणि मातीच्या कुल्हडच्या वापराला प्रोत्साहन द्यावे लागणार आहे. अशा प्रसंगी केळी किंवा सखुवाच्या पानांपासून बनवलेल्या ताटात जेवण आणि मातीच्या कुल्हडमध्ये पाणी पिण्याची परंपरा थर्मोकोल आणि प्लॅस्टिकच्या वस्तूंवर बहिष्कार टाकून पुनरुज्जीवित करावी लागेल. त्यामुळे कुटीर उद्योगांना चालना मिळेल आणि वाढत्या प्रदूषणालाही आळा बसेल.

थर्माकोलच्या प्लेट्स आणि प्लॅस्टिकचे ग्लास मानकांशी जुळत नाहीत. ते आरोग्यासाठी हानिकारक आहेत. त्याच्या सततच्या वापरामुळे लोकांना यकृत, मूत्रपिंड आणि पोटाशी संबंधित विविध प्रकारचे आजार होतात.


जनजागृतीच्या अभावामुळे आजकाल लोक थर्माकोल आणि प्लॅस्टिकने बनवलेल्या चहाचे कप, ताट, वाट्या, ग्लास बिनदिक्कतपणे वापरत आहेत. त्यामुळे डझनभर प्राणघातक आजारांना आमंत्रण मिळत आहे.

थर्माकोलच्या प्लेट्स आणि प्लॅस्टिकचे ग्लास सहजासहजी नष्ट होत नाहीत. वापरल्यानंतर सामान्य लोक ते सर्वत्र फेकून देतात आणि जाळतात. ते जाळल्यावर विविध प्रकारचे विषारी वायू वातावरणात पसरतात आणि पर्यावरण दूषित करतात. त्याचे अवशेष जमिनीच्या सुपिकतेवर वाईट परिणाम करतात. ही पृष्ठभूमी लक्षात घेऊन प्लॅस्टिक आणि थर्माकोलच्या वापरावर बहिष्कार टाकण्याची लोकचळवळ हाती घ्यावी लागेल.

(लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)



# सीमा पाळताना...



**विशेष**

**कौस्तुभ वीरकर**

**भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी व्यक्त केलेली चिंता ही अशाच घटनात्मक विसंगतीकडे लक्ष वेधणारी ठरते. त्यांनी अधोरेखित केले की, सर्वोच्च न्यायालय हे कायदेमंडळाचे काम करत असून, स्वतःला 'सुपर संसद' समजत आहे. हा संदेश न्यायव्यवस्थेच्या अधिकार मर्यादांचे स्मरण करून देणाराच आहे.**

भारतीय राज्यघटनेने प्रत्येक व्यवस्थेला स्वतंत्र देतानाच उत्तरदायित्व व संयमाचे बंधनही आखून दिले. न्यायव्यवस्था ही लोकशाहीचा एक अत्यंत महत्त्वाचा स्तंभ असून, तिचा आदर राखणे हे प्रत्येक नागरिकाचेच नव्हे, तर इतर सर्व व्यवस्थांचेही कर्तव्य. तथापि, व्यवस्थांच्या परस्परसंबंधांत संविधानिक समतोलाचे भान राखले गेले नाही, तर त्या व्यवस्थेच्या मूलाधारालाच बाधा पोहोचू शकते.

अलीकडच्या काही घटनांमध्ये न्यायव्यस्थेच्या काही निर्णयांमुळे या व्यवस्थेत विसंगती निर्माण होण्याची भीती निर्माण झाली होती. भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी व्यक्त केलेली चिंता ही अशाच घटनात्मक विसंगतीकडे लक्ष वेधणारी ठरते. त्यांनी अधोरेखित केले की, सर्वोच्च न्यायालय हे कायदेमंडळाचे काम करत असून, स्वतःला 'सुपर संसद' समजत आहे. हा संदेश न्यायव्यवस्थेच्या अधिकार मर्यादांचे स्मरण करून देणाराच आहे.

भारतीय संविधानाचे 'कलम १४२' न्यायालयाला 'पूर्ण न्याय' करण्याचा अधिकार देते, परंतु हा अधिकार न्यायिक विवेकबुद्धीने आणि संविधानाच्या सीमारेषांच्या अधीन राहूनच वापरणे अपेक्षित आहे. राष्ट्रपती, राज्यपाल यांसारख्या घटनात्मक पदांना निर्देश देण्याची परंपरा जर निर्माण होऊ लागली, तर ती संविधानिक पदांची स्वायत्तता आणि प्रतिष्ठेवरच प्रश्नचिन्ह उभे करू शकते. वास्तविक, कायदे करणे हे संसदेचे मूलभूत कार्य असून, न्यायपालिकेची जबाबदारी म्हणजे त्या कायद्याची वैधता तपासणे, नव्याने त्या कायद्याची रचना करणे नव्हे. मात्र, आजकाल एखादा कायदा संमत होताच, विरोधी पक्ष त्याविरोधात न्यायालयात धाव घेतात आणि संसदेतच 'कोर्टात जाऊ' अशी प्रत्यक्ष धमकी दिली जाते. हे केवळ संसदीय प्रक्रिया कमकुवत करण्याचे नव्हे, तर न्यायपालिकेच्या अप्रत्यक्ष राजकीय हस्तक्षेपाचे संकेतही आहेत. जर ही परिस्थिती अशीच राहिली, तर भविष्यात कायद्याची निर्मितीच्या प्रक्रियेत न्यायपालिकेचा समावेश होण्याचा धोका बळावतो. संसद ही लोकशाहीचा सर्वोच्च आविष्कार आहे; ती जनतेच्या इच्छांचे प्रतिनिधित्व करते. न्यायव्यवस्था ही तटस्थ, संयमी आणि संविधाननिष्ठ राहणे सशक्त लोकशाहीसाठी आवश्यक आहे, अन्यथा ती नैतिक अधिकार गमावून बसण्याचा धोका वाढतो. म्हणूनच, प्रत्येक व्यवस्थेनेच संविधानात दिलेल्या अधिकारांच्या मर्यादेत आपले कार्य करणे आदर्श ठरेल.

### सीमा ओलांडताना

भारतीय संस्कृतीच्या अमूल्य वैचारिक व कलात्मक परंपरेस आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाल्याचा गौरवक्षण नुकताच अनुभवास आला. 'श्रीमद्भगवद्गीता' व भरतमुनींचे 'नाट्यशास्त्र' या दोन अद्वितीय ग्रंथांचा 'युनेस्को'च्या 'द वर्ल्ड रजिस्टर' या जागतिक नोंदणीकृत दस्तऐवज यादीत समावेश करण्यात आला. ही केवळ भारतासाठी नव्हे, तर जागतिक सांस्कृतिक वारशासाठीही एक मौल्यवान भर ठरते. गीता ही भारतीय तत्त्वज्ञानाची पायाभरणी करणारी गाथा आहे.

वेद, उपनिषदांतील सार आणि लोकजीवनातील व्यवहार यांचा विलक्षण समन्वय तिच्यात आढळतो. धर्म, कर्म, योग आणि ज्ञान यांचे बहुपर्यायी अर्थ गुंफणारी गीता, आजही मानवाच्या अंतर्मुखतेचा दीपस्तंभ. गीता हा केवळ धार्मिक ग्रंथ म्हणून नव्हे, तर तत्त्वज्ञान, मानसशास्त्र व नैतिकता यांच्या शास्त्रीय अभ्यासासाठीही एक मूलग्रंथ मानला जातो. त्याचप्रमाणे भरतमुनींचे 'नाट्यशास्त्र' हे भारतीय ग्रंथसंपदेतील सांस्कृतिक सौंदर्यशास्त्रासाठीचा आद्य ग्रंथ आहे. नाट्य, संगीत, अभिनय, अलंकार, रस-सिद्धांत यांची चिकित्सक मांडणी करणाऱ्या या ग्रंथामुळे भारतीय नाट्यकलेस एक ठोस अधिष्ठान प्राप्त झाले.

या दोन ग्रंथांचा 'द वर्ल्ड रजिस्टर' यादीत समावेश होणे, म्हणजे भारताच्या शाश्वत सांस्कृतिक परंपरेला जागतिक व्यासपीठावर मिळालेली मान्यता होय. अभ्यासकांच्या दृष्टीने ही एक प्रेरणा तर आहेच; पण त्याहीपेक्षा मोठे म्हणजे ही एक सांस्कृतिक आत्मभानाची पुनर्स्थापना आहे.

आपल्या ज्ञानपरंपरेतील मूलभूत ग्रंथांच्या गौरवाने सांप्रत्कालीन भारतीय जनमानसांत अभिमान आणि उत्तरदायित्व यांची भावना पुन्हा जागृत होण्याची शक्यता आहे. तसेच, या ग्रंथातील विचार, त्यातील तत्त्वज्ञान यांचा प्रसार व त्यायोगे भारतीय संस्कृतीचा प्रसार होईल. या ऐतिहासिक घटनेचा जगावर आणि भारतावर अत्यंत सकारात्मक परिणाम होईल. यामुळे भारतीय तत्त्वज्ञान, कला व साहित्याची श्रेष्ठता आंतरराष्ट्रीय मंचावर अधोरेखित होईल. या मान्यतेमुळे देशभरात सांस्कृतिक जागरूकतेचा आणि शाश्वत विकासाच्या विचारांचा प्रसार होईल, ज्याचा प्रभाव भारतीय समाज आणि त्याच्या विविध कलेच्या रूपांवर सकारात्मक पडेल. एकूणच, या घटनेने भारतीय संस्कृतीला जागतिक परिप्रेक्षात एक नवे आणि सशक्त स्थान दिले आहे.

# व्यापारयुद्धाच्या छायेतील नामी संधी

**अमेरिकेने डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुसर्या कार्यकाळामध्ये व्यापारयुद्धाचा शंखनाद केला. याचा त्रास जगातील अनेक देशांना सहन करावा लागणार अशी शक्याता निर्माण झाली असताना, ट्रम्प यांनी धोरणीपणे फक्त चीनला वगळत इतर देशांना मात्र ९० दिवसांची सूट दिली. यामुळे बायडन यांच्या काळात जगाच्या सत्ताकेंद्रापासून काहीसे दूर गेलेल्या अमेरिकेला, पुन्हा एकदा जगाच्या केंद्रस्थानी आणण्यात ट्रम्प यशस्वी ठरले. मात्र, यासाठी चीनला मोठी किंमत मोजावी लागत आहे. त्यामुळे चीनच्या व्यापारी महत्त्वाकांक्षेला लगाम लागत असताना, भारताला एक पुरवठा साखळीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावण्याची नामी संधी निर्माण झाली आहे.**



**परराष्ट्रकारण**

**हेमंत महाजन (नि. ब्रि.)**

अमेरिकेने जगातील अनेक देशांतील वस्तूंच्या आयातीवर कर लादून, व्यापारयुद्धाची सुरुवात केली. आज अमेरिकेच्या या निर्णयाचे वेगवेगळ्या प्रकारे विश्लेषण केले जात आहे. सध्या या व्यापार युद्धाचा निशाणा चीन आहे. या लेखामध्ये या व्यापार युद्धाचा चीनवर काय परिणाम होईल? याचे आपण विश्लेषण करू. चीन भारताचा नंबर एकचा शत्रू आहे आणि येणार्या काळामध्ये, तो भारताला वेगवेगळ्या पद्धतीने त्रास देऊन भारताची आर्थिक प्रगतीत अडसर निर्माण करण्याचा प्रयत्न करेल.

अमेरिका-चीन आर्थिक युद्धात जर चिनी अर्थव्यवस्थेची हानी झाली, तर त्यांचा आर्थिक प्रगतीचा दर कमी होईल व येणार्या काळामध्ये, भारताला चिनी आव्हानांचा सामना करणे अधिक सोपे होईल. कारण, चीनची आर्थिक शक्ती वाढली की ते तेवढेच स्वतःची लष्करी ताकद वाढवून शेजारी राष्ट्रांना त्रास देतात.

### निर्यात किंमत नियंत्रणासाठी साम-दंड-भेदचा वापर:-

चीनने आपली निर्यात किंमत स्वस्त ठेवण्यासाठी, कृत्रिमरित्या आपल्या चलनाचे अवमूल्यन केले आहे. यामुळे इतर देश चिनी बनावटीच्या मालाशी स्पर्धा करूच शकत नाहीत. तसेच एखाद्या देशातील आयातशुल्क टाळण्यासाठी, प्रत्यक्ष निर्यातीपेक्षा कमी निर्यात केल्याचे चीन दाखवतो. तसेच, करचोरीसाठी नफा लपवून 'अकाऊंटिंग फ्रॉड' करण्याचे उद्योगही चीन सर्रास करतो. भारतातील कर टाळण्याकरिता बांगलादेश, नेपाळमधून तस्करी करत भारतात प्रवेश करण्याचेही मार्ग चीनने अवलंबले आहेत. मालाच्या बनावटीची चिनी ओळख लपविण्यासाठी, दक्षिण आशियाई देशांमधून चिनी उत्पादने पाठवणे, स्थानिक उद्योग बंद पाडण्यासाठी स्वस्त वस्तू मोठ्या प्रमाणात डम्प करणे, मानसिक युद्धाचा वापर करून चिनी आयातीशिवाय पर्यायच नसल्याचा भ्रम भारतीय उद्योगजगताच्या मनात निर्माण करणे, स्वस्त आयातीमुळे भारतीय आयातदारांना चिनी माल खरेदी करण्यास भाग पाडणे, भारतीय उदारमतवादी कायद्याला आव्हान देण्यासाठी भारतीय स्वयंसेवी संस्थांचा वापर करणे, वेदांता या तांबे उत्पादन करणार्या तथाकथित प्रदूषणकारी उद्योगांना थांबवणे आणि त्यांची जागा चिनी आयातीने घेणे, हे चीनच्या व्यापारी नितीचे उत्तम उदाहरणच ठरेल. चिनी प्रभावाखालील असलेल्या भारतीय माध्यमांची चीन कायमच प्रशंसा करतो तर, भारताला चीनसोबत सहकार्य करण्याचा पोक्त सल्लाही चीन देतो, हे सारे त्याच्या व्यापारी कुटनीतीचे मार्ग आहेत.

### चीन-अमेरिका : वाढती व्यापारी तूटः-

डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरू केलेल्या व्यापार युद्धाचे एक कारण असे होते की, चीन आणि अमेरिकेमधील व्यापाराची तफावत फारच जास्त आहे. कारण, चीनला फक्त अमेरिकेची आणि जगाची बाजारपेठ पाहिजे.

जगातील दोन मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये सध्या व्यापारयुद्ध असूनही, अमेरिका आणि चीनमधील व्यापार लक्षणीय आहे. २०२४ मध्ये चीनसोबत असलेला अमेरिकेचा एकूण व्यापार ५८२.४ अब्जपर्यंत पोहोचला असून, चीनला होणारी निर्यात १४३.५ अब्जपर्यंत घसरली, तर आयात ४३८.९ अब्जपर्यंत वाढली आहे. परिणामी, चीनसोबत अमेरिकेची व्यापारी तूट २९५.४ अब्जपर्यंत वाढली आहे. मात्र, आता चीनवरील आयात शुल्काचा परिणाम भयानक आहे. चिनी वस्तूंवरील अमेरिकेने लादलेले आयात शुल्क आता १४५ टक्के आहे, ज्यामुळे कंपन्यांना शिपमेंट थांबवावी लागेल किंवा पुरवठा साखळी बदलावी लागेल. फुटवेअर निर्माता 'हायलाईन युनायटेड'ने, ६० हजार आयात शुल्क देण्याऐवजी चीनला शूजचा एक कंटेनरच परत केला, जो सामान्य किमतीपेक्षा दहापट जास्त आहे.

### जिनपिंग दबावापुढे झुकत नाहीः-

अमेरिका आणि चीनमधील व्यापारयुद्ध तीव्र होत आहे. अमेरिकेने २४५ टक्के कर लादल्यानंतर, चीनने १२५ टक्के कर लादला आहे. अमेरिकेने लादलेल्या कोणत्याही अतिरिक्त शुल्काला आता ते प्रतिसाद देणार नाही.

अमेरिकेने लादलेले असामान्य शुल्क, आंतरराष्ट्रीय आणि आर्थिक व्यापार नियमांचे गंभीर उल्लंघन करते, असे चीनने म्हटले आहे. मात्र 'वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन' ही चीनने विकत घेतलेली युनायटेड नेशन्सची संस्था आहे, जी चिनी प्रभावाखाली आहे आणि जगाचे नुकसान करत आहे. चीनवर २४५ टक्के कर लादण्याचा अर्थ असा आहे की, चीनमध्ये बनवलेले १०० डॉलर्सचे उत्पादन, आता अमेरिकेत पोहोचल्यावर २४५ डॉलर्सचे होईल. अमेरिका चीनकडून, ४४० अब्ज डॉलर्सची आयात करते. अमेरिकेत चिनी वस्तू महाग झाल्यामुळे, त्यांची विक्री कमी होईल. मात्र, आता चीन वगळता सर्व देशांवर ९० दिवसांसाठी अमेरिकेकडून दहा टक्के बेसिक आयात शुल्क लादण्यात आले आहे. अमेरिकेच्या या निर्णयामुळे चीनमधून उत्पादने आयात करणार्या अमेरिकेच्या कंपन्यांसाठी चीनला पर्याय शोधणे एक मोठे आव्हान झाले आहे, हीच भारताकरिता संधी आहे.

### अमेरिकेला आतून पोकळ करणारे फेंटानिलः-

चीनने अमेरिकेविरुद्ध चालवलेले 'ड्रग्ज-नार्को टेरेरिझम'सुद्धा, व्यापारयुद्धाचे एक कारण आहे. फेंटानिल ड्रग हेरॉईनपेक्षा ५० पट जास्त आणि मॉर्फिनपेक्षा १०० पट जास्त शक्तिशाली आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प म्हणतात की, हे ड्रग चीनमध्ये तयार केले जाते आणि तेथून ते, मेक्सिको आणि कॅनडामार्गे अमेरिकेत पाठवले जाते. २०२४ साली फेंटानिलच्या अतिसेवनामुळे, ७० हजारांहून अधिक अमेरिकन लोकांचा मृत्यू झाला. हे ड्रग अमेरिकेला आतून पोकळ करत असून, हे चीनचेच षड्यंत्र आहे.

### व्यापारयुद्धाची वेळ चीनकरिता अत्यंत गैरसोयीचीः-

व्यापारयुद्धाची वेळ चीनकरिता अत्यंत गैरसोयीची आहे. कारण, सध्या चीनची अर्थव्यवस्था पाच टक्क्यांनीसुद्धा वाढत नाही. त्याची खरी वाढ ही अडीच ते तीन टक्के इतकी कमी असावी. चीन सरकारचे कर्जही खूप वाढलेले आहे. बाहेरचे जग, आयात शुल्क वाढल्यामुळे चिनी वस्तू घ्यायला तयार नाही. मात्र, चीनने जागतिक बाजारपेठांमध्ये आणि जगाच्या अर्थव्यवस्थेमध्ये प्रचंड घुसखोरी करून, एक चक्रव्यूहासारखी परिस्थिती निर्माण केली आहे. म्हणजेच चीनने वेगवेगळ्या देशात जिथे स्वस्त कच्च्या मालाचा पुरवठा स्वस्तात होऊ शकतो, अशा जागा किंवा खाणींवर ताबा मिळवला आहे. जगात ५० ते ५५ टक्के वस्तू निर्माण करणे, हे चीनमध्ये होत आहे. चीनने आपली वस्तू उत्पादन क्षमता एवढी वाढवली आहे की, कुठलाही देश त्यांच्याशी वस्तू उत्पादित क्षेत्रामध्ये शर्यत करू शकत नाही. कारण एवढ्या कमी किमतीमध्ये उत्पादन निर्माण करणे, कुठल्याही देशाला अशक्य आहे. मात्र आता चीनमध्ये मंदी येण्याची शक्यता निर्माण झालेली असून, चीनचे 'रिअल इस्टेट सेक्टर' हे मंदीकडे वाटचाल करत आहे.

चीनमधील ६० ते ६५ टक्के घरे ही मॉरगेज या पद्धतीमध्ये गेली आहे. यामुळे घराच्या किमती गेल्या २० महिन्यांपासून, कमी होत असल्याने, घरामध्ये गुंतवणूक केलेल्यांचे मोठेच नुकसान झालेले आहे. यामुळे सामान्य चिनी माणसाची खर्च करून, चिनी अर्थव्यवस्थेला मदत करण्याची क्षमता अत्यंत कमी झालेली आहे. कॉर्पोरेट वर्ल्ड किंवा व्यापार क्षेत्रामध्ये, कर्जबाजारी ही १२३ ते १७२ टक्के एवढी झाली आहे. चिनी अर्थव्यवस्था, आता त्यांनीच घेतलेल्या कर्जाच्या सापळ्यामध्ये अडकत चालली आहे. या कर्जसापळ्यातून चीनच्या अर्थव्यवस्थेला बाहेर काढणे, चीनी नागरिकांना शक्य आहे ना चीनच्या व्यापार जगताला. दरम्यान, चीनमध्ये वर्षानुवर्षे औद्योगिक गुंतवणुकीमुळे, उत्पादनाची मोठ्या प्रमाणात क्षमता निर्माण झाली. विशेषतः इलेक्ट्रिक वाहने, सौर पॅनेल, स्टील आणि सेमीकंडक्टर यांसारख्या क्षेत्रात चीनची शक्ती वाढली आहे. आता उत्पादन केवळ देशांतर्गत गरजांपेक्षाच नव्हे, तर जागतिक मागणीपेक्षाही जास्त आहे. चीनमधील कारखाने सुरु आहेत कारण, ते बंद केल्याने टाळेबंदी आणि सामाजिक समस्या निर्माण होतील.

### युद्धामुळे चीनचे प्रचंड नुकसान होणारः-

चीनकडे सुमारे ६०० अब्ज पौंड (सुमारे ७६० अब्ज) अमेरिकन सरकारी रोखे आहेत. याचा अर्थ असा की, चीनकडे अमेरिकन अर्थव्यवस्थेवर प्रभाव पाडण्याची मोठी शक्ती आहे. चीन-अमेरिका व्यापार युद्ध दीर्घकाळ चालण्याची शक्यता आहे. या युद्धामध्ये कोण जिंकेल, हे सांगणे सोपे नाही. चीनची आर्थिक क्षमता प्रचंड आहे. मात्र, एवढे नक्की की, अमेरिकेशी सुरू केलेल्या युद्धामुळे चीनचे प्रचंड नुकसान होणार आहे आणि ही भारताकरिता मोठी संधी आहे. चीन निर्यात करीत असलेल्या वस्तूंचा पुरवठा, आपण जर चीनपेक्षा कमी किमतीत जगाला केल्यास, आपण जगामध्ये एक उत्पादन करणारा देश म्हणून महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. त्यामुळे, भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेगही वाढू शकतो. असे झाल्यास येणार्या नजिकच्या भविष्यामध्ये आपण आर्थिकदृष्ट्या चीनची बरोबरी करू शकतो किंवा त्यांच्या पुढेसुद्ध जाऊ शकतो. त्यामुळे या आलेल्या संधीचा आपण पुरेपूर वापर करायला पाहिजे.

---

### वसंत बहार

वसंताचे आगमन
फुलांची उधळण,
निसर्गाचा रंगोत्सव,
मधुगंध सभोवर
नवपर्ण उमलली
रानोवन रंग-बिरंगी
फुलांची पखरण,
आनंद फुलवणारा हा सण
वाऱ्यावर डोलवी मन, जणू कृष्ण
वाजवितो पावा अन् नाद निनादी
अवनी वर वसंत
धून मनोमन
फुलवी पाने आणि सुमन,
ऐटीत सूर्य नारायण
भेटी अवनीला करून भ्रमण,
निसर्गाच्या भव्य मंडपात लक्ष
वेधती सोनेरी किरण,
लाल केशरी रंग उधळून
रोषणाईत दिसे धरा - मधुबन,
सप्त स्वरांचे अमृत गुंजन चैत्र
पालवी संगे पक्ष्यांचे कूजन,
चहूबाजू मधुर नाद तरंग करे
मन प्रसन्न, शांत चितवन जणू
कृष्ण वाजवितो पावा अन् नाद
निनादी अवनीवर...

**अवनी सप्रे**

### सुन्नता

खूप मोठं झुंबर पारदर्शी
काचांचं वाऱ्याच्या
लयींसोबत हलत डुलत
चमकणारं गालिच्याची फुलं
रंगात लोळणारी पायधुळ
पायाची क्षणाला शोधणारी
तुकतुकीत भिंतींना गुळ-
गुळीत लळा अनभिज्ञ
होत्या पळापळीतल्या
पळा चारखांब चौघांचे
बाकी उरलेली रिक्तता
सजवलेल्या ताटात
आवंढ्याची सुन्नता

**कल्पी जोशी**

### आधार

थरथरला देह, वाकली काया.. पण नाही गेली, मनाची
रया. सोडले निःश्वास, झाकोळले मन.. तरारली इच्छा,
उभारले तन. झाडांच्या सावलीत, विसावली काया..
ओलावल्या मनात, शांत परछाया. लकाकले काळीज,
लाभला विसावा.. चंदन शीतल, मिळाला गारवा.

**संगीता बापट**